सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७

(३१ जुलै १९९१ पर्यंत सुधारित)

[किमत रु. १६.००]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

१९९२

# महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७

शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्र. डीएसआर. १९६२—ब

दिनांक १४ डिसेंबर १९६७

(महाराष्ट्र राजपत्र, भाग ४-ब, पृष्ठ २४३६)

शा. अ., ग्रा. वि., क्र. डीएसआर. १९६९/३८५३८/अ-तीन, दि. ११ जानेवारी १९७१ (म. रा., भाग चार-ब, पृ. १०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर. १९६८/२२१२३/अ-तीन, दि. २८ जानेवारी १९७१ (म.रा., भाग चार-ब, पृष्ठ ६०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर. १९७०/४३८७५/अ-तीन, दि. २६ फेब्रुवारी १९७१ (म.रा., भाग चार-ब, पृष्ठ २३०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर. १९६९/३८१४७/अ-तीन, दि. १८ मार्च १९७१ (म.रा., भाग चार-ब, पृ. २५८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर. १९७०/९७८६/अ-दोन, दि. २८ मे १९७१ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५५६) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. डीएसआर. १९६९/३३५५७/अ-चार, दि. ११ नोव्हेंबर १९७१ (म. रा., भाग चार-ब, पृ. १३८५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. झेडएनजी. १४७०/६३१०२/अ-चार, दि. २५ जानेवारी १९७२ (म. रा., भाग चार-ब, पृ. ७९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७१/६०३८०/अ-चार, दि. ११ मार्च १९७२ (म. रा., भाग चार-ब, पृ. १९८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १६७१/२०६६२/अ-चार, दि. २९ डिसेंबर १९७२ (म. रा., भाग चार-ब, पृ. १३७०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७१/३२८०८/अ-चार, दि.१९ जानेवारी १९७३ (म.रा., भाग चार-ब, पृ. १४४) अन्वये सुधारलेले.

शा. शु. ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७१/३२८०८/अ-चार, दि. ३० जानेवारी १९७३ (म. रा., भाग चार-ब, पृ. २९१) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७१/६३१०५/अ-चार, दि. १६ जुलै १९७३ (म. रा., भाग चार-ब, पृ. १०४३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७१/२५४२४/अ-चार, दि. ३० नोव्हेंबर १९७३ (म. रा., भाग चार-ब, पृ. १३३०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७१/३३२१८/अ-चार, दि. ९ जानेवारी १९७४ (म. रा., भाग चार-ब, पृ. १२) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७३/१५१७२/अ-चार, दि. १८ मे १९७४ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५४४) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७१/४७५३२/अ-चार, दि. १० जून १९७४ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५७८) अन्वये सुधारलेले.

वीए ४२४२—१

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७३/४४६३९/अ-चार, दि. १६ एप्रिल १९७५ (म. रा. भाग चार-ब, पृ. २८८) अन्वये सुधारलेले.

शा. शु. ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७३/४४६३९/अ-चार, दिनांक २१ जून १९७५ [म.रा., भाग चार-ब, पृ. ३९९] अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर-१५७५/७/तिरा, दिनांक २३ ऑगस्ट १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. ४९३) अन्वये सुधारलेले.

शा. शुद्धीपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/७/तिरा, दि. २७ ऑगस्ट १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. क्र. ५०४) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/६/तिरा, दि. २५ ऑगस्ट १९७५ (म. रा., भाग चार-ब पृ. ५०१) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धीपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/२०१/तिरा, दि. ८ सप्टेंबर १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५३८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/२६/तिरा, दि. १९ सप्टेंबर १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५४६) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धीपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/२६/तिरा, दि. २ ऑक्टोबर १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६१०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/५/तिरा, दि. ७ ऑक्टोबर १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६७२) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धीपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. झेडएसआर. १५७५/५/तिरा, दि. २९ ऑक्टोबर १९७५ (म. रा., भाग चार-ब, पृ. ७२९) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धीपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७६/१०४४/(१२०७)-चार, दि. २० मार्च १९७६ (म. रा., भाग चार-ब, पृ. २७६) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७५/१९१/८९८/४, दि. २० एप्रिल १९७७ (म. रा., भाग चार-ब, पृ. २२८) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७७/२२२२/२००४/चार, दि. २५ ऑगस्ट १९७७ (म.रा, भाग चार-ब, पृ. ४४७ )अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १६७२/३३७६७/१४०-ब/चार, दि. २९ जुलै १९७८ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५२६) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७७/४३२३/२१६९/चार, दि. १६ ऑगस्ट १९७८ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५५५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७४/१४९३३/८९५/चार, दि. २० नोव्हेंबर १९७८ (म. रा., भाग चार-ब, पृ. ७८०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७४/२९३६६/सीएन-४००/चार, दि. २७ नोव्हेंबर १९७८ (म. रा., भाग चार-ब, पृ. ८१५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७७/४८३४/१८८८/चार, दि. १ डिसेंबर १९७८ (म. रा., भाग चार-ब, पृ. १०८४) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/६३०३/२७५५/चार, दि. २६ मार्च १९७१ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६७०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि., वि. क्र. एपीटी. २४७८/३५३०/२४५४/चार, दि. २० एप्रिल १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. ११४९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७८/४१५२/२४९६/चार, दि. २८ एप्रिल १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. ११७३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७५/१४९१/७४१/चार, दि. ८ जून १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. १२७५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. ३४७८/१६००/२३१२/चार, दि. २५ जुलै १९७९ (म. रा., भाग चार, पृ. १३७८) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/११९०६/२९४७/चार, दि. २१ ऑगस्ट १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. १४६५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७८/३८७०/२४८०/चार, दि. १३ नोव्हेंबर १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. १६२८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७४/२०८९०/८९६/चार, दि. १० डिसेंबर १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. १६७३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४७१/४७७६४/५७/चार, दि. ११ डिसेंबर १९७९ (म. रा., चार-ब, पृ. १६८२) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७८/२०१३/२९१४/चार, दि. २९ डिसेंबर १९७९ (म. रा., भाग चार-ब, पृ. १७३६) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/७४३२/२७६८/चार, दि. २२ जानेवारी १९८० (म. रा., भाग चार-ब, पृ. ४५) अन्वये सुधारलेले.

शासन आदेश, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७०/२५०२/२३०५/चार, दि. २८ जानेवारी १९८० (म. रा., भाग चार-ब, पृ. ५८) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/३८८६४/३१७७/चार, दि. २८ जानेवारी १९८० (म. रा., भाग चार-ब, पृ. ६०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/३१०३४/३०९४/चार, दि. १९ जुलै १९८० (म. रा., भाग चार-ब, पृ. ६०९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/२५४८६/३०३२/चार, दि. २३ सप्टेंबर १९८० (म. रा., भाग चार-ब, पृ. ७०८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. ४४३७/१२३५/चार, दि. १६ फेब्रुवारी १९८१ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७८/२४४९/२५८३/चार, दि. २० फेब्रुवारी १९८१ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/२२२२/३७२०/चार, दि. २९ जुलै १९८१ (म. रा., भाग चार-ब, पृ. १५५०) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/२८५७२/४०५९/चार, दि. १८ नोव्हेंबर १९८१ (म. रा., भाग चार-ब, पृ. १८४१) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७८/१०७७/२२८५-अ/चार, दि. २३ सप्टेंबर १९८१ (म. रा., भाग चार-ब, पृ. १६४१/अन्वये सुधारलेले.

म्हीए ४२४२—१अ

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/६०००/३७९७/चार, दि. १५ ऑक्टोबर १९८१ (म. रा., भाग चार-ब, पृ. १६६८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८०/१५५२२/३३५०/चार, दि. २३ फेब्रुवारी १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. १५३) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८०/१५५२२/३३५०/सीआर ४०, दि. १५ ऑक्टोबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६७८) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/३१५०१/३२५/१३, दि. १७ सप्टेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६३०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८०/३०८८४/३२३/१३, दि. २९ सप्टेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६४९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/२०००७/सीआर १५/१३, दि. १ नोव्हेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ७१५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८३/१३०१२/सीआर १२/तिरा, दि. ३० नोव्हेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ७७३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८३/४२३६/सीआर १३/तिरा, दि. ५ डिसेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ७८५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १४८३/१६५१२/सीआर ११९३/तिरा, दि. २३ डिसेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ८९४) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८३/४३२२/सीआर १४/तिरा, दि. ३० डिसेंबर १९८३ (म. रा., भाग चार-ब, पृ. ९१०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/८२४७/(सीआर ९३)/तिरा, दि. १७ फेब्रुवारी १९८४ (म. रा., भाग चार-ब, पृ. ८०) अन्वये सुधारलेले.

शासन शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८१/८२४७/(सीआर ९३)/तिरा, दि. १९ जुलै १९८४ (म. रा., भाग चार-ब, पृ. ४६७) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८३/५४३१/सीआर १८/तिरा, दि. २४ मे १९८४ (म. रा., भाग चार-ब, पृ. २६०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७९/१६३०७/सीआर १४२/तिरा, दि. ९ जानेवारी १९८५ (म. रा., भाग चार-ब, पृ. १०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८३/४२७५/सीआर १७७/तिरा, दि. २९ जानेवारी १९८५ (म. रा., भाग चार-ब, पृ. २४६) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. २२८४/सीआर २५६/तिरा, दि. २२ ऑगस्ट १९८५ (म. रा., भाग चार-ब, पृ. १००५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १९८४/सीआर १७८/तिरा, दि. १५ नोव्हेंबर १९८५ (म. रा., भाग चार-ब, पृ. २८६५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४७६/२०७६/सीआर ३४/तिरा, दि. ७ एप्रिल १९८६ (म. रा., भाग चार-ब, पृ. १२३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १७८३/सीआर ६७/तिरा, दि. २३ जून १९८६ (म. रा., भाग चार-ब, पृ. ३०१) अन्वये सुधारलेले.



शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. २२८३/सीआर-८६/तिरा, दिनांक १६ जुलै १९८६ (म. रा., भाग चार-ब, पृ. २३२) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. २४८४/सीआर-१६१/तिरा, दि. १० सप्टेंबर १९८६ (म. रा., भाग चार-ब, पृ. ४२७) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १०८५/२३५/सीआर-३७२/तिरा, दिनांक १५ ऑक्टोबर १९८६ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५९३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १८८४/सीआर-२५२/तिरा, दि. १४ मे १९८७ (म. रा., भाग चार-ब, पृ. ५८१) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १०८५/१३६/सीआर-३५३/तिरा, दि. ३ मार्च १९८८ (म. रा., भाग चार-ब, पृ. ११९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १९८७/सीआर-६९६/तिरा, दि. १९ सप्टेंबर १९८८ (म. रा., भाग चार-ब, पृ. ४९९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. एपीटी. १०८८/सीआर-८५१/तिरा, दि. ३ एप्रिल १९८९ (म. रा., भाग चार-ब, पृ. २१०–२११) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १०८५/सीआर-३५३/१३, दि. ३ ऑक्टोबर १९८९ (म.रा., भाग चार-ब, पृ. ५८६–५८७) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा, वि. वि., क्र. सेप्रनि. २३८९/सीआर-९५/८९/१३, दि. २० ऑक्टोबर १९८९ (म. रा., भाग चार-ब, पृ. ६०५-६०६) अन्वये सुधारलेले.

शा.अ., ग्रा.वि.वि., क्र. अेपीटी. १४८८/प्रक्र ८७८/१३, दिनांक २३ मे १९९० (म. रा. भाग ४-ब, पृ. २५६) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. अेपीटी. १०८९/सीआर-४६/१३, दिनांक २९ जून १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. २९०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि.१९८९/सीआर १०१/८९/१३, दिनांक १६ जुलै १९९० (म.रा., भाग ४-ब, पृ. ३०३) अन्वये सुधारलेले

शा. अ., शुद्धिपत्रक ग्रा. वि. वि., क्र. अेपीटी. १४८८/सीआर-८७८/१३, दिनांक ६ ऑगस्ट १९९० (म. रा., भाग-४ ब, पृ. ३४५) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि. १८८९/सीआर-४५/८९/१३, दिनांक १६ ऑगस्ट १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. ८४२) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा वि. वि., क्र. सेप्रनि. २१८९/सीआर-८०/१३ दिनांक १ सप्टेंबर १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. ६११) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा वि. वि. क्र. सेप्रनि. १६९०/सीआर-५१६/१३, दिनांक २५ ऑक्टोबर १९९० (म. रा., भाग ४-ब पृ. १८०३) अन्वये सुधारलेले

शा. अ. ग्रा. वि. वि. क्र. सेप्रनि. १६९०/सीआर-६१४/१३, दिनांक ८ नोव्हेंबर १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. १८२८) अन्वये सुधारलेले

शा. अ., ग्रा. वि. वि. क्र. सेप्रनि. १४८९/सीआर-२६१/१३ दिनांक २२ नोव्हेंबर १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. ८५०) अन्वये सुधारलेले

शा. अ., ग्रा. वि. वि. क्र. अेपीटी. २४८३/सीआर-३२/१३, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. १८६६) अन्वये सुधारलेले.

शा. शुद्धिपत्रक, ग्रा. वि. वि., क्र. अेपीटी. १४८८/सीआर-८७८, दिनांक ५ डिसेंबर १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. १९०२) अन्वये सुधारलेले

शा. अ. ग्रा. वि. वि., क्र. अेपीटी. २४८३/१४०६/सीआर-३९८/१३, दिनांक २१ डिसेंबर १९९० (म.रा., भाग ४-ब, पृ. १९०९) अन्वये सुधारलेले.

शा. शु. ग्रा. वि. वि. क्रमांक अेपीटी. २४८३/सीआर-३२/१३, दिनांक २२ डिसेंबर १९९० (म.रा., भाग ४-ब, पृ. १९१३) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि. १०९०/सीआर-६१३/१३, दिनांक ३१ डिसेंबर १९९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. १९२७) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा.वि.वि., क्रमांक सेप्रनि. १०८९/सीआर-३८१/१३, दिनांक १४ जानेवारी १९९१ (म.रा., भाग ४-ब, पृ. ५९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. अेपीटी. २४८८/सीआर-११३९/१३, दिनांक २५ जानेवारी १९९० ( म. रा., भाग ४-ब, पृ. ८७) अन्वये सुधारलेले.

शा. शु., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि. ११९० सीआर-६१४/१३, दिनांक २० फेब्रुवारी १९९१ (म.रा., भाग ४-ब, पृ. १०९) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि. १०८९/सीआर-४१/१३, दिनांक ८ एप्रिल १९९१ (म. रा., भाग ४-ब, पृ. १५७) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि. १०८९/सीआर-७४२/१३, दिनांक १९ एप्रिल १९९० (म. रा., भाग ४-ब, पृ. १७०) अन्वये सुधारलेले.

शा. अ., ग्रा. वि. वि., क्र. आरझेडपी. १५८४/सीआर-१६९/१३, दिनांक २ मे १९९१ (म. रा., भाग ४-ब, पृ. १९९) अन्वये सुधारलेले.

शा. शु., ग्रा. वि. वि., क्र. सेप्रनि. १४८९/सीआर-२६१/८९/१३, दिनांक १५ जुलै १९९१ (म. रा., भाग ४-ब, पृ. २५७) अन्वये सुधारलेले.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा) महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच याचे कलम २७४ पोट-कलम (२) खंड (३९) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ पोट-कलम (३) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रयुक्ती.**—(१) या नियमांस, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ असे म्हणता येईल.

(२) हे नियम जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) आणि जिल्हा सेवा (वर्ग चार) यातील सर्व पदांच्या सेवा प्रवेशांस लागू होतील आणि अन्यथा उपबंधित केले नसेल तर उक्त नियम—

(एक) आकस्मिकता निधीतून खर्च देण्यात येणारी आस्थापना, रोजंदारीवरील आस्थापना किंवा कार्यव्ययी आस्थापना यावरील पदे,

(दोन) ज्या पदांवर अंशकालिक नेमणुका करण्यात येतात अशी पदे, आणि

(तीन) ज्या पदांवर करार करून नेमणुका करण्यात येतात अशी पदे

यावरील सेवा प्रवेशास लागू होणार नाहीत.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात—

(एक) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१,

(दोन) "परिशिष्ट" म्हणजे या नियमांस जोडलेले परिशिष्ट.

(तीन) जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावरील सेवा प्रवेशासंबंधात "नियुक्ती प्राधिकारी म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अधिनियमाचे कलम ९६, पोट-कलम (१) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने अशा पदावर नेमणुका करण्याचा अधिकार ज्याला प्रदान केला असेल असा जिल्हा परिषदेचा कोणताही इतर अधिकारी

(चार) "जिल्हा सेवा" म्हणजे अधिनियमाचे कलम २३९, खंड (ब) अन्वये रचना करण्यात आलेली जिल्हा परिषदेची जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा जिल्हा सेवा (वर्ग चार),

(पाच) "तुल्य" म्हणजे तुल्य म्हणून मान्यता दिलेले,

(सहा) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन,

(सात) "मान्यता प्राप्त" म्हणजे शासनाने मान्यता दिलेले,

[१][(आठ) "निवड मंडळ" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे आणि अधिनियम, १९७३ या महाराष्ट्र अधिनियम एकवीस च्या कलम ३ किंवा ६ अन्वये रचना करण्यात आलेले अनुक्रमे प्रादेशिक निवड मंडळ किंवा विशेष निवड मंडळ.]

३. जिल्हा सेवेवर नेमणुकीसाठी अनर्हता जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर कोणत्याही व्यक्तीची—

(अ) ती—

(एक) भारताची नागरिक किंवा

(दोन) सिक्कीमची प्रजाजन किंवा

(तीन) नेपाळची प्रजाजन किंवा

(चार) भूतानची प्रजाजन किंवा

(पाच) पाकिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन आणि केनया, युगांडासारखे पूर्व आफ्रिकीय देश आणि टांझानियांचे (पूर्वीचे टांगानिका आणि झांजिबार) संयुक्त प्रजासत्ताक या देशांतून भारतात कायम वास्तव्य करण्याच्या उद्देशाने ज्याने स्थलांतर केले असेल अशी मूळची भारतीय व्यक्ती, किंवा

(सहा) भारतात कायम वास्तव्य करण्याच्या उद्देशाने १ जानेवारी १९६२ पूर्वी भारतात आलेला तिबेटी निर्वासित,

असल्याशिवाय नियुक्ती करण्यात येणार नाही :

परंतु वरील प्रवर्ग (तीन), (चार), (पाच) आणि (सहा) याखाली येणारी व्यक्ती शासनाने जिच्या नावे पात्रता प्रमाणपत्र दिले असेल अशी असेल आणि जर ती प्रवर्ग (पाच) खालील व्यक्ती असेल तर, तिच्या नेमणुकीच्या तारखेपासून केवळ एक वर्षाच्या मुदतीपर्यंत पात्रता प्रमाणपत्र वैध राहील व त्या मुदतीनंतर जर ती भारताचा नागरिक होईल तरच केवळ तिला सेवेत ठेवण्यात येईल :

आणखी असे की, ज्या व्यक्तीच्या बाबतीत पात्रता प्रमाणपत्र आवश्यक असेल त्या व्यक्तीस [२][निवड मंडळ] किंवा इतर कोणतेही सेवाप्रवेश प्राधिकरण यांच्याद्वारा घेण्यात येणाऱ्या परीक्षेस किंवा मुलाखतीस किंवा दोन्हीसही दाखल करून घेता येईल आणि शासनाकडून आवश्यक ते प्रमाणपत्र मंजूर करून घेण्यात येईल या शर्तीस अधीन राहून ३ महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीपर्यंत अशा प्रमाणपत्राशिवाय तिची तात्पुरती नेमणूक सुद्धा करता येईल; किंवा

(ब) जर तिला, जिल्हा परिषदेखालील सेवेतून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाखालील सेवेतून किंवा कोणत्याही सरकारी सेवेतून गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असेल, किंवा

(क) जर [३][* *] ज्यामध्ये नैतिक अधःपाताचा समावेश होईल अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(ड) जर त्याच्या एकापेक्षा अधिक बायका हयात असतील आणि स्त्री अमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पूर्वीची बायको हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

(इ) अशा पदाकरिता अर्ज पाठविण्याच्या शेवटच्या तारखेस ती १८ वर्षे वयाची झाली नसेल तर तिची जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर नियुक्ती करण्यात [४][येणार नाही.] किंवा

[५][(फ) जर आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत असेल व अशा पदाकरिता अर्ज पाठविण्याच्या शेवटच्या तारखेस, ती ४५ वर्षे वयाची झाली नसेल]

[६][ * * * * * * * ]

---

१. शासकीय अधिसूचना, दिनांक १५ ऑक्टोबर १९८१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. शासकीय अधिसूचना, दिनांक १५ ऑक्टोबर १९८१ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.

३. शासकीय अधिसूचना, दिनांक २८ जानेवारी १९७१ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.

४. शासकीय अधिसूचना, दिनांक ३१ डिसेंबर १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. शासकीय अधिसूचना, दिनांक ३१ डिसेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. शारीरिक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा सादर करणे.—जिल्हा सेवांमध्ये नेमणूक करावयाच्या उमेदवारांच्या वैद्यकीय तपासणीची तरतूद करण्याकरिता विहित करण्यात येतील अशा इतर नियमांस अधीन राहून, जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावरील नेमणूका (कलम २४१ अन्वये करण्यात येईल किंवा अधिनियमाच्या कलम २४२ अन्वये नेमून देऊन किंवा बदलीमुळे किंवा बदलीमुळे करण्यात येईल अशी नेमणूक नसणारी नेमणूक).

(अ) शासनाने वैद्यकीय तपासणीकरिता यथोचितरित्या नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे यासोबत जोडलेल्या नमुन्यातील, आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र, आणि

(ब) नियुक्ती प्राधिकारी त्याबाबतीत आवश्यक करील असा चांगल्या वर्तणुकीचा पुरावा सादर करण्यात येईल यास (या शर्तीस) अधीन असतील :

परंतु, शासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही जिल्हा सेवेतील पदावर किंवा पदाच्या वर्गाकरिता उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या सेवा प्रवेशासाठी शारीरिक पात्रतेचा दर्जा शिथिल करता येईल किंवा त्याची सूट देता येईल.

५. **नेमणुकीसाठी अर्हता व नेमणूक करण्याची पद्धती.—(१) जिल्हा सेवा किंवा त्याखालील पदे** यावरील नेमणुकीसाठी उमेदवारास आवश्यक असलेल्या वय, शिक्षण अनुभव वगैरे संबंधातील अर्हता व उक्त पदांवरील नेमणुकीची पद्धती या गोष्टी, परिशिष्ट [१][एक ते तेरा मध्ये] नमूद केल्याप्रमाणे असतील :

परंतु, संबंधित सेवाप्रवेश नियमान्वये, जिल्हा सेवांतील पदावरील नेमणुकीकरिता विहित करण्यात आलेल्या उच्चतर वयोमर्यादा, मागासवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, पाच वर्षांनी शिथिल करण्यात येतील.

(२) [२][महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवाप्रवेश (निवड मंडळाच्या सल्याशिवाय) नियम, १९६५ च्या नियम ४ अन्वये करण्यात येणाऱ्या नेमणुकांच्या, बाबतीत आणि निवड मंडळाशी संबंधित इतर बाबतीत मुख्य, कार्यकारी अधिकारी ज्यावेळी विहित केलेली अर्हता धारण करणारे पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत, असे प्रमाणपत्र देतील अशा वेळी] संबंधित विभागीय आयुक्त या नियमात अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, अशा प्रत्येक प्रकरणांमध्ये, जिल्हा सेवांतील पदावरील नेमणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या [३][सर्व अर्हता किंवा त्यापैकी कोणतीही अर्हता] कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या संबंधात शिथिल करण्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यास परवानगी देऊ शकतील.

**टीप.**—या नियमाच्या परिशिष्टात जिल्हा सेवांतील पदांवरील नियुक्तीकरिता विहित करण्यात आलेली उच्चतर वयोमर्यादा ही, अशा पदासाठी अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

६. **नामनिर्देशन, बढती किंवा बदली करून नेमणुका.**—(१) जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशन करून नेमणूक करण्याची तरतूद संबंधित सेवाप्रवेश नियमात करण्यात आली नसेल आणि अशा पदांवर, यथास्थितीत, बढती देऊन किंवा बदली करून नेमणूक करण्यासाठी योग्य उमेदवार उपलब्ध नसतील त्याबाबतीत अशा पदांवरील नेमणूक नामनिर्देशन करून करता येईल आणि अशा बाबतीत, वय, शिक्षण, अनुभव वगैरेंच्या संबंधातील अर्हता, [शासनाकडून निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

---

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ डिसेंबर १९८३ अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ जानेवारी १९७१ अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ ऑगस्ट १९७५ अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



(२) जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर निश्चित प्रमाणात नामनिर्देशन करून आणि बढती देऊन नेमणूक करण्याची तरतूद, संबंधित सेवाप्रवेश नियमात करण्यात आली असेल आणि नामनिर्देशन करून किंवा यथास्थिती बढती देऊन या प्रमाणानुसार अशा पदावर नेमणूक करण्यासाठी योग्य उमेदवार उपलब्ध होत नसतील [१][आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा संबंधित निवड मंडळाने त्याप्रमाणे प्रमाणपत्र दिलेले असेल] त्या बाबतीत आयुक्तांच्या संमतीने उक्त प्रमाण शिथिल करून, बढती देऊन किंवा नामनिर्देशन करून अशा पदावर नेमणूक करता येईल.

(३) जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर, अशा पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार, नामनिर्देशन करून किंवा बढती देऊन किंवा यथास्थिती बदली करून नेमणूक करण्यासाठी योग्य उमेदवार उपलब्ध नसतील त्याबाबतीत, शासनाच्या किंवा भारतातील इतर कोणत्याही शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागातील किंवा कार्यालयातील व्यक्तीची, निर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीसाठी किंवा कायम स्वरूपात बदली करून उक्त पदावर नेमणूक करता येईल, मात्र अशी नेमणूक ही, अशा विभागाच्या किंवा सरकारी कार्यालयाच्या किंवा भारतातील इतर कोणत्याही शासनाच्या किंवा यथास्थिती स्थानिक प्राधिकरणाच्या सहमतीने, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून निर्धारित करण्यात येतील, अशा शर्तीस व अटींस अधीन असेल :

परंतु, पाच वर्षांपेक्षा अधिक मुदतीसाठी किंवा कायम स्वरूपात करण्यात आलेली कोणतीही नेमणूक ही शासनाच्या मान्यतेने करण्यात येईल.

(४) जिल्हा सेवेतील पदावरील नेमणूक पदोन्नती करून करावयाची असेल त्याबाबतीत ज्येष्ठता-नि-गुणवत्ता, या आधारावर निवड करण्यात येईल :

[२][परंतु, उत्तम कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी घेण्यात आलेल्या बक्षिस स्पर्धामध्ये सर्वोत्तम ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवा ज्येष्ठतेची अट लागू होणार नाही].

(५) अन्यथा तरतूद करण्यात आली नसेल तर, जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशन करून नेमण्यात आलेल्या उमेदवारास एक वर्षाच्या मुदतीसाठी परिवीक्षाधीन ठेवण्यात येईल. परंतु, अशा उमेदवारांचे काम आवश्यक त्या दर्जाचे नाही असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे मत होईल तर त्यास, त्याचा परिवीक्षाकाल वाढविता येईल.

(६) कोणत्याही व्यक्तीला, तिने एक वर्षापेक्षा कमी नसेल अशा अखंड मुदतीसाठी त्या पदावर समाधानकारकरित्या सेवा केली असेल तर किंवा तिची परिवीक्षेची मुदत तिने समाधानकारकरित्या पूर्ण केली असेल आणि ती विभागीय आणि/किंवा कोणतीही असल्यास, भाषा परीक्षा उत्तीर्ण झाली असेल ते आणि/किंवा असे पद धारण करण्याकरिता शासनाने ठरविलेले कोणतेही (असल्यास) प्रशिक्षण तिने यशस्वीरित्या घेतलेले असेल, त्याशिवाय जिल्हा सेवेतील पदावर कायम करण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—पदासाठी कोणताही परिवीक्षेचा काल ठेवण्यात आला असेल तर तो पूर्ण झाल्यानंतर ज्या तारखेपासून उक्त व्यक्ती सतत स्थानापन्न असेल ती तारीख किंवा उक्त पद कायम स्वरूपात रिकामे झाले असेल तर ती तारीख या दोहोंपैकी जी नंतरची असेल त्या तारखेपासून, या पोट-नियमान्वये त्या व्यक्तीस कायम करण्यात येईल.

(७) या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासन जिल्हा परिषदेने आपल्याकडे घेतलेल्या खाजगी, प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा घेऊन, कोणत्याही संस्थेतील कर्मचारी वर्गाच्या सदस्यांना, राज्य शासनाकडून त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस व अटीस अधीन राहून, जिल्हा परिषदेखालील योग्य अशा पदावर, सामावून घेण्याबद्दल निदेश देऊ शकेल :

---

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ जानेवारी १९७१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] शासकीय अधिसूचना, दिनांक ११ नोव्हेंबर १९७१ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(३)

परंतु, अशा सदस्यांना, ज्या पदांवर सामावून घेण्यात आले असेल त्या पदांकरिता विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हता त्यांनी धारण केलेल्या असल्या पाहिजेत.

(८) या नियमांत काहीही अंर्भूतत असले तरी, अन्य जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवेतील कोणत्याही सदस्याने अर्ज केल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, दोन्ही जिल्हा परिषदांमध्ये परस्पर संमत करण्यात येतील अशा शर्तीवर व अटींवर आणि पुढील आणखी शर्तीस अधीन राहून, अशा सदस्यांची उक्त जिल्हा परिषदांखालील ज्या जिल्हा सेवेत त्याने जे पद धारण केले असेल त्या जिल्हा सेवेतील पदावर नेमणूक करू शकते.

(एक) केवळ बढती देऊन भरण्यात येणाऱ्या पदांवर अशा नेमणूका करण्यात येणार नाहीत आणि त्या, नामनिर्देशन करून नेमणूक करण्यासाठी ज्या रिकाम्या जागा राखून ठेवण्यात आलेल्या असतील, त्या रिकाम्या जागांवर करण्यात येतील.

[1][(दोन) आपसांत (परस्पर) बदलीने अशी नेमणूक झाल्यावर नेमणूक झालेली व्यक्ती आपल्या पूर्वीच्या जिल्हा परिषदेची ज्येष्ठता कायम ठेवील किंवा ज्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या पदावर परस्पर बदलीद्वारे नेमणूक झाली असेल त्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता या दोन्हींपैकी जी कमी असेल ती ज्येष्ठता स्वीकारेल;]

(तीन) कर्मचाऱ्यांच्या विनंतीवरून अशी नेमणूक झाल्यास अशा नेमणूक झालेल्या व्यक्तींची त्या संवर्गातील सेवाज्येष्ठतानंतरच्या जिल्हा परिषदेमध्ये अशी नियुक्ती ज्या तारखेस झाली असेल त्या तारखेपासून राहील.

[2][(९) या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार प्रस्थापित झालेल्या कोणत्याही महानगरपालिका किंवा नगरपरिषदेच्या विवाहित स्त्री कर्मचाऱ्याने विनंती अर्ज केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, अशा कर्मचाऱ्याची राज्य शासन, महानगरपालिका, किंवा यथास्थिती नगरपरिषद आणि जिल्हा परिषद यांच्यामध्ये परस्पर संमत होतील अशा अटी व शर्तीवर आणि पुढील आणखी अटींच्या अधीन राहून जिल्हा परिषद सेवेतील पदांवर नियुक्त करू शकेल :—

(अ) अशा नेमणुका, केवळ पदोन्नतीने भरावयाच्या पदांवर करण्यात येणार नाहीत, आणि त्या नामनिर्देशनाने भरण्यासाठी ज्या रिक्त जागा राखून ठेवलेल्या असतील अशा रिक्त जागांवर करण्यात येतील.

(ब) अशा नेमणुका जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवेतील पदांसाठी नेमलेल्या सेवा प्रवेश नियमांमध्ये त्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अशा स्त्री विवाहित कर्मचारी धारण करीत असल्याशिवाय त्यांच्यामधून करण्यात येणार नाहीत.]

[3][ * * * * ]

(ड) अशा नेमणुकीनंतर, नेमण्यात आलेल्या विवाहित स्त्री कर्मचाऱ्यांना त्यांनी त्यांच्या पूर्वीच्या सेवेत मिळविलेल्या कोणत्याही लाभासाठी पात्र समजण्यात येणार नाही आणि सेवेत वरिष्ठतेच्या प्रयोजनार्थ ज्या पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली असेल ते पद अशा नियुक्तीच्या तारखेस जसे असेल त्याप्रमाणे उक्त पदाच्या संवर्गात त्यांना कनिष्ठतम समजण्यात येईल.

[4][परंतु जेव्हा अशा विवाहित स्त्री कर्मचारी जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवेतील पदांवर सेवा प्रवेशासाठी विहित केलेल्या उच्चत्तर वयोमर्यादेत बसत नसतील तेव्हा ती वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल.]

[5][(१०) या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हा सेवेतील कोणत्याही सदस्याने आजारीपणाच्या सबबीवर वैद्यकीय कारणावरून विनंती अर्ज केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्ताच्या पूर्वसंमतीने, अशा सदस्यांस आयुक्त विनिर्दिष्ट करतील अशा अटी व शर्तीवर जिल्हा परिषदेच्या जिल्हा सेवेतील दुसऱ्या एखाद्या पदावर बदलीने नियुक्त करू शकेल.

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १४ जानेवारी १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ जुलै १९७८ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ एप्रिल १९७९ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.

[4] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ एप्रिल १९७९ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[5] शासकीय अधिसूचना, दिनांक २० फेब्रुवारी १९८१ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

७. जिल्हा सेवेतील पदे राखून ठेवणे.—(१) या नियमांच्या प्रयोजनार्थ, मागास वर्ग पुढील विशिष्ट जातीचे मिळून होतील :—

(एक) अनुसूचित जाती आणि बौद्ध धर्म स्वीकारलेल्या अनुसूचित जाती,

(दोन) विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमाती धरून अनुसूचित जमाती.

(तीन) अनुसूचित जमाती आणि भटक्या जमाती, आणि

(चार) इतर मागास जमाती, आणि

शासनाच्या नियंत्रणाखालील पदे व सेवा यांमधील सेवा प्रवेशाच्या प्रयोजनार्थ, प्रत्येक विशिष्ट जातीमध्ये, अशा जमाती म्हणून राज्य शासनाकडून जाहीर करण्यात आल्या असतील किंवा जाहीर करण्यात येतील अशा जमातींचा समावेश होईल.

(२) [1][राज्य शासन वेळोवेळी देईल अशा सूचनांस अधीन राहून] कोणत्याही जिल्हा सेवेतील कोणतीही पदे नामनिर्देशनाद्वारे भरावयाची असतील तेव्हा, मागासवर्गीयाच्या प्रत्येक विशिष्ट जातीच्या सदस्यांकरिता, पुढील टक्केवारीतील पदे राखून ठेवण्यात येतील :—

(एक) अनुसूचित जाती आणि बौद्ध धर्म स्वीकारलेल्या अनुसूचित जाती यांच्या सदस्यांकरिता १३ टक्के,

(दोन) विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमाती धरून, अनुसूचित जमातींच्या सदस्यांकरिता ७ टक्के,

(तीन) अनुसूचित जमाती आणि भटक्या जमाती यांच्या सदस्यांकरिता ४ टक्के,

(चार) इतर मागास जातींच्या सदस्यांकरिता १० टक्के.

[2][परंतु मागासवर्गीच्या कोणत्याही विशिष्ट वर्गातील सदस्यांसाठी असलेली राखीव जागांची टक्केवारी, विशिष्ट जिल्ह्यातील लोकसंख्या विचारात घेऊन राज्य शासन वाढवू शकेल.]

स्पष्टीकरण.—मागासवर्गाच्या प्रत्येक विशिष्ट जातीच्या सदस्यांकरिता राखून ठेवण्यात येणाऱ्या रिकाम्या जागांची संख्या मोजताना या नियमाच्या प्रारंभीच्या तारखेस अस्तित्वात असलेल्या सर्व रिकाम्या जागा किंवा उक्त तारखेनंतर निर्माण होणाऱ्या सर्व जागा हिशोबात घेण्यात येतील. रिकाम्या जागा किंवा उक्त तारखेनंतर निर्माण होणाऱ्या सर्व रिकाम्या जागा, जसजशा आणि मागासवर्गाच्या प्रत्येक विशिष्ट जातीच्या सदस्यांकरीता अशा सर्व रिकाम्या जागा, जसजशा आणि जेव्हा त्या निर्माण होतील तेव्हा, उक्त तारखेस किंवा त्यानंतर निर्माण होणाऱ्या रिकाम्या जागांच्या संख्येवर आधारित आवश्यक तो (वाटा) कोटा पूर्ण होईपर्यंत, राखून ठेवण्यात येतील.

[3][(२-अ) राज्य शासन वेळोवेळी देईल अशा सूचनांच्या अधीन राहून, ज्या ज्यावेळी जिल्हा सेवेतील कोणतीही पदे पदोन्नतीने भरावयाची असतील त्या त्यावेळी, पुढील मागासवर्गातील प्रत्येक जातीच्या सदस्यांसाठी, ज्या श्रेणी व सेवेत नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक नाही त्या श्रेणी व सेवेतील वरिष्ठ पदांची जबाबदारी पेलण्याच्या योग्यतेच्या अधिन राहून सेवा ज्येष्ठतेच्या मूलाधारावर केलेल्या बढत्यांमध्ये राखीव जागा ठेवण्यात येतील. त्या अशा :—

(एक) अनुसूचित जाती आणि बौद्ध धर्म स्वीकारलेल्या अनुसूचित जाती यांच्या सदस्यांकरिता १३ टक्के,

(दोन) विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर राहणाऱ्या अनुसूचित जमाती धरून, अनुसूचित जमातीच्या सदस्यांकरिता ७ टक्के, आणि

(तीन) अनुसूचीत जमाती आणि भटक्या जमाती यांच्या सदस्यांकरिता ४ टक्के.]

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ सप्टेंबर १९७५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ सप्टेंबर १९७५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ सप्टेंबर १९७५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][(३) ज्यावेळी मागासवर्गातील विशिष्ट जातीसाठी राखून ठेवण्यात आलेली पदे, त्या विशिष्ट जातीतील योग्य उमेदवारांच्या अभावी, त्या जातीच्या उमेदवारांमधून भरता आली नसतील त्याबाबतीत ती पदे जोपर्यंत रिक्त ठेवण्यात येतील व ज्यांच्यासाठी ती राखीव आहेत त्या विशिष्ट जातीच्या उमेदवारांमधून ती पदे भरण्यात येतील तोपर्यंत तशीच पुढे चालू ठेवण्यात येतील :

परंतु नामनिर्देशनाने करावयाच्या सेवा प्रवेशाच्या बाबतीत उक्त पदे अशाप्रकारे ५ वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी पुढे चालू ठेवण्यात येणार नाहीत, आणि असे की, सर्वसाधारण राखीव पदांची एकूण संख्या ही सेवाभरतीच्या कोणत्याही प्रसंगी रिक्त असणाऱ्या पदांच्या एकूण संख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक होता कामा नये :

परंतु आणखी असे की, ५० टक्क्यांपेक्षा अधिक असलेली पदे ५ वर्षाहून अधिक मुदतीसाठी ती पुढे चालू ठेवण्यात येणार नाहीत या शर्तीच्या अधीन राहून अशी पदे पुढील सेवा प्रवेशाच्या प्रसंगी चालू ठेवण्यात येतील.

(४) पदोन्नतीने सेवाप्रवेश देण्याच्या बाबतीत जर पोट-नियम (२-अ) मध्ये नमूद करण्यात आलेल्या मागासवर्गातील तीन जातीच्या पदोन्नतीसाठी लायक असलेल्या उमेदवारांची संख्या, त्यांच्यापैकी कोणत्याही जातीसाठी वर्षभरामध्ये राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा कमी भरत असेल, तर मुख्य कार्यकारी अधिकारी अशी कमतरता ज्या रिक्त पदांच्या बाबतीत निर्माण झाली ती रिक्त पदे अराखीव करण्यासाठी प्रस्ताव असल्यास अशा प्रस्तावासह विभागीय आयुक्तांना कळवितील. याबाबतीत कळविण्यात आलेली आकडेवारी तपासून जर कोणतेही रिक्त पद अराखीव करण्याचे विभागीय आयुक्तांकडून मान्य करण्यात आले तर अशा प्रकारे अराखीव करण्यात आलेले रिक्त पद एकत्रित निवड सूचीत समावेश असलेल्या कोणत्याही उमेदवारांच्या नियुक्तीने भरण्यात येईल, आणि ती राखीव जागा, सेवा प्रवेश देण्याच्या पुढील सतत तीन वर्षासाठी पुढे चालू ठेवण्यात येईल.]

८. विभागीय व भाषा परीक्षा आणि प्रशिक्षण.—या नियमांच्या उपबंधानुसार जिल्हा सेवेतील पदावर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी शासनाकडून त्याबाबतीत विहित करण्यात येतील अशा विभागीय आणि भाषा परीक्षा आणि/किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे आवश्यक असेल. [2][विहित नियमांनुसार यापैकी कोणतीही परीक्षा पास होण्यापासून सूट मिळण्यास असे उमेदवार पात्र समजण्यात येतील] त्यांनी, वेळोवेळी शासनाकडून ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेश पूर्व आणि/किंवा सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणेसुद्धा आवश्यक असेल.

९. शासकीय कर्मचारी इत्यादींच्या जिल्हा सेवेत नेमणुका.—राज्य सरकारचा किंवा भारत सरकारचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा किंवा राज्य प्राप्तानुदान संस्थेचा कर्मचारी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने राज्य सरकार, भारत सरकार, स्थानिक प्राधिकरण किंवा यथास्थिती राज्य प्राप्तानुदान संस्था यांची संमती मिळवून नंतर अशा पदाकरीता आपला अर्ज सादर केलेला नसेल तर ती कोणत्याही जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाद्वारे नेमणूक केली जाण्यास पात्र असणार नाही.

स्पष्टीकरण.—कोणत्याही राज्य सरकारचा किंवा भारत सरकारचा कर्मचारी असेल अशा अर्जदाराच्या बाबतीत, संबंधित शासनाने केलेल्या नियमानुसार अर्ज करण्यात आला आहे याबद्दल अग्रेषण अधिकाऱ्याच्या पृष्ठांकनावरून किंवा अन्यथा नियुक्त प्राधिकाऱ्याची खात्री झाली असेल तर संबंधित शासनाची संमती मिळविण्यात आली असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ सप्टेंबर १९७५ अन्वये हा मजकूर, मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १० सप्टेंबर १९८६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



१०. प्रचार केल्याने उमेदवार अनर्ह ठरणे.—उमेदवाराने किंवा त्यांच्या नातलगांनी किंवा मित्रांनी, जिल्हा सेवेतील कोणत्याही पदावरील नेमणुकीबाबतच्या त्याच्या अर्जाचा किंवा अशा सेवेतील कोणत्याही उच्च पदावरील बढतीचा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने पाठिंबा मिळविण्याचा केलेला कोणताही प्रयत्न, त्याला अशा नेमणुकीसाठी किंवा बढतीसाठी अनर्ह ठरवील.

११. निरसन आणि व्यावृत्ती.—या नियमांच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अंमलात असलेले, या नियमासारखेच असलेले सर्व नियम याद्वारे रद्द करण्यात येत आहेत :

परंतु, या नियमांतील कोणत्याही मजकुराचा, विभागीय निवड मंडळाशी किंवा यथास्थिती जिल्हा निवड मंडळाशी, विचारविनिमय करून किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) (निवड मंडळाशी विचारविनिमय केल्याशिवाय) नियम, १९६५ यास अनुसरून नियुक्ती प्राधिकरणाकडून, या नियमांच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी, कोणत्याही नेमणूकांच्या किंवा नेमणुकांच्या वर्गाच्या संबंधात याबाबतीत कारणे लेखी नमूद करून शासनाकडून अन्यथा निदेश देण्यात आलेला नसेल तर, नामनिर्देशन करून करण्यात आलेल्या नेमणुकांवर परिणाम होणार नाही.

## वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना

(नियम ४ पहा)

मी याद्वारे प्रमाणित करतो की, .................. जिल्हा परिषदेच्या (                ) संवर्गातील (                ) पदावर नेमणूक करण्यासाठी असलेले उमेदवार अ, ब, यांची तपासणी केली आणि त्याला/तिला .................. व्यतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग, शारीरिक दौबल्य किंवा शारीरिक अपंगत्व असल्याचे आढळले नाही. ही गोष्ट (                ) कार्यालयात (                ) म्हणून नेमणुकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही. अ, ब, च्या स्वतःच्या निवेदनावरून त्याचे/तिचे वय .......... वर्षे आहे आणि दिसण्यावरून तो/ती सुमारे .......... वर्षे वयाचा/वयाची आहे. त्याला/तिला लस टोचण्यात आली आहे.

ओळख चिन्हे ..................

..................

डाव्या हाताच्या आंगठ्याचा ठसा ..................

वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम.

## परिशिष्ट एक

[नियम ५ पहा]

जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि) व जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कृषि) यात समाविष्ट असलेल्या पदांवरील नेमणुकीकरिता उमेदवारांच्या अर्हता व नेमणुका करण्याच्या पद्धती नमूद करणारे नियम

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि) प्रथम श्रेणी. | [1][* * * *] (दोन) कृषि अधिकारी. | (१) (अ) ज्या व्यक्तीने,— (एक) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयावरील पदवी किंवा इतर कोणतीही तुल्य अर्हता धारण केली असेल आणि जिने त्या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल, किंवा (दोन) जर तिने कृषि विषयातील पदवी किंवा त्यांच्या समतुल्य अर्हता धारण केली नसेल तर, त्या श्रेणीत सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल, अशा जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि), श्रेणी दोनमधील व्यक्तींची पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल. किंवा (ब) जे उमेदवार— (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून त्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि (दोन) ज्यांनी कृषि विषयातील मान्यताप्राप्त स्नातकोत्तर पदवी किंवा कमीत कमी सतत तीन वर्षांच्या मुदतीच्या कृषिविषयक कामाच्या अनुभवासह, कृषि विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा कोणतीही इतर तुल्य अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

## परिशिष्ट एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | (२) आवश्यकता व उपलब्धता यांस अधीन राहून, नामनिर्देशनाद्वारे [1][४० टक्क्यापर्यंत] सेवा प्रवेश देण्यांत येईल : परंतु द्वितीय श्रेणीमधील ज्या व्यक्तींनी सेवेत असताना, कृषि विषयातील स्नातकोत्तर अर्हता प्राप्त केली असेल अशा व्यक्ती नामनिर्देशनाच्या कोटयाच्या प्रमाणात या श्रेणीत पदोन्नती मिळण्यासाठी पात्र असतील. |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि) द्वितीय श्रेणी. | [2][* * * *] (दोन) कृषि पर्यवेक्षक. | (१) (अ) ज्यांनी जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि), श्रेणी तीनमध्ये अखंड सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी सेवा पूर्ण केली असेल व जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर कोणतीही तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा व्यक्तींना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. अशा व्यक्तींपैकी ज्या कृषि हा विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेत किंवा तुल्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या असतील त्यांना अधिक पसंती देण्यात येईल : परंतु, जे मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कृषि विषयाचे पदवीधर असतील किंवा ज्यांनी इतर कोणतीही तुल्य अर्हता धारण केली असेल अशांच्या बाबतीत, तिसऱ्या श्रेणीतील सात वर्ष किमान सेवेबाबतची शर्त एक वर्षपर्यंत कमी करण्यात येईल. किंवा (ब) जे उमेदवार— (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [3][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ डिसेंबर १९७२ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

परिशिष्ट एक—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे कृषि विषयातील पदवीधर असतील किंवा इतर कोणतीही तुल्य अर्हता धारण करीत असतील अशा उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल : परंतु सेवेत असताना ज्यांनी कृषि विषयातील पदवी किंवा तुल्य अर्हता संपादन केली असेल असे. [1][* * * * * *] कनिष्ठ कृषि पर्यवेक्षक [2][ग्रामविकास अधिकारी] ग्रामसेवक,—[3][* * * * *] किंवा सहाय्यक विस्तार अधिकारी (कृषि) हे नामनिर्देशनाच्या कोटयाच्या प्रमाणात या श्रेणीवर पदोन्नती मिळण्याकरिता पात्र असतील. (२) २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतकी पदे पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील. |
| ३. | [4][जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि)] तृतीय श्रेणी. | कनिष्ठ कृषि पर्यवेक्षक. | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कृषि) प्रथम श्रेणीमध्ये ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींमधून पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| ४. | [5][जिल्हा सेवा (वर्ग तीन) (कृषि) प्रथम श्रेणी. | दुय्यम सहाय्यक विस्तार अधिकारी (कृषि) | (एक) जे उमेदवार आधींपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[4] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला
[5] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.

परिशिष्ट एक—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (दोन) जे सातवी इयत्ता उत्तीर्ण झाले असतील, आणि (अ) ज्यांनी राज्य सरकारकडून मान्यता मिळालेल्या कृषि शाळेतील दोन वर्षांचा पाठयक्रम किंवा राज्य सरकारने तत्सम म्हणून जाहीर केलेला इतर कोणताही पाठयक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला असेल, किंवा (ब) ज्यांचे कृषिसंबंधी आवश्यक मूलोद्योग प्रशिक्षण झाले असेल म्हणजेच, राज्य सरकार विनिर्दिष्ट करील अशा प्रशिक्षण केंद्रात एक वर्षाचा पाठयक्रम यशस्वीरीत्या ज्यांनी पूर्ण केला असेल, किंवा (क) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा, कृषि विषयासह उत्तीर्ण झाले असतील. अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.] |
| | [1][* * * *] | | |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २० नोव्हेंबर १९७८ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कृषि) | विस्तार अधिकारी (कृषि) | १ (अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी व ग्राम विस्तार) तृतीय श्रेणीमधील व्यक्तींची एकतर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा,<br>(ब) जे उमेदवार—<br>(१) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(२) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषिविषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पद्धतीचे व्यवसायाचे ज्ञान व ग्रामीण जीवनाचा अनुभव असेल अशा उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>२. ५० टक्क्यांपेक्षा अधिक नसतील एवढी पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येतील. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## परिशिष्ट दोन

(नियम ५ पहा)

**जिल्हा तांत्रिक (वर्ग तीन) (पशुसंवर्धन) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम पशुसंवर्धन) यात समाविष्ट असलेल्या पदांवरील नेमणुकीकरिता उमेदवारांची अर्हता व नेमणूक करण्याच्या पद्धती नमूद करणारे नियम**

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| [१][ * | * | * | * * * * * * ] |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (पशुसंवर्धन) द्वितीय श्रेणी. | [२][ पशुवैद्यकीय अधिकारी ] | (१) (अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (पशुसंवर्धन), श्रेणी तीन मधील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील सात वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली आहे आणि जे कमीत कमी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशा व्यक्तींची एक तर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल, किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) जे कोणत्याही मान्यताप्राप्त महाविद्यालयाची पशुवैद्यक शास्त्रातील पदवी किंवा मान्यताप्राप्त संस्थेच्या पशुवैद्यक शास्त्रातील पदविका धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. त्याबाबतीत महाराष्ट्र राज्याच्या वृत्तिधारी उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>(२) २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसतील एवढी पदे पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) ¹[सहाय्यक पशुसंवर्धन अधिकारी] (पशुसंवर्धन) तृतीय श्रेणी. | | ²[जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम पशुसंवर्धन) प्रथमश्रेणी मधील पशुधन पर्यवेक्षक पदावर कमीत कमी तीन वर्षे अखंड सेवा केली असेल अशा पशुधन पर्यवेक्षकांना पदोन्नती देवून नेमणूक करण्यात येईल.] |
| ४ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) ³[पशुधन पर्यवेशक] (दुय्यम पशुसवर्धन) प्रथम श्रेणी. | | ⁴]१. नेमणुक पुढील पैकी कोणत्याही एकापद्धतीने करण्यात येईल :—<br>(अ) जिने जिल्हा परीषदेत पशुधन पर्यवेक्षक या पदाच्या दर्जाखालील वर्ग तीनचे पद धारण करून त्या पदावर कमीत कमी तीन वर्षे अखंड सेवा केली असेल व नामनिर्देशनाने नेमणूक होण्यासाठी, खंड (ब) चा उपखंड (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता जी धारण करीत असेल अशा सुयोग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन :<br>परंतु जिल्हा परिषदेतील पशुसंवर्धन विभागात वर्ग चार चे पद धारण करीत असलेली आणि नामनिर्देशनाने नेमूणूक होण्यासाठी खंड (ब) चा उपखंड (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती सुद्धा पदोन्नतीव्दारे नेमणूक होण्यासाठी विहित केलेल्या कोटया-मध्ये पदोन्नती देण्यासाठी पात्र असेल, किंवा<br>(ब) पुढील उमेदवारांपैकी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करून—<br>(एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून नसल्यास ज्यांचे वय २८, वर्षापेक्षा अधिक नसेल असे उमेदवार. |

¹ शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
² शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
³ शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
⁴ शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.





| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (दोन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संचालकांकडून घेण्यात येणाऱ्या किंवा महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही वैधानिक कृषि विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण पाठ्यक्रमात उत्तीर्ण झाले असतील किंवा तांत्रिक परीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून घेण्यात येणाऱ्या दुग्धशाळा क्षेत्र व्यवस्थपनातील दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार.<br>२. पदोन्नतीने व नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाणे ३ : १ असेल.<br>३. नामनिर्देशनाने नेमणूक केलेला उमेदवार १ वर्षाच्या मुदतीत परिविक्षाधीन असेल.] |
| ५ ¹[ * | * | * * | * * * * ] |
| ६ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम पशुसंवर्धन), द्वितीय श्रेणी. | ²[ * * * * ] (दोन) पशुवैद्यकीय मिश्रक. | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर यातील ज्या पशुवैद्यकीय व्रणोपचारकांनी महाराष्ट्र सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने ³[दिलेले प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र धारण केले असेल] आणि ज्यानी व्रणोपचारक म्हणून पाच वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा केली अशा पशुवैद्यकीय व्रणोपचारकांची पदोन्नती करून त्याद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

शा. नि. क्र. कार्यमं २४०६/प्र.क्र. ११८०/अस्था-१०/ दि. २०/२/०६ नुसार पदोन्नती व नामनिर्देशनाव्दारे भरावयाचे प्रमाण १:३

¹ शासकीय अधिसूचना, दिनांक २ मे १९९१ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.
² वरीलप्रमाणे.
³ शासकीय अधिसूचना, दिनांक ९ जानेवारी १९७४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (सहकार) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम सहकार) यांत समाविष्ट असलेल्या पदांवरील नेमणूकीकरिता उमेदवारांच्या अर्हता व नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम.**

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हातांत्रिक सेवा (वर्ग तीन) (सहकारी) प्रथम श्रेणी. | (एक) वरिष्ठ विस्तार अधिकारी (सहकारी).<br>(दोन) वरिष्ठ सहकार अधिकारी. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (सहकार) श्रेणी दोन यातील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल आणि सहकार व लेखाशास्त्र यातील सरकारी पदविका किंवा तुल्य परीक्षा आणि निबंधक, सहकारी संस्था यांनी घेतलेली लेखा चाचणी उत्तीर्ण झाल्या असतील अशा व्यक्तींना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, जेव्हा लेखा चाचणी उत्तीर्ण झालेल्या व्यक्ती उपलब्ध नसतील तेव्हा लेखा चाचणी उत्तीर्ण झालेल्या नसतील त्या व्यक्तींना, त्यांच्या पदोन्नतीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत या चाचणी परिक्षेत उत्तीर्ण झाले पाहिजे व चाचणी उत्तीर्ण न झाल्यास त्यांना पदावनत करण्यात येईल. या अटीवर पदोन्नती देण्यात येईल. |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (सहकारी) द्वितीय श्रेणी. | (एक) विस्तार अधिकारी (सहकारी)<br>(दोन) सहकार अधिकारी. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (सहकार) श्रेणी तीन यातील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल, आणि ज्या व्यक्ती सहकार व लेखाशास्त्र यातील सरकारी पदविका किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाल्या असतील अशा व्यक्तींना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, जेव्हा सहकार व लेखाशास्त्र यातील पदविका किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्ती उपलब्ध नसतील, तेव्हा सहकार व लेखाशास्त्र यातील |



**परिशिष्ट तीन—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | सरकारी पदविका किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाल्या नसतील त्या व्यक्तींना त्यांच्या पदोन्नतीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीच्या आत या चाचणी परिक्षेत उत्तीर्ण झाले पाहिजे व चाचणी उत्तीर्ण न झाल्यास त्यांना पदावनत करण्यात येईल या अटीवर पदोन्नती देण्यात येईल :<br>आणखी असे की, ज्यांच्या वयाला ४५ वर्षे पूर्ण झाली असतील अशा व्यक्तींच्या बाबतीत, त्यांची सेवा व अनुभव लक्षात घेऊन आयुक्त, त्यांना सहकार व लेखाशास्त्र यातील पदविका परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट देऊ शकतील. |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (सहकार) तृतीय श्रेणी. | (एक) कनिष्ठ विस्तार अधिकारी (सहकार).<br>(दोन) कनिष्ठ सहकार अधिकारी. | (१) (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम सहकार) प्रथम श्रेणी [1][किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कार्यकारी अधिकारी व ग्राम विस्तार) (प्रथम श्रेणी) मधील ग्राम सेवक] यातील ज्या व्यक्ती माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाल्या असतील आणि ज्यांनी त्या श्रेणीतील ४ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींची पदोन्नतीव्दारे नेमणूका करण्यात येईल, किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][(२८)] वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) वाङमय, विज्ञान, वाणिज्य, कृषि किंवा विधी या विषयातील मान्यता प्राप्त पदवी ज्यांनी संपादन केली असेल अशा उमेदवारांचेमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. अशा वेळी सहकार व लेखाशास्त्र यातील सरकारी पदविका जे उत्तीर्ण झाले असतील किंवा मान्यता प्राप्त स्नातकोत्तर पदविका किंवा सहकार व संलग्न विषयातील स्नातकोत्तर पदवी, ज्यांनी धारण केली असेल अशा उमेदवारांना विशेष पसंती देण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ जानेवारी १९७२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | (२) ४० टक्क्यापेक्षा अधिक नसतील एवढी पदे पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील. |
| ४ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम सहकार) प्रथम श्रेणी. | (एक) सहायक विस्तार अधिकारी (सहकार)<br>(दोन) सहकार पर्यवेक्षक. | (१) (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम सहकार) श्रेणी दोनमधील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील पाच वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल त्या व्यक्तींची एकतर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल—गट कार्यवाह किंवा सहकारी संघटनांचे कार्यवाह यांच्या बाबतीत वयोमर्यादा ३५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल आणि<br>(दोन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, किंवा<br>प्रादेशिक सहकारी शाळेचे पदविका पाठ्यक्रम प्रमाणपत्र धारण केले असेल किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी संघटनेद्वारे घेण्यात येणारी तुल्य परीक्षा जे उत्तीर्ण झाले असतील, किंवा<br>जे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा मराठीमध्ये उत्तीर्ण झालेले गट कार्यवाह किंवा कार्यवाह असतील आणि ज्यांना सहकारी संस्थांच्या पर्यवेक्षण, निरीक्षण किंवा व्यवस्थापन याचा पाच वर्षापेक्षा कमी नसेल एवढा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि प्रादेशिक सहकारी शाळेचा सहकारी पदविका पाठ्यक्रम किंवा महाराष्ट्र राज्य सहकारी संघटनेद्वारा घेण्यात येणारी तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले |

२४

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट तीन—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | असतील किंवा ज्यांना सहकारी संस्थांचे पर्यवेक्षक, निरीक्षण किंवा व्यवस्थापन यातील कमीत कमी एक वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारांना प्रथम पसंती देण्यात येईल.<br>(२) नामनिर्देशनाद्वारे किंवा पदोन्नतीव्दारे नेमण्यात आलेल्या व्यक्तीस, जर ती आधीच प्रादेशिक सहकारी शाळेची परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल, तर, तिला प्रशिक्षणाकरिता पाठविल्याच्या लगत नंतर दोन वेळा लागोपाठ मिळणाऱ्या संधीत प्रादेशिक सहकारी शाळेची सहकारी पदविका परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक करण्यात येईल. विहित केलेल्या मुदतीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास नामनिर्देशनाव्दारे नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत पदावरील नेमणुका त्यांना सोडून द्यावी लागेल व पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात आलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, त्यांचे निम्न श्रेणीत प्रत्यावर्तन होईल :<br>परंतु, योग्य बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, परिक्षा उत्तीर्ण होण्याचा कालावधी एक किंवा दोन वर्षानी वाढवू शकतील किंवा विशेष कारणे लेखी नमूद करून ती परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देऊ शकेल.<br>(३) पदांच्या २५ टक्क्यापेक्षा अधिक नसतील एवढी पदे पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील. |
| ५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम सहकार) द्वितीय श्रेणी. | कनिष्ठ सहकार पर्यवेक्षक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्याचे वय [१][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) जे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. |

२५

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(भाग एक)

(नियम ५ पहा)

**जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) यात समाविष्ट असलेल्या पदांच्या नेमणुकीकरीता उमेदवारांच्या अर्हता व नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम.**

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) प्रथम श्रेणी. | (एक) वरिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण).<br>(दोन) सहाय्यक शिक्षण अधिकारी (वरिष्ठ), | १. जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक), श्रेणी दोन मधील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील तीन वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे व जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) यातील माध्यमिक शाळांतील प्रशिक्षित स्नातक सहाय्यक शिक्षक असून ज्यांना बी. एड. पदवी घेतल्यानंतरच्या ६ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल अशा व्यक्तींची पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>२. माध्यमिक शाळांतील सहाय्यक शिक्षकांच्या पदोन्नतीचे प्रमाण २० टक्क्यां-पेक्षा अधिक नसेल. |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) द्वितीय श्रेणी. | (एक) विस्तार अधिकारी (शिक्षण)<br>(दोन) सहाय्यक शिक्षण अधिकारी<br>(तीन) वरिष्ठ सहाय्यक शिक्षण उप निरीक्षक. | १. (अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) श्रेणी तीनमधील ज्या व्यक्तींनी त्या श्रेणीतील ५ वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींची एकतर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[2][* - * * * *] किंवा<br>[1][(ब) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) मधील सहाय्यक शिक्षक आणि जिल्हा सेवा (वर्गतीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शिक्षक व अध्यापक ज्यांना--<br>(एक) बी. एड. पदवी (किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतील अगर कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापनाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असेल, किंवा |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ एप्रिल १९७५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ डिसेंबर १९८३ अन्वये हा मजकूर वगळण्यात यावा.



**परिशिष्ट चार—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (दोन) बी. एड. पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असेल किंवा<br>(तीन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरच्या पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल. अशा शिक्षक व अध्यापकांमधून योग्य उमेदवारांची तात्पुरती बदली करण्यात येईल.]<br>(क) जे उमेदवार--<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे स्नातक असतील, आणि<br>[1][(तीन) (अ) बी. एड. पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) घेतल्या-नंतरच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतील अगर कनिष्ठ महाविद्या-लयातील कमीत कमी तीन वर्षांचा अध्यपनाचा अनुभव असेल किंवा<br>(ब) बी. एड. पदवी (किंवा तुल्य शैक्षणिक अर्हता) धारण केल्यानंतरचा प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा तपासण्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असेल किंवा<br>(क) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा पास झाल्यानंतरच्या पाच वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आणि शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले असेल, अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.]:<br>परंतु, चांगली अर्हता आणि/किंवा अनुभव असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनाक १६ एप्रिल १९७५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | [1][परंतु आणखी असे की, जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) मधील सहाय्यक शिक्षक किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शाळा शिक्षक हे जर दिनांक १ जानेवारी १९७६ रोजी एक वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी विस्तार अधिकारी (शिक्षण) द्वितीय श्रेणी किंवा वरिष्ठ सहाय्यक शिक्षक उप निरीक्षक हे पद धारण करीत असतील तर नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी अशा सहाय्यक शिक्षकांच्या किंवा प्राथमिक शिक्षकांच्य बदलीने /तात्पुरत्या बदलीने अगोदरच केलेल्या नेमणुकांवर या नियमातील कशाचाही परिणाम होणार नाही.] <br> २. ७५ टक्क्यापेक्षां कमी नसतील एवढी पदे नामनिर्देशनाव्दारे व बदलीद्वारे भरण्यात येतील. <br> ३. या पदांवर नेमण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांनी समाज शिक्षणाचा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक करता येईल. त्यांच्यापैकी प्रशिक्षण घेण्याकरिता ज्यांची निवड झाली असेल त्यांनी सोबत जोडलेल्या नमुना "अ" मधील करारनामा करून दिला पाहिजे. |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) तृतीय श्रेणी. | (एक) कनिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण). <br> (दोन) सहायक शिक्षण उप निरीक्षक <br> (तीन) सहाय्यक शिक्षण अधिकारी (कनिष्ठ) | (१) जे उमेदवार— <br> (अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र व एस. टी. सी. किंवा तुल्य आहे ता धारण करीत असतील व ज्यांना माध्यमिक किंवा पूर्ण माध्यमिक शाळांतील कमीत कमी ७ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल असे सहायक अध्यापक, सहायक अध्यापिका, चित्रकला शिक्षक, हिंदी शिक्षक व गृहविज्ञान अध्यापक/अध्यापिका : <br> परंतु जे बी. ए. किंवा बी. एस. सी. व एस. टी. सी. किंवा टी. डी. आहेत अशांच्या बाबतीत अध्यापनाचा अनुभव ३ वर्षांपर्यंत अनुभव ३ वर्षापर्यंत कमी करता येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ जून १९७९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.





| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (ब) असे जे प्रकृतिने सुदृढ असतील असे जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) व जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यातील अधिकृत नगरपालिका यातील [1][ * * * * ] आणि <br> (एक) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशांच्या बाबतीत अध्यापन अर्हता मिळविल्यानंतर १० वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल किंवा जे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशांच्या बाबतीत अध्यापन अर्हता मिळविल्यानंतर १५ वर्षांची अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल. किंवा <br> (दोन) सेवेत असतांना जे पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले असतील व बी.एड किंवा तुल्य पदवी ज्यांनी धारण केली असेल व प्रशिक्षित (प्राथमिक) शिक्षक म्हणून ७ वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल असे प्रशिक्षित प्राथमिक शिक्षक. <br> (क) ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र व एस. टी. सी. प्रमापणपत्र धारण केले असेल आणि त्या श्रेणीतील सात वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल असे जिल्हा सेवा (वर्ग तीन) दुय्यम शैक्षणिक श्रेणी एक मधील सहाय्यक विस्तार अधिकारी (शिक्षण) व शिक्षण सहाय्यक <br> (२) ७५ टक्क्यापेक्षा कमी होणार नाहीत एवढी पदे वरील प्रकार (१) (ब) मध्ये येणाऱ्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नतीद्वारे भरण्यांत येतील. <br> (३) या पदांवर नेमण्यांत आलेल्या व्यक्तींना त्यानी समाज शिक्षणाचा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करणे आवश्यक करता येईल हे प्रशिक्षण घेण्यांकरिता ज्यांची निवड झाली असेल त्यांनी सोबत जोडलेल्या नमुना "अ" मधील करारनामा करून दिला पाहिजे. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ११ जानेवारी, १९७१ अन्वये हा मजकूर गाळण्यात आला.

४ [1][* * * *]

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) प्रथम श्रेणी. | (दुय्यम (एक) सहाय्यक विस्तार अधिकारी (शिक्षण). (दोन) शिक्षण सहाय्यक | (अ) ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र आणि एस. टी. सी. किंवा इतर कोणतेही तुल्य अर्हता धारण केली असेल व ज्यांना दोन वर्षापेक्षा कमी नसेल एवढा अध्यापनाचा अनुभव असेल अशा सहाय्यक अध्यापक व सहाय्यक अध्यापिकांच्या एकतर तात्पुरत्या बदलीव्दारे नेमणुका करण्यात येतील, किंवा (ब) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशांच्या बाबतीत अध्यापन अर्हता मिळविल्यानंतर ५ वर्षापेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल व जे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र, परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशांच्या बाबतीत अध्यापन अर्हता मिळविल्यानंतर १० वर्षाची अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल अशा निवड श्रेणी पद धारण करणाऱ्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांच्या तात्पुरत्या बदलीव्दारे नेमणूक करण्यात येईल. |
| | [2][* * * *] [3][* * * *] जिल्हा सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) व्दितीय श्रेणी. | (दुय्यम कनिष्ठ शिक्षण सहाय्यक | जे उमेदवार— (एक) आधिपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [4](२८) वर्षापेक्षा अधिक नसेल आणि (दोन) जे प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, अशा उमेदवाराच्या नामनिर्देशनाद्वारे नेमणुका करण्यात येतील. |

[1], [2] व [3] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ डिसेंबर १९८३ अन्वये गाळण्यात आला.

[4] शासकीय अधिसूचना दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



## नमुना "अ"

[परिशिष्ट ४ भाग १ चे नियम २(३), ३ व ४(३) पहा.]

या अधिलेखाद्वारे सर्व लोकांस ज्ञात व्हावे की, .......................... येथील मी .......................... (ज्याचा यात यापुढे "प्रशिक्षार्थी" असा उल्लेख करण्यात आला आहे.) जिल्हा परिषदेतील (जिचा यात यापुढे "परिषद" असा उल्लेख करण्यात आला आहे.) .......................... यांना द्यावयाची रु. ....... (रु. ) परिषदेस देण्यास बद्ध झालो आहे व दृढतापूर्वक बांधला गेलो आहे व ती रक्कम योग्य व रास्तपणे देण्यास मी या अधिलेखाद्वारे मला स्वत:ला, माझ्या वारसांना, मृत्यूपत्र व्यवस्थापकांना, कारभाऱ्यांना व वैध प्रतिनिधींना या अधिलेखाद्वारे बांधून घेत आहे. .......... १९ रोजी यावर सही केली.

ज्याअर्थी, ................ येथील प्रशिक्षण केंद्रात ......... मुदतीसाठी समाज शिक्षण व समाजकल्याण अधिकारी (पुरुष/समाज शिक्षण व समाजकल्याण अधिकारी (स्त्री) या पदाच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी (ज्याचा यात यापुढे "उक्त पाठ्यक्रम" असा उल्लेख करण्यात आला आहे) परिषदेने या प्रशिक्षणार्थीची निवड केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्या पदासाठी जिल्हा परिषद विहित करील असे वेतन व भत्ते यावर तीन वर्षे मुदतीसाठी प्रशिक्षणार्थी ......... म्हणून जिल्हा परिषदेची सेवा करील व त्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्या नावाने आवश्यक ते बंधपत्र करून देईल व या शर्तीवर, परिषदेने प्रशिक्षणार्थी प्रशिक्षण घेत असताना इतर गोष्टींबरोबर रु. .......... चे विद्यावेतन व वेतन व भत्ते यासह रु. .......... वित्त लब्धी देण्याचे मान्य केले आहे.

त्याअर्थी, आता प्रशिक्षणार्थीने पुढील गोष्टी केल्यास हे बंधपत्र निरर्थक होईल. अन्यथा ते पूर्णपणे अंमलात राहील.—(१) प्रशिक्षणार्थी, उक्त पाठ्यक्रम साक्षेपाने चालू ठेवील व पूर्ण करील आणि उक्त पाठ्यक्रमासाठी परिषदेकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा नियमांचे पालन करील आणि प्रशिक्षण घेत असताना चांगली वर्तणूक ठेवील व उक्त पाठ्यक्रमाला नियमितपणे उपस्थित राहील व परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्याबाबत त्याने नामनिर्दिष्ट केलेला अधिकारी यांच्या मते समाधानकारक असेल अशी प्रगती करील व विहित केलेल्या सर्व परीक्षा पहिल्या प्रयत्नातच उत्तीर्ण होईल.

(२) प्रशिक्षणार्थी स्वेच्छेने, उक्त पाठ्यक्रम पूर्ण होण्यापूर्वी व परिषदेच्या पूर्व परवानगीशिवाय उक्त पाठक्रम बंद करणार नाही व गैरवर्तणूक, प्रशिक्षणास उपस्थित राहण्यास हयगय किंवा चुकारपणा, आळशीपणा किंवा गैरशिस्त यासाठी परिषदेकडून त्याला मुक्त करण्यात, काढून टाकण्यात, किंवा बडतर्फ करण्यात आलेले नसेल, आणि

(३) उक्त पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर व उक्त पाठक्रमाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, उक्त पाठक्रम पूर्ण केल्यासंबंधी प्रशिक्षणार्थीने दिलेली नोटीस परिषदेस मिळाल्यापासून ...... च्या आत परिषदेने सेवा करण्यात सांगितले असता परिषदेत सेवा करील, अशी वरील नोटीस प्रशिक्षार्थीने उक्त पाठक्रम संपल्यावर ............ यास ............ म्हणून तावडतोब दिली पाहिजे व ती परिषदेने त्या पदासाठी ठरविलेल्या वेतनश्रेणीवर केलेल्या नेमणुकीच्या तारखेपासून किमान तीन वर्षाच्या मुदतीसाठी असली पाहिजे अन्यथा ती पूर्णपणे अंमलात व आधारभूत राहील.

याद्वारे असा करार करण्यात येत आहे की, प्रशिक्षार्थीने उपरोक्त अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त संपूर्ण रक्कम रु. ......... किंवा त्या मुदतीपर्यंत

परिषदेने आणि शासनाने अशा प्रशिक्षणासाठी प्रशिक्षार्थीला दिलेली पाठ्यवेतन आणि अनुषंगिक खर्च यासह वेतन व भत्ते मिळून असलेली वित्तलब्धी म्हणून त्यास देण्यात आलेली त्यापेक्षा कमी असलेली रक्कम ठरविण्यात येईल एवढी, परिषदेचा व शासनाला झालेल्या नुकसानाच्या भरपाईसाठी मान्य केलेली रक्कम प्रशिक्षार्थीने परिषदेला आणि शासनाला ताबडतोब देय होईल आणि अशा रीतीने प्रशिक्षार्थीने द्यावयाची रक्कम परिषदेचे कोणतेही अधिकार व उपाययोजना यांना बाध न आणता जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

या गोष्टीची साक्ष म्हणून उपरिनामित प्रशिक्षार्थीने वर लिहिलेल्या दिवशी व वर्षी सही केली आहे.

उपरिनामित प्रशिक्षणार्थी श्री. .................. यांनी खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून स्वाधीन केले.

(१) ..........................

(२) ..........................



परिशिष्ट चार

(भाग दोन)

(नियम ५ पहा)

**जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) आणि जिल्हा सेवा (वर्ग ती ) (दुय्यम शैक्षणिक) यामध्ये समाविष्ट असलेल्या पदांवरील नेमणुकीकरिता उमेदवारांची अर्हता व नेमणुक करण्याची पद्धती नमूद करणारे नियम.**

(अध्यापन कर्मचारीवर्ग)

| अनुक्रमांक | सेवा व संवर्ग | पद | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका. | (एक) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक. | (एक) ज्यांनी सहायक शिक्षक म्हणून पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) मधील प्रशिक्षित स्नातक सहायक शिक्षकांची पदोन्नती करून, किंवा |
| | | (दोन) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापिका. | (दोन) बी.एड. झाल्यानंतर ज्यांना पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असेल अशा वरिष्ठ सहायक शिक्षण उप-निरीक्षक/विस्तार अधिकारी (शिक्षण) यांची पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल. |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) उच्च माध्यमिक शाळेतील अधिव्याख्याते. | [1][उच्च माध्यमिक शाळेतील (कनिष्ठ महाविद्यालयातील) शिक्षक. | [1][(अ) जे पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील अशा जिल्हा परिषदेच्या अध्यापन कर्मचारीवर्गातील सदस्यांची उपलब्ध रिक्त पदांच्या २५ टक्के इतक्या पदांवर एकतर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल :—<br>(एक) संबंधित विषयाची द्वितीय श्रेणीतील स्नातकोत्तर पदवी आणि महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाने मान्यता दिलेले अध्यापनातील प्रमाणपत्र, किंवा पदविका, किंवा बी.एड. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ जून १९८६ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



(७८)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (दोन) जर उपलब्ध सर्व रिक्त पदे भरण्यासाठी वरील उप-खंड (एक) मध्ये उल्लेखिलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या अध्यापन कर्मचारीवर्गापैकी सदस्य उपलब्ध नसतील, तर पदोन्नतीच्या २५ टक्के पदांपैकी उर्वरित रिक्त पदांवर अध्यापन कर्मचारीवर्गातील संबंधित विषयाची उत्तीर्ण श्रेणीतील (पास क्लास) स्नातकोत्तर पदवी आणि महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाने मान्यता दिलेले, अध्यापनातील प्रमाणपत्र, किंवा पदविका, किंवा बी.एड : <br><br> परंतु असे की, अशा शिक्षकांची पदोन्नतीने केलेली नेमणूक ही एकतर संबंधित विषयाची द्वितीय श्रेणीतील स्नातकोत्तर पदवी ही विहित अर्हता संबंधित शिक्षकांनी पाच वर्षांच्या कालावधीत प्राप्त करणे आवश्यक आहे. आणि वरील उप-खंड (एक) मध्ये उल्लेखित विहित अर्हता प्राप्त करीपर्यंत अर्हताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय शिक्षकांसाठी नमूद केलेल्या वेतनश्रेणीसाठी ते पात्र होणार नाहीत, या अटीच्या अधीन राहून करण्यात येईल, किंवा <br><br> (ब) जे उमेदवार— <br><br> (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधीक नसेल, आणि <br><br> (दोन) संबंधित विषयातील द्वितीय श्रेणीतील स्नातकोत्तर पदवी आणि महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाने मान्यता दिलेले अध्यापन प्रमाणपत्र किंवा पदविका, किंवा बी.एड. अर्हता धारण करीत असतील, किंवा <br><br> (तीन) लेखा शास्त्रातील सनदीसह वाणिज्य विषयाची द्वितीय श्रेणीतील पदवी धारण करीत असतील असे उमेदवार, जे अगोदरच लेखाशास्त्रातील सनद ही व्यावसायिक अर्हता धारण करतात त्यांनी शासनाच्या शिक्षण विभागाने मान्यता दिलेले अध्यापनाचे प्रमाणपत्र. किंवा पदविका, किंवा बी.एड. ही व्यावसायिक अर्हता प्राप्त करण्याची आवश्यकता नाही, किंवा |

३४



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (चार) विज्ञान शास्त्राची द्वितीय श्रेणीतील पदवी (म्हणजे बी.एस.सी. किंवा बी.टेक. पदवी) धारण करीत असतील अशा उमेदवारांनी शासनाच्या शिक्षण विभागाचे मान्यताप्राप्त अध्यापन प्रमाणपत्र., किंवा बी.एड. किंवा पदविका ही व्यवसायिक अर्हता, त्यांच्या नियुक्तीच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीत प्राप्त करणे आवश्यक असेल. तसे न केल्यास त्यांना विहित वेतन श्रेणीत पुढील वार्षिक वेतन वाढीचा हक्क नसेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. <br><br> आवश्यकतेच्या व योग्य उमेदवारांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून ७५ टक्क्यांपर्यंत सेवा प्रवेश नामनिर्देशनाद्वारे देण्यात येईल. <br><br> वरील नियम (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सन १९७५–७६ या शैक्षणिक वर्षामध्ये पदोन्नती किंवा नामनिर्देशन याद्वारे अगोदरच नियुक्त करण्यात आलेले पुढील शैक्षणिक अर्हता धारण करणारे शिक्षक, दिनांक १२ जुलै १९८४ च्या शिक्षण व सेवायोजन विभागाच्या शासन निर्णय, क्र. एचएससी-१३८३/२१८७४/(१९१०८) एचएसई-एक, अन्वये त्या विभागाकडून विहित करण्यात आल्याप्रमाणे ठराविक मुदतीत द्वितीय श्रेणीतील स्नातकोत्तर पदवी, ही विहित केलेली कमीत कमी शैक्षणिक अर्हता प्राप्त करणे आवश्यक असेल व तसे न केल्यास त्याची विहित वेतनश्रेणीतील पुढील वार्षिक वेतनवाढ घेण्याचा त्यांना हक्क नसेल. या अटीवर त्या पदावर पुढे चालू राहतील :— <br><br> (एक) संबंधित विषयाची कमीत कमी द्वितीय श्रेणीतील पदवी आणि ८ वी पासून १०/११ वीच्या वर्गांना शिकविण्याच्या ७ वर्षांच्या अनुभवासह बी.एड. <br><br> (दोन) संबंधित विषयाची उत्तीर्ण श्रेणीतील (पास क्लास) पदवी अधिक ८ वी ते १०/११ वीच्या वर्गांना शिकविण्याच्या १० वर्षांच्या अनुभवासह बी.एड.] |

३५

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) शाळा समुपदेष्टा. | शाळा समुपदेष्टा . . | . . (१) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) ज्यांना मराठीचे पुरेसे ज्ञान असेल, आणि<br>(तीन) जे पुढील अर्हता धारण करीत असतील.<br>(अ) बी.टी./बी.एड. अधिक व्यवसाय निर्देषकासाठी आवश्यक अशी अर्हता<br>किंवा<br>(ब) प्रायोगिक मानसशास्त्र हा विषय घेऊन एम.एड.<br>(क) व्यवसाय मार्गदर्शन हा विषय घेऊन बी.एड.<br>किंवा<br>(ड) समग्र मानसशास्त्र हा विषय घेऊन एम.ए.<br>अशा उमेदवारांमधील नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु असाधारण अर्हता आणि/किंवा अनुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी, वयोमर्यादा ३५ वर्षेपर्यंत शिथिल करू शकेल.<br>(२) उमेदवारांना, महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय मार्गदर्शनाचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. त्यांना जोडलेल्या नमुना "ब" मध्ये करारनामाही करून घ्यावा लागेल. |



| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ४ | जिल्हा (शैक्षणिक) तांत्रिक सेवा (वर्ग तीन) शिक्षक. | माध्यमिक शाळेतील सहायक शिक्षक. | [1][(१) नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—<br>(अ) ज्यांनी या नियमाच्या खंड (ब) मध्ये नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेली आहे आणि पूर्व माध्यमिक शाळांतील सहाय्यक अध्यापक किंवा सहाय्यक अध्यापिका, माध्यमिक शाळांतील हिंदी शिक्षक, स्नातकोतर हिंदी शिक्षक, शिल्प शिक्षक, संगीत शिक्षक आणि विणकाम शिक्षक, चित्रकला शिक्षक किंवा चित्रकला अध्यापक, कनिष्ठ चित्रकला शिक्षक किंवा चित्रकला अध्यापक, गृह विज्ञान अध्यापक, गृह विज्ञान अध्यापिका, लघुलेखन आणि टंकलेखन निर्देशक व प्राथमिक शाळा शिक्षक किंवा प्राथमिक शाळा अध्यापक या पदांवर किमान ३ वर्षे अखंड सेवा केली आहे अशा व्यक्तींमधून योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन भरण्यात येईल :<br>परंतु असे की, शिक्षणशास्त्रातील पदवीची किंवा सदर पदवीच्या समतुल्य म्हणून शासनाने जाहीर केलेल्या अन्य कोणत्याही पदवीची अट १० वर्षांचा अनुभव असलेल्या व शिक्षणशास्त्रातील पदवी किंवा इतर कोणतीही शिक्षणशास्त्रातील पदविका किंवा त्या पदविकेची समतुल्य म्हणून शासनाने जाहीर केलेली पदविका धारण करणाऱ्या संबंधित व्यक्तींच्या संबंधित विभागीय आयुक्तांना शिथिल करता येईल.<br>(ब) (एक) जे उमेदवार जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून नसतील व ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे उमेदवार, आणि<br>(दोन) पदवी व शिक्षण शास्त्रातील पदविशी समतुल्य म्हणून शासनाने जाहीर केलेली पदवी ज्यांनी धारण केली असेल, असे उमेदवार यांच्यामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीचे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण १:१ असे असेल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २२ नोव्हेंबर १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) चित्रकला शिक्षक/अध्यापक. | [1][चित्रकला शिक्षक/अध्यापक] .. | [1][जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून व ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे, आणि<br>(दोन) कला अध्यापक प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्याने अशा प्रमाणपत्रास तुल्य म्हणून मान्यता दिलेली अर्हता धारण करीत असतील. अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.] |
| ६ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) (स्नातक हिंदी शिक्षकांस भाषा शिक्षक). | माध्यमिक शाळेतील हिंदी शिक्षक .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) हिंदी हा मुख्य/विशेष विषय मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील,<br>किंवा<br>कनिष्ठ उच्च माध्यमिक शाळांतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील किंवा राज्य शासनाने तुल्य अर्हता म्हणून मान्यता दिलेली इतर कोणतीही अर्हता धारण करीत असतील.<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>परंतु आग्रा येथील केंद्रीय हिंदी संस्थानची हिंदी शिक्षण निष्णात पदविका धारण केलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १८ मार्च १९७१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
शासकीय अधिसूचना, दिनांक १८ मार्च १९७१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट चार—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ७ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) गृहविज्ञान–अध्यापक/अध्यापिका. | (एक) गृहविज्ञान अध्यापक (दोन) गृहविज्ञान अध्यापिका .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली गृहविज्ञानाची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आणि गृहविज्ञानाची पदविका प्रमाणपत्र धारण करणाऱ्यांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| [1][७-अ. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (शैक्षणिक) लघुलेखन, टंकलेखन निर्देशक. | लघुलेखन आणि टंकलेखन निर्देशक .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्यांचे वय [2][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि<br>(तीन) [3][आयुक्त, शासकीय परीक्षा केंद्र, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे] यांनी दिलेले लघुलेखनातील दर मिनिटाला १०० शब्दांहून कमी नसेल इतक्या वेगाचे आणि टंकलेखनातील दर मिनिटाला ४० शब्दांहून कमी नसेल इतक्या वेगाचे प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ मे १९७१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ फेब्रुवारी १९८३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

29



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ८ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक. | प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक | शिक्षक म्हणून पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शाळेतील प्रशिक्षित शिक्षकांना/अध्यापकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |
| ९ | जिल्हा सेवा (दुय्यम शैक्षणिक) प्राथमिक शाळेतील शिक्षक/अध्यापक. | (एक) प्राथमिक शाळा शिक्षक<br>(दोन) प्राथमिक शाळा अध्यापक | १. जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>परंतु, केंद्र किंवा राज्य समाजकल्याण मंडळाच्या विद्यमाने चालविण्यात येत असलेल्या "संक्षिप्त पाठ्यक्रमाद्वारे" शिक्षकाच्या पेशासाठी स्वतः अर्हता प्राप्त करून घेतलेल्या प्रौढ स्त्रियांच्या बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला वरची वयोमर्यादा ३८ वर्षेपर्यंत शिथिल करता येईल.<br>आणखी असे की, प्राथमिक शाळा शिक्षक म्हणून पूर्वानुभव असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला वरची वयोमर्यादा ३० वर्षेपर्यंत शिथिल करता येईल, आणि<br>जे उमेदवार—<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रिक्युलेशन परीक्षा किंवा लोकशाळा परीक्षा किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली कोणतीही इतर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र परीक्षा |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ९—चालू | | | उत्तीर्ण झाले असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, मागासवर्गासाठी व स्त्री उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांच्या बाबतीत, जर त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येइतकी विहित अर्हता असलेले उमेदवार उपलब्ध नसतील तर प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या जागेवर सेवाप्रवेश देता येईल :<br>आणखी असे की, इतर गोष्टी समान असल्यास—<br>(अ) "तीव्र बुद्धीच्या मुलींना विद्यावेतन देणे" या योजनेखालील चार वर्षाचा प्राथमिक प्रशिक्षण प्रमाणपत्राचा पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेले बंधपत्रित उमेदवार,<br>(ब) भारताच्या राष्ट्रपतींनी आणीबाणीची परिस्थिती घोषित केलेल्या मुदतीत केलेल्या सेवाप्रवेशाच्या बाबतीत माजी सैनिक, जवान अराजादिष्ट अधिकारी व माजी सैनिक यांच्या पत्नी,<br>(क) "संक्षिप्त पाठ्यक्रमा" द्वारे विहित अर्हता मिळविणाऱ्या पात्र स्त्रिया.<br>(ड) इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषय किंवा यांपैकी कोणतेही दोन विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार यांना अधिक पसंती देण्यात येईल :<br>आणखी असे की, (एक) जर वर विहित केलेली किमान अर्हता असलेले उमेदवार उपलब्ध नसतील तर, प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर जे उमेदवार दोन वर्षाचा कनिष्ठ प्राथमिक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले असतील किंवा जे |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ९—चालू | | | प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील व जे १९६६–६७ मध्ये दोन वर्षांच्या पाठ्यक्रमाचे प्रशिक्षण घेत असतील आणि जे उमेदवार, एप्रिल १९६८ च्या सुमारास आपले प्रशिक्षण पूर्ण करतील असे उमेदवार, एप्रिल १९७० च्या अखेरीपर्यंत प्राथमिक शिक्षक म्हणून नियुक्त केले जाण्यास पात्र असतील, आणि<br>(तीन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, परंतु हे नियम प्रसिद्ध होण्यापूर्वी प्राथमिक शाळा शिक्षक म्हणून ज्या उमेदवारांना सेवाप्रवेश देण्यात आला होता आणि ज्यांना नंतर रिकाम्या जागा नसल्यामुळे सेवामुक्त करण्यात आले असेल असे उमेदवार, प्राथमिक शिक्षक म्हणून पुन्हा नियुक्त केले जाण्यास पात्र ठरतील.<br>स्पष्टीकरण.—" माजी सैनिक " या संज्ञेत सेवानिवृत्तीमुळे, मुक्त किंवा सेवामुक्त झाल्यामुळे किंवा राखीव सैन्यात बदली झाल्यामुळे ज्यांनी संरक्षण सेवा सोडली आहे अशा संरक्षण सेवेतील कर्मचारीवर्गाचा अंतर्भाव होतो.<br>(२) नियम (१) च्या तिसऱ्या परंतुकान्वये नियुक्त केलेल्या उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या तारखेपासून सहा वर्षांच्या आत माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल आणि ते करार निर्दिष्ट मुदतीत उक्त परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवेत कायम करण्यात येणार नाही.<br>(३) स्त्रिया व अनुसूचित जाती, अनुसूचित जातीतील बुद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती, विशिष्ट रीत्या निर्दिष्ठ केलेल्या क्षेत्राबाहेर राहणाऱ्या जमाती अंतर्भूत करून अनूसूचित जमाती, अनधिसूचित जमाती व भटक्या जमाती आणि इतर मागास जमाती यांच्यासाठी |





| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ९—चालू | | | राखून ठेवलेल्या प्राथमिक शाळा शिक्षकांच्या पदांवर नेमणूक करण्यासाठी पुढे दर्शविलेल्या पसंतीक्रमानुसार निवड करण्यात येईल :—<br>(अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले व प्रशिक्षित असलेले उमेदवार.<br>(ब) प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले व कनिष्ठ प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र ज्यांनी मिळविले आहे असे उमेदवार,<br>(क) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार.<br>(ड) प्राथमिक शाळा प्रमाण परीक्षा उत्तीर्ण झालेले अप्रशिक्षित उमेदवार.<br>(४) मिश्र शाळांतील शिक्षकांच्या /अध्यापकांच्या एकूण पदांच्या ३३$\frac{1}{3}$ टक्के पदे स्त्री उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात येतील :<br>परंतु योग्य स्त्री उमेदवार उपलब्ध नसतील तर, ती रिकामी पदे पुरुष उमेदवारांची नेमणूक करुन भरता येतील.<br>(५) वरील नियम (१) व (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य सरकारकडून त्याबाबतीत निर्दिष्ट करण्यात येतील त्या अटींस व शर्तीस अधीन राहून, जिल्हा परिषदेने आपल्याकडे घेतलेल्या खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षकांना जिल्हा परिषदांखालील प्राथमिक शाळा-शिक्षक म्हणून सामावून घ्यावे असा निदेश राज्य सरकार देऊ शकेल :<br>परंतु अशा शिक्षकांजवळ वरील नियम ८(दोन) मध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हता असल्या पाहिजेत. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १० | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) संगीत शिक्षक. | माध्यमिक शाळेतील संगीत शिक्षक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) ज्यांनी राज्य सरकारने मान्यता दिलेल्या संस्थेची संगीताची पदविका किंवा प्रमाणपत्र नैपुण्य मिळविलेले असेल;<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| ११ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेतील शिल्पशिक्षक. | माध्यमिक शाळेतील शिल्पशिक्षक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि.<br>(दोन) संबंधित शिल्पकामातील मान्यताप्राप्त अर्हता धारण करीत असतील.<br>अशा उमेदवारांमधून नामनिदशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>परंतु माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता किंवा प्राथमिक प्रशिक्षण पाठ्यक्रम (पी.टी.सी.) पूर्ण केलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| १२ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेतील स्नातकेतर हिंदी शिक्षक, | शाळेतील स्नातकेतर हिंदी शक्षक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) पुढील पैकी एक शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील.—<br>(अ) मॅट्रिक असून कोविद, विशारद किंवा भूषण परीक्षा उत्तीर्ण |

परिशिष्ट चार—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १२—चालू | | | (ब) मॅट्रिक एस.एस.सी./किंवा इंटर असून कनिष्ठ हिंदी शिक्षक सनदी किंवा हिंदी शिक्षक सनद परीक्षा उत्तीर्ण,<br>(क) मॅट्रिक, एस. एस. सी. किंवा इंटर असून वरिष्ठ हिंदी शिक्षक सनद परीक्षा उत्तीर्ण,<br>(ड) राज्य सरकारने मान्यता दिलेली इतर कोणतीही तूल्य अर्हता अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु पी.टी.सी. ही जादा अर्हता धारण केलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| १३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेतील विणकाम शिक्षक. | माध्यमिक शाळेतील विणकाम शिक्षक. | जे उमेदवार—<br>(अ) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(ब) राज्य सरकारने मान्यता दिलेल्या संस्थेचे विणकामाचे प्रमाणपत्र धारण करीत असतील.<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. |
| १४ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) पूर्व माध्यमिक शाळा विभागातील मुख्याध्यापक. | (एक) पूर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक<br>(दोन) पूर्व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापिका. | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) यात शिक्षक किंवा शिक्षिका म्हणून पांच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा ज्यांनी पूर्ण केली असेल अशा पूर्व माध्यमिक शाळा विभागातील प्रशिक्षित सहायक शिक्षक व शिक्षिकांची पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल. |
| १५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) माध्यमिक शाळेच्या पूर्व माध्यमिक विभागातील सहाय्यक अध्यापक व सहाय्यक अध्यापिका. | (एक) पूर्व माध्यमिक शाळेतील सहाय्यक अध्यापक.<br>(दोन) पूर्व माध्यमिक शाळेतील सहाय्यक अध्यापिका. | (१) (अ) एस.एस.सी. व एस. टी.सी. किंवा शासनाने मान्यता दिलेली तुल्य अर्हता धारण करणाऱ्या प्राथमिक शाळा शिक्षकांची एकतर पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १५—चालू | | | (ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षापेक्षा अधिक नसलेले आणि<br>(दोन) एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाले असतील व एस.टी. प्रमाणपत्र किंवा राज्य सरकारने मान्यता दिलेली तुल्य अर्हता धारण करीत असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) २५ टक्क्यापेक्षा अधिक नसतील एवढी पदे पदोन्नती करुन भरण्यात येतील. |
| १६ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) [2][कनिष्ठ चित्रकला शिक्षक] | [3][कनिष्ठ चित्रकला शिक्षक अध्यापक]. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [३५] वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) चित्रकला शिक्षक प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील आणि ज्यांची चित्रकला व शिल्पकाम निरीक्षकाने शिफारस केली असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात यईल. |
| १७ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) पूर्व प्राथमिक शिक्षक | पूर्व प्राथमिक शिक्षक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षापेक्षा कमी असेल आणि<br>(दोन) पूर्व प्राथमिक शिक्षक प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारांसाठी राज्य सरकारने दिलेले मराठी किंवा गुजराथीचे प्रमाणपत्र किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेले इतर कोणतेही प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात यईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १८ मार्च १९७१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



## नमुना " ब "

[ परिशिष्ट चार चा नियम ३ भाग दोन पहा]

या अधिलेखाव्दारे सर्व लोकांस ज्ञात व्हावे की, ............ येथील मी ...... (ज्याचा यात यापुढे "प्रशिक्षार्थी" असा उल्लेख करण्यात आला आहे) ............ जिल्हा परिषदेला (जिचा यात यापुढे "परिषद" असा उल्लेख करण्यात आला आहे) ........ रक्कम देण्यास बद्ध झालो आहे व दृढतापूर्वक बांधला गेलो आहे व ती रक्कम योग्य व रास्तपणे देण्यास ती या अधिलेखाव्दारे मला स्वत:ला माझ्या वारसांना मृत्युपत्र व्यवस्थापकांना, कारभाऱ्यांना व वैध प्रतिनिधींना बांधून घेत आहे. ............ १९ रोजी यावर सही केली.

ज्याअर्थी, ............ येथे ............ या कालावधीसाठी महाराष्ट्र शासनाच्या व्यवसाय मार्गदर्शन पाठ्यक्रमासाठी (ज्याचा यात यापुढे "उक्त पाठ्यक्रम" असा उल्लेख करण्यात आला आहे) परिषदेने प्रशिक्षणार्थीची निवड केली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हा परिषदेने, उक्त प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर ह्या पदासाठी जिल्हा परिषद विहित करील असे वेतन व भत्ते यांवर तीन वर्षे मुदतीसाठी प्रशिक्षार्थी शाळा समुपदेष्टा म्हणून जिल्हा परिषदेची सेवा करील व त्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्या नावाने आवश्यक ते बंधपत्र करून देईल. या शर्तीवर असे प्रशिक्षण घेत असताना परिषदेने प्रशिक्षणाला इतर गोष्टीबरोबरच वेतन व भत्ते यासह ......... रुपयांची वित्तलब्ध देण्याचे मान्य केले आहे.

आता प्रशिक्षणार्थीने पुढील गोष्टी केल्यास हे बंधपत्र निरर्थक होईल अन्यथा ते पूर्णपणे अंमलात राहील :—

(१) प्रशिक्षणार्थी, उक्त पाठ्यक्रम साक्षेपाने चालू ठेवील व पूर्ण करील आणि उक्त पाठ्यक्रमासाठी वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा नियमांचे पालन करील आणि पाठ्यक्रमाचे शिक्षण घेत असताना चांगली वर्तणूक ठेवील व उक्त पाठ्यक्रमाला नियमितपणे उपस्थित राहिल व परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्याबाबत त्याने नामनिर्दिष्ट केलेला अधिकारी यांच्या मते समाधानकारक असेल अशी प्रगती करील आणि विहित केलेल्या सर्व परीक्षा पहिल्या प्रयत्नातच उत्तीर्ण होईल.

(२) प्रशिक्षार्थी, स्वेच्छेने उक्त पाठ्यक्रम पूर्ण होण्यापूर्वी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय उक्त पाठ्यक्रम बंद करणार नाही व गैरवर्तणूक किंवा पाठ्यक्रमाला उपस्थित राहण्यास हयगय किंवा चुकारपणा, आळशीपणा किंवा गैरशिस्त यासाठी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून त्याना मुक्त करण्यात, काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आलेले नसेल आणि

(३) उक्त पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर व उक्त पाठ्यक्रमाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर उक्त पाठ्यक्रम पूर्ण केल्यासंबंधी प्रशिक्षार्थीने दिलेली लेखी नोटीस परिषदेला मिळाल्यापासून ............ च्या आत परिषदेने सेवा करण्यास सांगितले असता परिषदेची सेवा करील अशी वरील नोटीस प्रशिक्षार्थीने ............ यास ............ म्हणून तावडतोब दिली पाहिजे व ती त्या पदासाठी ठरविलेल्या वेतन श्रेणीवर केलेल्या नेमणुकीच्या तारखेपासून किमान तीन वर्षांच्या मुदतीसाठी असली पाहिजे अन्यथा ती पूर्णपणे अंमलात व आधारभूत राहील.

याद्वारे असा करार करण्यात येत आहे की, प्रशिक्षार्थीने उपरोक्त अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त संपूर्ण रक्कम रुपये ......... किंवा त्या मुदतीपर्यंत परिषदेने आणि शासनाने अशा प्रशिक्षणासाठी प्रशिक्षार्थीना दिलेल्या अनुषंगिक खर्चासह वेतन व भत्ते मिळून असलेली वित्तलब्धीमधून त्यास देण्यात आलेली, त्यापेक्षा कमी असलेली रक्कम व ......... करून ठरवण्यात येईल एवढी. परिषदेला व शासनाला झालेल्या नुकसानीच्या

भरपाईसाठी मान्य केलेली रक्कम प्रशिक्षार्थीने परिषदेला व शासनाला तावडतोब देय होईल. अशा रीतीने प्रशिक्षार्थीने द्यावयाची रक्कम परिषदेचे, कोणतेही इतर अधिकार व उपाय योजना यांना बाध न आणता, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

या गोष्टीची साक्ष म्हणून उपरि नामित प्रशिक्षार्थीने वर लिहिलेल्या दिवशी व वर्षी सही केली आहे.

उपरिनामित प्रशिक्षार्थी श्री. .................... यांनी खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून स्वाधीन केले.

(१) ....................................

(२) ....................................



## परिशिष्ट पाच

(नियम ५ पहा)

**जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) व जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) यामध्ये समाविष्ट असणाऱ्या पदांवरील नियुक्तीकरिता उमेदवारांच्या अर्हता आणि त्यांच्या नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम.**

| अनुक्रमांक | सेवा व संवर्ग | पद | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) प्रथम श्रेणी. | (एक) वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, (दोन) सहाय्यक वैद्यकीय अधिकारी, (तीन) वरिष्ठ विस्तार अधिकारी (आरोग्य) | (१) (अ) जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) आरोग्य द्वितीय श्रेणी या श्रेणीतील तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेले वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी साथरोग आणि विस्तार अधिकारी (आरोग्य) यांना, पदोन्नती देऊन नेमणूका करण्यात येईल. परंतु एम.बी.बी.एस. किंवा तुल्य पदवी धारण करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत अखंड सेवेचा उपरोक्त कालावधी एक वर्षापर्यंत कमी करता येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून त्यांचे वय ३५ वर्षापेक्षा कमी नसेल.<br>(दोन) (अ) एम.बी.बी.एस. पदवी किंवा राज्य सरकारने मान्यता दिलेली तुल्य अर्हता धारण करीत असतील अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. सार्वजनिक आरोग्य विषयाची पदविका ही अतिरिक्त अर्हता धारण करणाऱ्यांना अधिकपसंती देण्यात येईल.<br>(ब) एम.सी.पी.एस., एल.सी.पी. अँन्ड एस., जी.एफ.ए.एम. (मुंबई), बी.ए.एम.एस. (पुणे), ए.व्ही.पी. (पुणे) किंवा कोणतीही तुल्य मान्यता-प्राप्त अर्हता धारण करीत असतील व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी म्हणून कमीतकमी पाच वर्षे व्यवसाय करीत असतील आणि |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | (तीन) मुंबई वैद्यक अधिनियम १९१२ किंवा महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये ज्यांनी आपली नोंद केलेली आहे. अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. (२) ५० टक्क्यापेक्षा अधिक नसतील एवढी पदे नामनिर्देशन करून भरण्यात येतील. |
| | | [(चार) अवैद्यकीय पर्यवेक्षक | १. नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने— (अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग ३) (आरोग्य), श्रेणी ३ या श्रेणीतील तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या, आणि महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र ४१) अन्वये स्थापन झालेल्या विभागीय मंडळामार्फत घेण्यात आलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असेल अशा कुष्ठरोग तंत्रज्ञास पदोन्नती देऊन किंवा (ब) पुढीलपैकी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करून :— (एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत असेल ते खेरीज करून ज्याचे वय २८ वर्षापेक्षा अधिक नसेल, आणि, (दोन) ज्यांनी भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र किंवा जीवशास्त्र या प्रमुख विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल : |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | परंतु, या नियमातील परंतुक दोनमधील पात्रता उमेदवारांच्याबाबतीत, नियुक्ती प्राधिकाऱ्यांस, ज्या विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखाली ती जिल्हा परिषद असेल त्या विभागीय आयुक्तांच्या पूर्वपरवानगीने वयाची अट शिथिल करता येईल : परंतु, आणखी असे की, ज्यांनी, मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाजशास्त्र विषयातील पदवी किंवा पदविका धारण केली असेल किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेत सामाजिक वैद्यकीय कार्यकर्ता म्हणून सलग ३ वर्षे प्रत्यक्ष काम केल्याचा ज्यांना अनुभव असेल किंवा दोन्ही अर्हता असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. २. नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात आलेल्या उमेदवाराने, भारतातील कोणत्याही एका कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्रामधून देण्यात येणारे ६ महिन्यांचे कुष्ठरोगविषयक कामाचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणे आणि प्रशिक्षण संपल्यानंतर सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असून, सदर परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यास पात्र होईल. ३. नामनिर्देशनाव्दारे नेमणूक झालेल्या उमेदवाराने नोकरीत हजर होण्यापूर्वी विहित केलेल्या नमुना "ब-अ" मध्ये जिल्हा परिषदेला बंधपत्र भरून देणे आवश्यक असेल. ४. पदोन्नती व नामनिर्देशनाव्दारे करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ३ : १ असे असेल.] |

28

परिशिष्ट पाच—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २ | **जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) द्वितीय श्रेणी** | (१) वैद्यकीय अधिकारी<br>(२) वैद्यकीय अधिकारी साथरोग<br>(३) विस्तार अधिकारी (आरोग्य) | (१) (अ) जिल्हा तंत्र सेवा (वर्ग ३) (आरोग्य) तृतीय श्रेणी, या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेले कनिष्ठ वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ विस्तार अधिकारी (आरोग्य) वरिष्ठ आयुर्वैदिक वैद्य आणि वरिष्ठ युनानी हकीम यांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. परंतू आरोग्य पदविका धारण करणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत वरील अखंड सेवेचा कालावधी एक वर्षापर्यंत कमी करता येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार (एक) आधीपासून जिल्हा, परिषदेच्या सेवेत नसतील ज्यांचे वय [१][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. परंतू एम.बी.बी.एस., एम.सी.पी.एस. किंवा जी.एफ.ए.एम. पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबीत वरची वयोमर्यादा ३५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल.<br>(दोन) पुढीलपैकी एक किंवा इतर तुल्य अर्हता धारण करीत असतील :—<br>(अ) एम.सी.पी.एस.<br>(ब) एल.सी.पी. अँड एस.<br>(क) एल.एम.पी. (मुंबई)<br>(ड) जी.एफ.ए.एम. (मुंबई)<br>(इ) बी.ए.एम.एम. (पुणे)<br>(फ) ए.व्ही.पी. (पुणे)<br>(ज) डी.एम.पी. |

[१] शासकीय अधिसूचना दिनांक २९ सप्टेंबर, १९८३ अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट पाच—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (ह) ए.एम.बी.एस. (बनारस) (१९५२ मध्ये किंवा त्यानंतर देण्यात आलेली).<br>(आय) ए.एम.एस. (बनारस)<br>(जे) ए.एम.एम.एस. (बनारस)<br>(के) जी.सी.आय.एम. (मद्रास)<br>(ल) बी.ए.एम. अँड एस. (नागपूर)<br>(तीन) मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ किंवा महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये नोंदणीकृत उमेदवार असतील,<br>(चार) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी म्हणून ज्यांनी तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका व्यवसाय केला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसतील एवढी पदे, पदोन्नती द्वारे भरण्यात येतील. |
| | | (४) वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक | राज्य सरकारने मान्यता दिलेली सार्वजनिक आरोग्य निरीक्षणालयांनी स्वच्छता निरीक्षक परीक्षा उत्तीर्ण झाले असतील असे जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) तृतीय श्रेणीतील योग्य कनिष्ठ विस्तार अधिकारी (आरोग्य) स्वच्छता निरीक्षक आणि आरोग्य सहायक यांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |
| | | (५) आरोग्य परिचारिका | [१][१] नेमणूक एकतर—<br>(अ) आरोग्य परिचर्या प्रमाणपत्र किंवा भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिलेली बी.एस.सी. परिचर्या ही पदवी धारण केलेल्या योग्य परिचारिका प्रसाविकांना. [२] [किंवा आरोग्य प्रचारक] यांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. [३][किंवा] |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ जानेवारी १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ डिसेंबर १९७२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[३] शासकीय अधिसूचना, दिनांक २६ जानेवारी १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | (ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) अर्हताप्राप्त परिचारिका प्रसाविका असतील व ज्यांची महाराष्ट्र परिचर्या परिषद किंवा विदर्भ परिचर्या परिषद यांच्याकडे नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी त्या पात्र असतील, आणि<br>(तीन) आरोग्य परिचर्या प्रमाणपत्र किंवा भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिलेली बी.एस.सी. परिचर्या ही पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[1][२ पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाणे ५० : ५० असेल.] |
| ३ | जिल्हा तांत्रिक (सेवा वर्ग तीन) (आरोग्य) (तृतीय श्रेणी) | (एक) कनिष्ठ आरोग्य अधिकारी ..<br>(दोन) कनिष्ठ विस्तार अधिकारी (आरोग्य). | (१) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ अन्वये नोंदणी योग्य अर्हता धारण करीत असतील किंवा पुढील पैकी एक किंवा इतर तुल्य अर्हता धारण करीत असतील—<br>(अ) डी.ए.एस.एफ. (मुंबई).<br>(ब) बी. ए. एम. एस. (विदर्भ).<br>(क) ए. व्ही. व्ही. (हैद्राबाद).<br>(ड) ए. व्ही. व्ही. (नांदेड). |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ जानेवारी १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (इ) ए. व्ही. व्ही. (पुणे) (१९४४ पूर्वी दिलेली).<br>(फ) ए. व्ही. व्ही. (सातारा) (१९४२ पूर्वी दिलेली).<br>(ज) एल. एम. एम. (पाटण) (१९४२ पूर्व दिलेली).<br>(ह) इ. आय. एम. (मद्रास).<br>(तीन) ज्यांची मुंबई वैद्यक अधिनियम १९१२ किंवा महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ अन्वये नोंदणी झालेली असेल अशा उमेदवारां-मधून नामनिर्देशाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) नेमणुकीसाठी निवड केलेल्या उमेदवारांना राज्य सरकारने विहित केलेले न्याय वैद्यकीय प्रशिक्षण घ्यावे लागेल. |
| | | (तीन) वरिष्ठ आयुर्वेदिक वैद्य | (१) (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) प्रथम श्रेणी या श्रेणीतील तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य आयुर्वेदिक वैद्यांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) डी. एस. ए. सी. (मुंबई) किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील, आणि<br>(तीन) ज्यांची महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये नोंदणी झालेली असेल, |

परिशिष्ट पाच—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | | (२) नेमणुकीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना राज्य शासनाने विहित केलेले न्याय वैद्यकीय प्रशिक्षण घ्यावे लागेल. |
| | | | (३) २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसतील एवढी पदे पदोन्नती देऊन भरण्यात येतील. |
| | | (चार) वरिष्ठ युनानी हकीम | (१) (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) प्रथमश्रेणी या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या योग्य युनानी हकीमांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) डी. ए. एस. एफ. (मुंबई) ही पदवी किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली तुल्य अर्हता धारण करीत असतील आणि<br>(तीन) ज्यांनी महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये आपली नोंदणी केलेली अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | | (२) नेमणुकीसाठी निवडलेल्या उमेदवारांना राज्य शासनाने विहित केलेले न्याय वैद्यकीय प्रशिक्षण घ्यावे लागेल. |
| | | | (३) २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसतील एवढी पदे पदोन्नती देऊन भरण्यात येतील. |

परिशिष्ट पाच—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | (पाच) स्वच्छता निरीक्षक .. | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) प्रथम श्रेणी या श्रेणीतील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या योग्य कनिष्ठ स्वच्छता निरीक्षकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |
| | | (सहा) आरोग्य सहाय्यक .. | (अ) नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यासाठी विहित करण्यात आलेला पाठ्यक्रम पूर्ण केलेल्या कनिष्ठ आरोग्य प्रचारकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) इंटरमिजिएट सायन्स किंवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि<br>(तीन) उमेदवाराला जी कार्ये करावी लागतात त्या कार्याच्या क्षेत्रातील राज्य सरकारने मान्यता दिलेला विशेष पाठ्यक्रम ज्यांनी पूर्ण केला असेल अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल<br>(दोन) नामनिर्देशन व पदोन्नती याद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण १:३ असे असेल. |
| | | (सात) आरोग्य प्रचारक<br>(आठ) कनिष्ठ आरोग्य पर्यवेक्षक .. | (१) (अ) अर्हता प्राप्त आरोग्य प्रचारक आणि महाराष्ट्र परिचर्या परिषद किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेल्या किंवा अशा नोंदणीसाठी पात्र असलेल्या कनिष्ठ आरोग्य प्रचारकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून त्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिलेली बी.एससी. परिचर्या ही पदवी धारण करीत असतील आणि ज्यांची महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेले असेल किंवा जे अशा नोंदणीसाठी पात्र असतील.<br>किंवा<br>(तीन) ज्यांची अर्हता प्राप्त आरोग्य प्रचारक आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) नामनिर्देशन आणि पदोन्नतीद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण १ : ३ असेल. |
| | | (नऊ) परिचारिका-प्रसाविका .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) (अ) भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिलेली बी.एस.सी. परिचर्या ही पदवी धारण करीत असतील किंवा<br>(ब) अर्हता प्राप्त परिचारिका प्रसाविका किंवा अर्हताप्राप्त परिचारिका असतील आणि<br>(तीन) ज्यांची महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झाली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | (दहा) साह्यकारी प्रसाविका .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील.<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | [1][(अकरा) कुष्ठरोग तंत्रज्ञ .. | [2](१) (अ) खंड (ब) च्या खंड (एक) व खंड (दोन) यामध्ये नमूद केलेल्या अर्हता असलेल्या लस टोचक किंवा कॉलरा (पटकी) रोगविषयक कार्यकर्ता ही पदे धारण करणाऱ्या व्यक्तीमधून, पात्रतेच्या अधीन राहून जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीस एकतर पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल, किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत काम करीत नसून, ज्यांचे वय २८ वर्षापेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ (१९६५ चा महाराष्ट्र ४१) अन्वये स्थापन झालेल्या विभागीय मंडळामार्फत घेण्यात आलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १० जून १९७४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ जानेवारी १९८५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट पाच—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३—चालू | | | शासनाने घोषित केलेली त्याच्याशी तुल्य अशी अन्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि—<br>(तीन) जे कुष्ठरोग प्रशिक्षण सहा महिन्यांच्या प्रशिक्षण पाठ्यक्रमाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>मात्र मान्यताप्राप्त संस्थेच्या कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्राच्या कुष्ठरोग कार्यामधील प्रशिक्षण पाठ्यक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी जो उमेदवार ठराविक वयोमर्यादेच्या आत असेल आणि प्रत्यक्ष निवडीच्या वेळी ज्याने उच्च वयोमर्यादा ओलांडली असेल असा उमेदवार त्याच्या नियुक्तीच्या प्रयोजनासाठी तो विहित वयोमर्यादेच्या आत असल्याचे मानण्यात येईल.<br>(२) नामनिर्देशन व पदोन्नतीद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण १ : ३ असेल. |
| | | [1][(बारा) कलाकार-नि-छायाचित्रकार | जे उमेदवार—<br>(१) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [2][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(२) ज्यांना छायाचित्रणाचे ज्ञान असेल व जे चित्रकलेची इंटर मिजिएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर तुल्य परीक्षा इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या आणि चित्रकलेतील शासन मान्यताप्राप्त पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ ऑगस्ट १९७५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



परिशिष्ट पाच—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३—चालू | | [1][(तेरा) गट पातळी पर्यवेक्षक | .. (१) (अ). ज्यांनी जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) द्वितीयश्रेणी मधील पाच वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा केली असेल अशा लस टोचकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल,<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [2][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि,<br>(दोन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि ज्यांनी शासन मान्यताप्राप्त स्वच्छता निरीक्षकांचा पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ५० . ५० असे राहील.] |
| | | [3][(चौदा) महिला आरोग्य प्रचारक | .. महिला आरोग्य प्रचारकांच्या पदावरील नेमणूक ही, ज्या सहायक परिचारिका प्रसाविका ह्या—<br>(अ) सहा महिन्यांच्या वढती प्रशिक्षण पाठ्यक्रमानंतर घेतलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्या असतील, आणि<br>(ब) महाराष्ट्र परिचारिका परिषदेकडे ज्यांची नोंदणी झालेली असेल किंवा अशी नोंदणी होण्यास ज्या पात्र असतील, अशा मधून पात्रतेनुसार वरिष्ठता क्रमाच्या आधारे योग्य त्या व्यक्तीला पदोन्नती देऊन करण्यात येईल : |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ११ डिसेंबर १९७९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २४ मे १९८४ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | | | परंतु ज्या सहायक परिचारिका प्रसाविका माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्या नसतील त्या पदोन्नतीस पात्र असतील आणि पदोन्नतीने भरण्यासाठी उपलब्ध असलेल्या रिकाम्या पदांपैकी पन्नास टक्के पदे अशा प्रसाविकांमधून भरण्यात येतील.] |
| २—चालू | | [१][(पंधरा)] प्रयोगशाळा तंत्रज्ञ .. | (१) जे उमेदवार—<br>(अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा जास्त नसेल,<br>आणि<br>(ब) ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवनशास्त्र घेऊन विज्ञान विषयाची पदवी असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>[२][परंतु हाफकिन संस्थेच्या वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रामध्ये पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल]. |
| ४ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) प्रथमश्रेणी. | (एक) आयुर्वेदिक वैद्य<br>(दोन) सहायक वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेद) | (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) द्वितीय श्रेणी या श्रेणीतील दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या योग्य कनिष्ठ आयुर्वेदीक वैद्यांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) ज्यांच्याकडे महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये नोंदणी योग्य आयुर्वेदीक अर्हता असेल आणि ज्यांची उक्त अधिनियमान्वये नोंदणी झालेली असेल आणि |

१. शासकीय अधिसूचना, दिनांक ७ मार्च १९८८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
२. शासकीय अधिसूचना, दिनांक ३ ऑक्टोबर १९८९ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (तीन) ज्यांनी आयुर्वेदिक वैद्यक व्यवसायी म्हणून दोन वर्षे व्यवसाय केला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (तीन) युनानी हकीम.<br>(चार) सहायक वैद्यकीय अधिकारी (युनानी). | (१) (अ) जिल्हा सेवा वर्ग (तीन) (दुय्यम आरोग्य) द्वीतीय श्रेणी या श्रेणीतील दोन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या योग्य कनिष्ठ युनानी हकीमांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यांत येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून, ४० वर्षांपेक्षा अधिक वय नसेल.<br>(दोन) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये नोंदणी करण्या योग्य अशी अर्हता असलेले आणि उक्त अधिनियमान्वये नोंदणी केलेले उमेदवार,<br>(तीन) युनानी वैद्यक व्यवसायी म्हणून दोन वर्षे व्यवसाय केलेले असतील. अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (पाच) कनिष्ठ स्वच्छता निरीक्षक .. | (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) द्वितीय श्रेणीमध्ये पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या आणि स्वच्छता निरीक्षकाचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेल्या योग्य लसटोचकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि, |

१. शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ४—चालू | | | (दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा आणि स्वच्छता निरीक्षकांचा मान्यता प्राप्त पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेले असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (सहा) मिश्रक<br>(सात) दवाखाना सहायक | (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम आरोग्य) द्वितीय श्रेणीतील पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्यांना आणि औषधशाळा अधिनियम १९४८ अन्वये नोंदणीसाठी अर्हताप्राप्त असलेले योग्य मिश्रक (निम्न श्रेणी) यांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल,<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधिपासून जिल्हा परिषद सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) औषधशाळा अधिनियम, १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असतील,<br>किंवा<br>माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि रुग्णालयात किंवा दवाखान्यात औषध मिश्रणाच्या कामावर असलेले किंवा जेथे वैद्यक व्यवसायीच्या औषधपत्रानुसार नियमितपणे औषधे दिलीले जातात अशा ठिकाणी ज्यांना सात वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल,<br>किंवा |



| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ४—चालू | | | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि राज्य सरकारच्या रुग्णालयातील दवाखाना सहायकांच्या पदाचा ५ वर्षांचा अनुभव असेल,<br>अशा उमेदवारांमधन नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (आठ) कनिष्ठ आरोग्य प्रचारक | (१) (अ) सहायक आरोग्य प्रचारक यांना जी कार्येकरावी लागतात त्या कार्याच्या क्षेत्रातील, शासनाने मान्यता दिलेला विशेष पाठ्यक्रमजे उत्तीर्ण झाले असतील अशा जिल्हा सेवेतील, योग्य सहायक आरोग्य प्रचारक(तृतीय वर्ग) (दुय्यम आरोग्य) (द्वितीय श्रेणी) यांची पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि<br>(तीन) त्यांनी जी कार्ये करावी लागतात त्या कार्याच्या क्षेत्रातील शासनाने मान्यता दिलेला विशेष पाचक्रम. जे उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) नामनिर्देशना व्दारे व पदोन्नतीद्वारे करावयाच्या नेमणकीचे गुणोत्तर ३ : १ असेल. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५ जिल्हा सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) द्वितीय श्रेणी. | दुय्यम | (एक) कनिष्ठ आयुर्वेदिक वैद्य. | जे उमेदवार— (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि (दोन) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये नोंदविता येण्याजोगी अर्हता धारण करीत असतील आणि ज्यांची त्या अन्वये नोंदणी करण्यात आली असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात येईल. |
| | | (दोन) कनिष्ठ युनानी हकीम | जे उमेदवार— (एक) आधीपासून परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि (दोन) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये नोंदविता येण्याजोगी अर्हता धारण करीत असतील आणि ज्यांची त्या अन्वये नोंदणी करण्यात आली असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (तीन) मिश्रक (कनिष्ठ श्रेणी) | जे उमेदवार— (एक) आधीपासून जिल्हापरिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल, (दोन) ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेपर्यंत किंवा तुल्य परीक्षेपर्यंत शिक्षण घेतले असेल, |



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५—चालू | | | (तीन) रुग्णालय किंवा दवाखाना यामध्ये किंवा जिथे वैद्यक व्यवसायींच्या औषधपत्रावरून नियमितपणे औषधे दिली जातात अशा इतर ठिकाणी एकूण चार वर्षांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीकरिता औषधांचे मिश्रण करण्याचे काम ज्यांनी केले असेल, आणि (चार) जे औषधांचे मिश्रण करण्याच्या प्रात्यक्षिकाच्या चाचणीत यशस्वी झाले असतील अशा उमेदवारांमधून, नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | [ (चार) लस टोचक | जे उमेदवार— (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि (दोन) इंग्रजी हा सर्व विषयातील एक विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमणपत्र परीक्षेला किंवा तुल्य परीक्षेला बसले असतील (मग ते परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत किंवा अनुत्तीर्ण झाले आहेत हे लक्षात घेतले जाणार नाही.) आणि राज्य शासनाने, मुंबई महानगरपालिकेने किंवा याबाबतीत राज्य शासनाने मान्यता दिलेल्या इतर संस्थेने दिलेले लस टोचक, प्रशिक्षण प्रमाणपत्र मिळवले असेल, किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेली स्वच्छता निरीक्षकाची अर्हता धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. परंतु स्वच्छता निरीक्षकाची अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराला अधिक पसंती देण्यात येईल. |

ˈ शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ चे मुळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५—चालू | | (पाच) सहायक आरोग्य प्रसारक | .. जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल;<br>(दोन) प्रायमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील, आणि<br>(तीन) त्यांना जी कार्ये करावी लागतात अशा कार्याच्या क्षेत्रातील, शासनाने मान्यता दिलेला विशेष पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (सहा) प्रशिक्षित दाई | .. (एक) आधीपासून परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ४० वर्षपेक्षां अधिक नसेल,<br>(दोन) प्रादेशिक भाषेतील मजकूर वाचू शकत असतील आणि लिहू शकत असतील, आणि<br>(तीन) मान्यता प्राप्त संस्थेकडून किंवा रुग्णालयाकडून मिळालेले दाईच्या प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

[१] शासन अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.





[१]["नमुना ब-अ"

[परिशिष्ट पाच, नियम १ (चार) (तीन) पहा]

या अभिलेखाद्वारे सर्वांस विदित व्हावे की, मी, .................. यांचा मुलगा/यांची पत्नी/यांची मुलगी श्री./श्रीमती/कुमारी .................. राहणार .................. (यात यापुढे ज्याचा उल्लेख "बद्ध व्यक्ती" असा केला आहे) परिषदेस द्यावयाच्या व ज्यासाठीचे प्रदान उचित निश्चितपणे व खरे खुरे करण्यात येईल असा रुपये ५,००० (रुपये पाच हजार) एवढ्या रकमेकरिता जिल्हा परिषदेला (यात यापुढे "जिल्हा परिषद" असा उल्लेख करण्यात आला आहे). दृढतापूर्वक बांधून घेत आहे. या अभिलेखाद्वारे मी स्वतःला, माझ्या वारसांना, मुखत्यार व्यवस्थापकांना, प्रशासकांना आणि प्रतिनिधींना बांधून घेत आहे.

ज्याअर्थी, प्रशिक्षार्थीची, जिल्हा परिषदेच्या कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत भारतातील कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्रामार्फत देण्यात येणारे (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त प्रशिक्षण" असा करण्यात आला आहे) ६ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी, प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याबाबतची चाचणी परीक्षा विहित करण्यात आलेल्या तीन संधींमध्ये उत्तीर्ण झाल्यावर, तो जिल्हा परिषदेमध्ये किमान पाच वर्षांपर्यंत वैद्यकीयेतर पर्यवेक्षक (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त पद" असा करण्यात आला आहे) म्हणून सेवा करील या अटीवर निवड करून नियुक्ती करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिषदेस ही बद्ध व्यक्ती प्रशिक्षण घेत असताना इतर गोष्टींबरोबरच तिला पर्यवेक्षक या पदासाठी अनुज्ञेय असलेले महागाई भत्त्यासह वेतन व भत्ते यांसह ..... रुपये एवढे विद्यावेतन देण्याचे मान्य केले आहे.

आणि ज्याअर्थी, प्रशिक्षार्थीने उपरोक्त अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटीचे किंवा शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त प्रशिक्षणाच्या कालावधीत जिल्हा परिषदेने केलेली वेतन व भत्ते आणि विद्यावेतन यांची मिळून संपूर्ण रक्कम प्रशिक्षणार्थीने जिल्हा परिषदेस देणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अटीचे व शर्तीचे पालन करण्याबाबत प्रशिक्षार्थीने जिल्हा परिषदेला कमीत कमी रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेची वैयक्तिक प्रतिभूती बंधपत्र करून देण्याचे मान्य केले आहे.

त्याअर्थी आता प्रशिक्षार्थीने पुढील गोष्टी केल्यास हे बंधपत्र रद्द ठरवले जाईल :—

(१) प्रशिक्षार्थी उक्त पाठ्यक्रम साक्षेपाने चालू ठेवील व पूर्ण करील आणि उक्त पाठ्यक्रमासाठी परिषदेकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा नियमांचे पालन करील आणि प्रशिक्षण घेत असताना चांगली वर्तणूक ठेवील व उक्त पाठ्यक्रमाला नियमितपणे उपस्थित राहील व परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा त्याबाबत त्याने नामनिर्दिष्ट केलेला अधिकारी यांना संपूर्ण समाधानकारक वाटेल अशी प्रगती करील व विहित केलेल्या सर्व परीक्षा विहित संधीमध्येच उत्तीर्ण होईल.

(२) प्रशिक्षार्थी स्वतः होऊन उक्त पाठ्यक्रम पूर्ण होण्यापूर्वी परिषदेच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय तो बंद करणार नाही.

(३) जिल्हा परिषदेने घालून दिलेल्या शर्ती, नियम, विनियम आणि दिलेले आदेश व वेळोवेळी दिलेले निदेश यांचे पालन करीत असेल. आणि

(४) प्रशिक्षार्थीने उक्त पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर आणि विहित परीक्षा आणि चाचणी उत्तीर्ण झाल्यानंतर, जिल्हा परिषदेत त्या पदासाठी जिल्हा परिषदेकडून मंजूर करण्यात आलेल्या वेतनमानावर, कमीत कमी पाच वर्षे इतकी सेवा करील आणि त्याच्या सेवाकालात परिषद आणि त्यांच्या अधिकाऱ्याने दिलेल्या सर्व कायदेशीर आदेशांचे आणि हुकुमांचे पालन करील.

अन्यथा हे बंधन पूर्णपणे अंमलात राहील.

याद्वारे असा करार करण्यात येत आहे की,—

(१) प्रशिक्षार्थीने उपरोक्त अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटीचे आणि शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त संपूर्ण रक्कम रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) किंवा त्या मुदतीपर्यंत परिषदेने आणि शासनाने अशा प्रशिक्षणासाठी प्रशिक्षार्थीला दिलेले पाठवेतन आणि आनुषंगिक खर्च यासह वेतन व भत्ते मिळून असलेली वित्तलब्धी म्हणून परिषदेकडून त्यास देण्यात आलेली त्यापेक्षा कमी असलेली व ठरविण्यात येईल एवढी परिषदेला झालेल्या नुकसानीच्या भरपाईबद्दल ठरविण्यात आलेली रक्कम प्रशिक्षार्थीने परिषदेला ताबडतोब देय होईल आणि अशा रीतीने प्रशिक्षार्थीने द्यावयाची रक्कम परिषदेचे कोणतेही अधिकार व उपाययोजना यांना बाधा न आणता जमीन महसुलाच्या परिषदेकडून थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(२) परंतु, या बंधपत्राच्या शर्तीचे यथायोग्य पालन करण्याबाबत अथवा प्रशिक्षार्थ्यांच्या प्रशिक्षणाबाबत जिल्हा परिषदेने केलेल्या खर्चाची रक्कम परत करण्याबाबत कोणताही विवाद उद्‌भवल्यास त्याबाबत जिल्हा परिषदेकडून अथवा तिच्याकडून नियुक्त करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांकडून त्यावर निर्णय दिला जाईल आणि अशा अधिकाऱ्याने प्रशिक्षार्थ्यांना द्यावयाच्या खर्चाबाबत दिलेले प्रमाणपत्र अंतिम आणि करारबद्ध व्यक्तीवर बंधनकारक राहील.

(३) जर पशिक्षार्थ्याने सदर प्रशिक्षण यशस्वी रीत्या पूर्ण केले नाही किंवा विहित करण्यात आलेली परीक्षा किंवा चाचण्या ते तीन संधींमध्ये उत्तीर्ण न झाल्यास उपरोक्त खंड (१) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषदेला बंधपत्रान्वये दिलेल्या रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) या रकमेव्यतिरिक्त त्याची सेवाही समाप्त करण्यात येईल व याची जबाबदारी प्रशिक्षार्थीवर राहील. या गोष्टीची साक्ष म्हणून उपरिनामित प्रशिक्षार्थ्यांने वर लिहिलेल्या दिवशी व वर्षी सही केली आहे.

उपरिनामित करारबद्ध प्रशिक्षणार्थी श्री./श्रीमती/कुमारी .................................... यांनी खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून स्वाधीन केले.

(१) ..........................................

(२) ..........................................

.................................... यांनी जिल्हा परिषदेकरिता व तिच्या वतीने स्वीकारले आहे. [जिल्हा परिषदेकरिता व तिच्या वतीने बंधपत्र स्वीकारणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि पदनाम यांचा येथे अंतर्भाव करावा].

¹ शासकीय अधिसूचना, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



[परिशिष्ट पाच-अ]

[नियम ३ पहा]

जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) (बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी योजनेच्या कर्मचाऱ्यांच्या) मध्ये समाविष्ट असलेल्या पदांवर नेमणुका करण्यासाठी उमेदवारांची अर्हता व नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पदाचे नाव (३) | नेमणुकीसाठी अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (आरोग्य) श्रेणी एक. | आरोग्य पर्यवेक्षक | (१) (अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), श्रेणी दोनमधील ज्या आरोग्य सहायकांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केले असेल आणि बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठ्यक्रम अथवा स्वच्छता निरीक्षकाचा पाठ्यक्रम वा समतुल्य पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केलेला असेल अशा योग्य आरोग्य सहायकांमधून एकतर पदोन्नती देऊन, अथवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(१) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ पेक्षा जास्त नसेल,<br>(२) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदवी धारण केलेली असेल, आणि<br>(३) ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केलेला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>२. पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकांचे प्रमाण ७५ : २५ असे राहील. |

¹ शासकीय अधिसूचना, दिनांक १४ मे १९८७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## नमुना "अ"[1]

[परिशिष्ट तेरा, नियम (दोन) (३), तीन (३) व चार (३) पहा]

या अधिलेखाद्वारे सर्वात विदित व्हावे की, मी .................. (यात यापुढे ज्याचा उल्लेख "प्रशिक्षणार्थी" म्हणून केला आहे) परिषदेस द्यावयाच्या व तिचे प्रदान उचित रीतीने व खरेखुरे येईल अशा रुपये .......... (रुपये ....................) एवढ्या रकमेकरिता ............ पर्यन्त जिल्हा परिषदेला (यात यापुढे जिचा "परिषद" असा उल्लेख करण्यात आला आहे.) दृढतापूर्वक बांधून घेतलेले आहे. या अधिलेखाद्वारे मी स्वतःला माझ्या वारसाना, मृत्युपत्र व्यवस्थापकांना, प्रबंधकांना आणि वैध प्रतिनिधींना बांधून घेत आहे.

दिनांक .........., माहे ....... १९ या दिवशी स्वाक्षरी केली. ज्याअर्थी, परिषदेने प्रशिक्षणार्थीची, ........... प्रशिक्षण केंद्रावर ....... वर्षीच्या ............. प्रशिक्षण पाठ्यक्रमासाठी (यात यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त पाठ्यक्रम" असा केला आहे) निवड केलेली आहे,

आणि ज्याअर्थी, अशा प्रशिक्षणाधीन असताना परिषदेने प्रशिक्षणार्थ्याला इतर गोष्टींबरोबरच तो प्रशिक्षणार्थी उक्त पाठ्यक्रम पुरा झाल्यावर त्या परिषदेची त्या पदाकरिता परिषद विहित करील अशा वेतन व भत्त्यावर ............ म्हणून ...... वर्षे सेवा करतील आणि त्या प्रयोजनार्थ परिषदेच्या नावे आवश्यक ते बंधपत्र करून देईल, या शर्तीवर रु. .......... एवढे पाठ्यवेतन आणि वेतन व भत्ते मिळून रु. .......... इतकी परिलब्धी देण्याचे मान्य केले आहे."

त्याअर्थी, आता प्रशिक्षणार्थी जर पुढील गोष्टी करील तर ते बंधपत्र निरर्थक होईल, अन्यथा ते पूर्णपणे अंमलात राहील :—

(१) उक्त पाठ्यक्रम चालू करून पुरा करील, परिषदेने उक्त पाठ्यक्रमासाठी वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे पालन करील. प्रशिक्षण चालू असताना चांगले वर्तन ठेवील. पाठ्यक्रमाला नियमित हजर राहील आणि परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे किंवा त्याने या संदर्भात नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांचे संपूर्ण समाधान होईल अशा रीतीने प्रगती करून सर्व विहित परीक्षा/चाचण्या पहिल्या प्रयत्नातच उत्तीर्ण होईल.

(२) उक्त पाठ्यक्रम पुरा करण्यापूर्वी, परिषदेच्या पूर्वपरवानगीशिवाय स्वतःहून पाठ्यक्रम सोडून देणार नाही आणि गैरवर्तनाबद्दल निष्काळजीपणाबद्दल पाठ्यक्रमास हजर राहण्यास कसूर केल्याबद्दल, निष्क्रियतेबद्दल किंवा बेशिस्तीबद्दल परिषदेकडून त्याला मुक्त करण्यात, काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आलेले नसेल, आणि

(३) त्याने उक्त पाठ्यक्रम पुरा केल्यानंतर आणि उक्त पाठ्यक्रमाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, प्रशिक्षणार्थीकडून उक्त पाठ्यक्रम पुरा केल्याबद्दलची लेखी नोटीस, जी उक्त पाठ्यक्रम संपल्यावर तावडतोब प्रशिक्षणार्थ्यांकडून दिली जाईल. ती परिषदेला मिळाल्यापासून ...... ...... कालावधीच्या आत परिषदेने तसे करण्यास भाग पाडल्यास, परिषद त्या पदासाठी निश्चित करील अशा कालावधीच्या आत, परिषद त्या पदासाठी निश्चित करील अशा वेतनमानात उक्त पदावर नेमणूक झाल्यापासून ............ म्हणून किमान ........... एवढ्या कालावधीकरिता परिषदेची सेवा करील.

याद्वारे असे मान्य करण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही अटींचे वा शर्तीचे प्रशिक्षणार्थीने उल्लंघन केल्यास त्याप्रकरणी रु. ........ एवढी संपूर्ण रक्कम किंवा त्यावेळेपर्यंत प्रशिक्षणार्थ्यास देण्यात आलेली असेल अशी त्याहून कमी रक्कम, पाठ्यवेतन व वेतन व भत्त्यासहित परिलब्धी आणि परिषदेने व शासनाने अशा प्रशिक्षणाच्या कालावधीत केलेला आनुषंगिक खर्च व परिषदेने किंवा शासनाने सोसलेल्या नुकसानाची ठरवण्यात येईल इतकी रक्कम प्रशिक्षणार्थ्यांकडून परिषदेला व शासनाला तावडतोब देय होईल आणि प्रशिक्षणार्थ्यांकडून देय असलेली ही रक्कम परिषदेच्या अन्य कोणत्याही अधिकारांना वा उपायांना बाधा न येता प्रशिक्षार्थ्यांकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ मे १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



यांच्या साक्षीदाखल उपरिनामित प्रशिक्षणार्थ्याने यात यापूर्वी लिहिलेल्या दिवशी व वर्षी आपली स्वाक्षरी केली आहे.

उपरिनामित प्रशिक्षणार्थ्याने, पुढील व्यक्तींच्या समक्ष स्वाक्षरी करून स्वाधीन केले.

(१) ......................

(२) ......................

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

परिशिष्ट तेरा—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम समाजकल्याण) श्रेणी एक. | (एक) वरिष्ठ समाजकल्याण सहायक | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम समाजकल्याण), श्रेणी दोन यातील, ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी अखंड सेवा झालेल्या समाजकल्याण सहायकांना वढती देऊन नेमणूक केली जाईल. |
| | | (दोन) ग्रामसेविका .. | (१) ज्या महिला उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून (ज्यांचे वय) ३५ वर्षांहून अधिक नसेल अशा उमेदवारांकडून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. ही वयोमर्यादा, ज्या महिला उमेदवारांना, शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा प्रसिद्ध मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थांमधून ग्रामीण क्षेत्रामध्ये विस्तारकार्य किंवा समाजकार्य करण्याचा ५ वर्षांहून कमी नाही इतक्या वर्षांचा अनुभव असेल अशा योग्य महिला उमेदवारांच्या बाबतीत शिथिल करता येईल, आणि<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य परीक्षा प्रमाणपत्र धारण करीत असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. ही शैक्षणिक अर्हता, ज्या महिला उमेदवारांना शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील, अशा प्रसिद्ध मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थांमधून ग्रामीण क्षेत्रात विस्तारकार्य व समाजकार्य करण्याचा ५ वर्षांहून कमी नाही इतक्या वर्षांचा अनुभव असेल, त्या योग्य महिला उमेदवारांच्या बाबतीत शिथिल करता येईल.<br>परंतु ज्या उमेदवारांना—<br>(अ) अध्यापनाचा, शुश्रुषेचा किंवा समाजकार्याचा अनुभव असेल व विणकाम, शिवणकाम, भरतकाम इत्यादी विषयांचे ज्ञान असेल,<br>(ब) ज्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षिका आणि ग्रामसेवकांच्या पत्नी असतील, |

परिशिष्ट तेरा—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २—चालू | | | (क) ज्यांच्याकडे भारतीय बालकल्याण परिषदेचे किंवा अन्य तत्सम मान्यवर संस्थेचे बालसेविका प्रशिक्षण प्रमाणपत्र असेल, त्यांना अधीक पसंती देता येईल.<br>(२) नेमणुकीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना, जिल्हा परिषदेने ठरवून दिलेल्या संस्थेत गृह, अर्थशास्त्र या विषयातील किंवा अन्य योग्य अशा विषयातील प्रशिक्षण, जिल्हा परिषद वेळोवेळी निश्चित करील एवढ्या पाठ्यवेतनावर बारा महिन्यांपेक्षा अधिक नाही एवढ्या कालावधीकरिता घ्यावे लागेल. केंद्रात घेण्यात येणारी अंतिम परीक्षा उत्तीर्ण होणे धरून प्रशिक्ष ण पाठ्यक्रम पूर्ण करण्यात जे उमेदवार कसूर करतील ते त्यांना देण्यात आलेल्या पाठ्यवृत्तीसह प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च परत करण्यास पात्र ठरतील.<br>(३) निवड झालेल्या उमेदवारांना असे करारपत्र करून द्यावे लागेल की, ते प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर, दोन वर्षांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीकरिता जिल्हा परिषदेच्या सेवेत राहतील आणि त्या करारपत्रानुसार जिल्हा परिषदेची सेवा करण्यात त्यांनी कसूर केल्यास प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च आणि त्यांना दिलेली पाठ्यवेतनाची रक्कम जिल्हा परिषदेकडे परत करण्यास पात्र ठरतील. |
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) [1][दुय्यम समाजकल्याण] श्रेणी दोन | समाजकल्याण सहाय्यक .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात |

१—चालू

(दोन) ज्या मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या स्नातक पदवी धारण करीत असतील,—

अशा महिला उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाजकार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातक पदवी धारण करीत असलेल्या उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल.

(२) बढतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्याचे गुणोत्तर ३ : १ राहील.

(३) या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तींना समाज शिक्षणाचा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करावा लागेल आणि नमुना 'अ' मधील करारपत्र करून द्यावे लागेल.

(चार) पर्यवेक्षिका (एकात्मिक बाल-विकास सेवा)

(१) नेमणूक एक तर.—

(अ) जिल्हा परिषदेतील योग्य मुख्य सेविकेची बदली करून, किंवा

(ब) बदलीसाठी मुख्य सेविका उपलब्ध नसतील तर, जिल्हा सेवा-(वर्ग तीन) (दुय्यम समाजकल्याण) श्रेणी एक यातील ज्या ग्रामसेविका माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या असतील आणि ज्यांनी ग्रामसेविका म्हणून किमान ३ वर्षे अखंड सेवा केलेली असेल व ज्या मुख्य सेविकेच्या पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत अर्ह ठरलेल्या असतील, अशा सुयोग्य ग्रामसेविकांना बढती देऊन करण्यात येईल :

परंतु, ज्या ग्रामसेविकेने ग्रामसेविका म्हणून ७ वर्षांहून कमी नाही एवढ्या काळापर्यंत अखंड सेवा केलेली असेल आणि जी मुख्य सेविकेच्या



परिशिष्ट तेरा—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | |

पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत अर्ह ठरलेली असेल तिच्या बाबतीत, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करता येईल, किंवा

(क) पुढील महिला उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(एक) ज्या महिला उमेदवार आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत असतील व ज्या ३० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या नसतील अशा महिला उमेदवार :

परंतु, आवश्यक शैक्षणिक अर्हता असणाऱ्या बालसेविका व आंगणवाडी सेविकांच्या बाबतीत, कमाल वयोमर्यादा आणखी १५ वर्षांच्या कालावधीकरिता किंवा ४५ वर्षे वयापर्यंत किंवा त्यांनी, बालसेविका किंवा आंगणवाडी सेविका किंवा बालवाडी सेविका किंवा ग्रामसेविका किंवा बालवाडीतील किंवा शिशु शिक्षण वर्गातील किंवा शाळापूर्व शिक्षण केंद्रातील किंवा पूरक पोषण केंद्रातील शिक्षिका म्हणून जेवढा काळपर्यंत सेवा केलेली तेवढ्या कालावधीकरिता शिथिल करता येईल. मात्र अशा बालवाडीला किंवा शिशु शिक्षण वर्गाला किंवा शाळापूर्व शिक्षण केंद्राला किंवा पूरक पोषण केंद्राला, त्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका संस्थेकडून अनुदान मिळत असले पाहिजे, अशी अट राहील,—

(एक) केंद्र किंवा राज्य शासन;

(दोन) केंद्रीय समाजकल्याण मंडळ किंवा राज्य समाजकल्याण मंडळ;

(तीन) रेडक्रॉस;

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | [1][(दोन) सहाय्यक बालविकास प्रकल्प-अधिकारी (एकत्रित बालविकास सेवा) | (१) नेमणुका एक तर,—<br>(अ) एकत्रित बालविकास सेवेत किंवा जिल्हा परिषदेमध्ये काम करण्याची जी मुख्य सेविका किंवा पर्यवेक्षक किमान माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तीची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेली असेल आणि जिने (एकात्मिक बालविकास सेवेत) मुख्य सेविका म्हणून किंवा पर्यवेक्षक म्हणून काम एकमान ३ वर्षे अखंड सेवा केलेली असेल त्यांना बढती देऊन, किंवा<br>(ब) (एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून जे उमेदवार असतील ते खेरीज करून, जे २८ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील, आणि<br>(दोन) जे राज्य शासनाने मान्यता दिलेली, समाजविज्ञान किंवा गृहविज्ञान किंवा पोषण किंवा बालविकास या विषयातील पदवी जे धारण करीत असतील,—<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे केल्या जातील :<br>परंतु ग्रामकल्याण व समाजकल्याण आणि स्थानिक विकासाच्या क्षेत्रातील ज्यांना तीन वर्षांचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव आहे अशा उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल.<br>(२) बढतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे केलेल्या नेमणुकांचे गुणोत्तर ३ : १ असेल :<br>परंतु या नियमांतील कोणत्याही गोष्टीमुळे, जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांनी शासनाच्या ग्रामविकास विभागाचे अर्धशासकीय |

[1] शासन अधिसूचना, दिनांक २३ मे १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



परिशिष्ट तेरा—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १—चालू | | | पत्र क्रमांक आयसीडी. १०८८/सीआर–१५११/४७, दिनांक ३० नोव्हेंबर १९८८ यात दिलेल्या आदेशांना अनुलक्षून, सहाय्यक बालविकास अधिकारी (एकात्मिक बालविकास योजना) या पदावर केलेल्या नेमणुकांना बाध येणार नाही.<br>(३) बढतीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेल्या व्यक्तींना, नेमणुकीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत एकात्मिक बालविकास सेवा कार्यक्रमासाठी विशेष प्रशिक्षण घ्यावे लागेल आणि नमुना 'अ' मधील करारपत्र करून द्यावे लागेल. |
| | | (तीन) मुख्य सेविका .. | (१) नेमणुका,—<br>(अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम समाजकल्याण) श्रेणी एक, यातील जी ग्रामसेविका माध्यमिक शाळा, प्रमाणपत्र परीक्षा किंवा तिची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेली असेल आणि जिने ग्रामसेविका म्हणणून किमान ती वर्ष सेवा केलेली असेल आणि जी, त्या पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत अर्ह ठरलेली असेल अशा योग्य ग्रामसेविका बढती देऊन करण्यात येईल :<br>परंतु, ज्या ग्रामसेविकेने ग्रामसेविका म्हणून ७ वर्षाहून कमी नाही इतक्या काळापर्यंत अखंड सेवा केलेली असेल आणि त्या पदासाठी विहित केलेल्या परीक्षेत ती अर्ह ठरलेली असेल, तिच्याबाबत माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करता येईल : किंवा<br>(ब) (एक) ज्या महिला उमेदवार आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत असतील व ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा; आणि |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ८ | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर .. | वैद्यकीय व्रणोपचारक | .. जे उमेदवार साक्षर असतील व आपली कर्तव्ये समाधानकारकरीत्या बजावण्याच्या दृष्टीने शारीरिकदृष्ट्या पात्र असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. तथापि व्रणोपचारक म्हणून अनुभव असलेल्यांना अधिक पसंती देण्यात येईल :<br>परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी, अनुभवी उमेदवारांच्या बाबतीत, वरची वयोमर्यादेची अट ३५ वर्षेपर्यंत शिथिल करू शकेल. |
| ९ | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर .. | वैद्यकीय दाई | .. ज्या महिला कर्तव्ये समाधानकारकरीत्या बजावण्याच्या दृष्टीने शारीरिकदृष्ट्या पात्र असतील अशा महिला उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. तथापि एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर ज्यांनी मान्यताप्राप्त संस्थेकडील दाई प्रशिक्षण प्रमाणपत्र धारण केले असेल अशा उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| [१][* * * *] | | | |
| ११ | जिल्हा सेवा (वर्ग चार) प्रथम श्रेणी | गाव कामगार | गाव कामगार, द्वितीय श्रेणी यांना पदोन्नती देऊन त्याद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| १२ | जिल्हा सेवा (वर्ग चार) गाव कामगार, द्वितीय श्रेणी. | गाव कामगार (निम्नस्तर) | .. जे उमेदवार आपली कर्तव्ये समाधानकारकरीत्या बजावण्याच्या दृष्टीने शारीरिकदृष्ट्या पात्र असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. तथापि साक्षर उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक १३ नोव्हेंबर १९७९ अन्वये गाळण्यात आले.



## [१][परिशिष्ट तेरा

(नियम ५ पहा)

जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन)- समाजकल्याण [२][व जिल्हा सेवा (दुय्यम) समाजकल्याण] यात समाविष्ट केलेल्या पदांसाठी उमेदवारांची अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती ठरवून देणारे नियम

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीसाठी अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (समाजकल्याण). | (एक) विस्तार अधिकारी (समाजकल्याण). | (१) (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) दुय्यम समाजकल्याण श्रेणी एक यातील ३ वर्षांपेक्षा कमी नाही, इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या वरिष्ठ समाजकल्याण सहायकांना पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) समाजकल्याण कार्यात किंवा कार्यक्रमात ज्यांनी ३ वर्षे अखंड सेवा पूर्ण केलेली असेल, आणि<br>(तीन) ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची समाजशास्त्र ह्या विषयाची पदवी असेल, अशा उमेदवारांतून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे गुणोत्तर १ : १ असे राहील. |

[१] शासन अधिसूचना २३ डिसेंबर ८३ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
[२] शासन अधिसूचना २० ऑक्टोबर १९८९ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | [१] [परंतु आकस्मिकता निधीतून वेतन दिल्या जाणाऱ्या पूर्णकालिक किंवा अंशकालिक आस्थापनेवर किमान सलग तीन वर्षे एवढ्या कालावधीकरिता काम केलेल्या व्यक्तींना अधिक पसंती दिली जाईल : ] |
| | | | परंतु [२] [आणखी] असे की, पदोन्नतीने नेमणुकीसाठी उमेदवार उपलब्ध नसतील तेव्हाच फक्त नामनिर्देशनाने नेमणूक करण्यात येईल : |
| | | | [३] [परंतु आणखी असे की] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०७६, दिनांक २३ एप्रिल १९७६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आणि त्यानंतर वेळोवेळी शासनाने तत्संबंधी दिलेल्या कोणत्याही उत्तरवर्ती आदेशानुसार सेवेत असतांना निधन झालेल्या किंवा क्षय, कर्करोग इत्यादी सारख्या गंभीर आजारामुळे मुदतपूर्व सेवानिवृत्त झालेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या जवळच्या नातेवाईकांस असे नातेवाईक जर कोणत्याही मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण असल्यास अनुकंपा म्हणून नामनिर्देशनाने प्राधान्याने नेमणूक करण्यात येईल. |
| | | | [४] [आणखी असे की, शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्र. एव्हीटी २४७९/१६३०७/३१९५/४, दिनांक ११ सप्टेंबर १९८० यात अंतर्भूत असलेल्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिचर या पदावर केलेल्या नेमणुकीवर या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. |

[१] शासन अधिसूचना, दिनांक ९ जानेवारी १९८५ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
[२] शासन अधिसूचना, दिनांक ९ जानेवारी १९८५ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
[३] शासन अधिसूचना, दिनांक ९ जानेवारी १९८५ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
[४] शासन अधिसूचना, दिनांक ३ एप्रिल १९८९ अन्वये समाविष्ट करण्यात आले.



---



परिशिष्ट बारा—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४ | [१] [* * * *] [२] [जिल्हा सेवा वर्ग चार] परिचर, प्रथम श्रेणी. | माळी | जे उमेदवार— (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा अधिक नसेल आणि (दोन) ज्यांनी महाराष्ट्र राज्यातील कृषि विद्यापीठांनी चालविलेला माळ्याचा एक वर्षाचा मान्यताप्राप्त प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केला आहे अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| ५ | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर, प्रथम श्रेणी. | आगवाला | .. जे उमेदवार— (अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [३] [२८] वर्षाहून अधिक नसेल आणि (ब) त्या पदाच्या कर्तव्याचे ज्ञान आणि अनुभव असलेले अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यांत येईल. |
| | [४] [* * * *] | | |
| ७ | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर .. | पशुवैद्यकीय व्रणोपचार | .. ज्यांना व्रणोपचाराचा सराव आहे व ज्यांनी एक वर्षाहून कमी नसेल एवढ्या अखंड कालावधीकरिता [५] [पशुवैद्यकीय दवाखाना किंवा पशुवैद्यकीय सहाय्य केंद्र यामध्ये काम केले आहे अशा परिचरांस] पदोन्नती देऊन त्यांची नेमणूक करण्यात येईल. |

[१] शासन अधिसूचना, दिनांक २८ मे १९७१ अन्वये गाळले.
[२] शासन अधिसूचना, दिनांक ३० डिसेंबर १९८३ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
[३] शासन अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] शासन अधिसूचना, दिनांक १९ जानेवारी १९७३ अन्वये गाळण्यात आले.
[५] शासन अधिसूचना, दिनांक २९ डिसेंबर १९७२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## परिशिष्ट बारा

(नियम ५ पहा)

### भाग एक

जिल्हा सेवा (वर्ग चार) यामधील पदांवर नेमणूक करण्यासाठी अर्हता आणि पद्धती नमूद करणारे सर्वसाधारण नियम.

पुढे विहित केलेल्या नियमान्वये नामनिर्देशनाद्वारे किंवा पदोन्नतीद्वारे व पुढील शर्तीस अधीन राहून जिल्हा सेवा (वर्ग चार) यामधील पदांवर सेवाप्रवेश दिला जाईल :—

(अ) या नियमांत अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, जिल्हा सेवा (वर्ग चार) यात नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करावयाच्या उमेदवारांचे वय [1][२८] वर्षांहून अधिक असता कामा नये आणि त्यास, त्यांचे काम समाधानकारकरीत्या पार पाडता येईल इतकी पुरेशी बुद्धिमत्ता आणि चांगले आरोग्य असले पाहिजे.

निवड करताना साक्षर उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल.

(ब) पदोन्नती देऊन, पदांवर नेमणूक करण्यासाठी उमेदवारांची निवड करण्याच्या बाबतीत प्रादेशिक भाषा वाचू शकणाऱ्या व लिहू शकणाऱ्या व्यक्तींना अधिक पसंती दिली जाईल :

परंतु हा नियम काटेकोरपणे अंमलात आणल्यास त्रास होईल अशी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची खात्री पटल्यास, ती कारणे लेखी नमूद करून, कोणत्याही विवक्षित प्रकरणी ही तरतूद शिथिल करता येईल.

**स्पष्टीकरण.**—ह्या नियमात, "साक्षर" म्हणजे, जिल्हा परिषदेच्या जिल्ह्यात सामान्यतः प्रचारात असलेल्या भाषेत अथवा बोलीत वाचू व लिहू शकणारी व्यक्ती.

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



## परिशिष्ट बारा

(नियम ५ पहा)

### भाग दोन

**जिल्हा सेवा (वर्ग चार) यात अंतर्भूत असलेल्या पदांवर नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांच्या अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम**

| अनुक्रमांक (१) | सेवा आणि संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर, प्रथम श्रेणी. | हवालदार | .. [1][जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर, प्रथम श्रेणीमधील परिचारास] पदोन्नती देऊन नेमणूक केली जाईल. |
| २ | [2][* * * *] | | |
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग चार) परिचर, प्रथम श्रेणी. | परिचर | .. [3][नेमणूक एक तर—<br>(अ) पुढील उमेदवारांमधून पदोन्नतीने केली जाईल—<br>(एक) जिल्हा सेवा (वर्ग चार) गाव कामगार, प्रथम श्रेणीमधील गाव कामगार.<br>[4][* * * *]<br>किंवा<br>(ब) मान्यताप्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता ४ थी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल. |

(१) शासन अधिसूचना, दिनांक २३ सप्टेंबर १९८० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
(२) शासन अधिसूचना, दिनांक २३ सप्टेंबर १९८० अन्वये गाळण्यात आला.
(३) शासन अधिसूचना, दिनांक १३ नोव्हेंबर १९७९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
(४) शासन अधिसूचना, दिनांक ९ जानेवारी १९८५ अन्वये गाळण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) तृतीय श्रेणी | [1][वरिष्ठ सहाय्यक (लेखा)] | [1](एक) नेमणूक एक तर—<br>(अ) यासंबंधी विहित केली जाईल अशी लेखालिपिक परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले [2][आणि त्या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केलेल्या) कनिष्ठ सहाय्यकखे भांडार सहाय्यक अथवा भांडारपाल यांना पदोन्नती देऊन करण्यात येईल, अथवा<br>परंतु असे की, सदर परीक्षा उत्तीर्ण केलेली एकही व्यक्ती उपलब्ध नसेल तर ज्यांची तीन वर्षांपेक्षा कमी नाही एवढी अखंड सेवा पूर्ण येली असेल अशा सदर परीक्षा पदोन्नतीच्या दिनांकापासून दोन वर्षांमध्ये किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा भरती) (नववी) सुधारा) नियम, १९९० हे प्रसिद्ध झाल्यानंतरचा यांपैकी नंतरचा असेल त्या कालावधीत उत्तीर्ण न झाल्यास खालच्या पदावर पदावनत करण्यात येईल या अटींच्या आंत राहुन लेखा प्रवर्गात येण्याचा पर्याय ज्यांनी स्वीकारला आहे असे कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल, भांडार सहाय्यक, यामधून पदोन्नती देऊन करण्यात येईल.]<br>आणखी असे की, संबंधित आयुक्तांस अपवादात्मक बाबतीत कारणे ले.ी नमूद करून उपरोक्त कालावधी एक वर्षाने वाढवता येईल.<br>(दोन) जे उमेदवार—<br>(अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [3][२८] वर्षांहून अधिक नसेल, मात्र लेखाविषयक किमान ३ वर्षांचा प्रत्यक्ष |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचनी, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३—चालू | | | अनुभव असेल अशा उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा [1][३१] वर्षांपर्यंत शिथिल केली जाईल, आणि<br>(ब) मान्यताप्राप्त अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील याबाबतीत लेखाशास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्या अथवा पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील पदवी धारण करणाऱ्या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षांहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधीपर्यंत लेखाविषयक कामाचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>२. नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेल्या व्यक्तीला, त्या पदावर नेमणूक झाल्याची तारीख अथवा अशा प्रकारच्या विभागीय परीक्षेचे नियम विहित करणारी तारीख यांतील जी तारीख नंतरची असेल, त्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल :<br>परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी अपवादात्मक बाबतीत ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा कालावधी नमूद करून एक वर्षापर्यंत वाढवू शकेल.<br>३. पन्नास टक्क्यांहून अधिक नसतील इतकी पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येतील. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) द्वितीय श्रेणी | उपलेखापाल [१][कनिष्ठ लेखा अधिकारी] | १. नेमणूक एक तर—<br>(अ) उपलेखापालाची परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले [२][आणि वरिष्ठ सहाय्यक लेखा) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केलेल्या वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांस पदोन्नती देऊन केली जाईल.<br>परंतु, उक्त परीक्षा उत्तीर्ण झालेली एकही व्यक्ती नसेल, तर वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तीमधून तिच्या पदोन्नतीची तारीख अथवा हे नियम प्रसिद्ध झाल्याची तारीख यापैकी जी तारीख नंतरची असेल, त्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत ती उक्त परीक्षा उत्तीर्ण होईल आणि ती परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास ती कनिष्ठ पदावर प्रत्यावर्तीत केली जाण्यास पात्र होईल. या अटीवर पदोन्नती देण्यात येईल :<br>आणखी असे की, उपलेखापाल म्हणून ज्यांस १ मे १९६२ नंतर यापूर्वीच पदोन्नती देण्यात आलेली असून जे उक्त परीक्षा उत्तीर्ण झाले नसतील त्यांना हे नियम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत ही परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल. जे ही परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांस कनिष्ठ पदावर प्रत्यावर्तित केले जाण्यास ते पात्र ठरतील.<br>तसेच संबंधित विभागाचे आयुक्त, अपवादात्मक बाबतीत कारणे लेखी नमूद करुन पहिल्या व दुसऱ्या परंतुकात विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी एक वर्षाने वाढवू शकतील. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ एप्रिल १९९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.



परिशिष्ट अकरा—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| २—चालू | | | किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांहून अधिक नसेल आणि<br>(दोन) ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल व कोणतेही सरकारी कार्यालय, व्यापारी भागीदारी संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यांतील किमान ५ वर्षांचा अखंड सेवेचा ज्यांना अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. याबाबतीत लेखाशास्त्र आणि लेखापरीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्यांना अथवा प्रथम वा द्वितीय वर्गातील पदवी धारण करणाऱ्यांना अधिक पसंती दिली जाईल.<br>किंवा<br>गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. याबाबतीत कोणत्याही सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधिकरणातील लेखाकार्याचा अनुभव असणाऱ्यास अधिक पसंती दिली जाईल.<br>(२) नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेल्या व्यक्तींना उपलेखापालाची परीक्षा त्या पदावरील त्यांच्या नेमणुकीपासून दोन वर्षांच्या आत उत्तीर्ण व्हावे लागेल. तो उत्तीर्ण न झाल्यास तो सेवामुक्त केला जाण्यास पात्र होईल :<br>परंतु अपवादात्मक बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकारी, कारणे लेखी नमूद करुन परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या कालावधीत एक वर्षाने वाढ करु शकेल.<br>(३) २५ टक्क्यांहून अधिक नसतील एवढी पदे नामनिर्देशनाद्वारे भरली जातील. |

## परिशिष्ट अकरा

(नियम ५ पहा)

**जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) यात अंतर्भूत असलेल्या पदांवर नेमणूक करण्यासाठी उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम**

| अनुक्रमांक (१) | सेवा आणि वर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) प्रथम श्रेणी. | [1][सहाय्यक लेखा अधिकारी] | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लेखा) द्वितीय श्रेणी यात [2][तीन] वर्षांहून कमी नसेल इतका कालावधी अखंड सेवा केलेल्या आणि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग तीनची परीक्षा अथवा अन्य कोणतीही तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या [1][कनिष्ठ लेखा अधिकारी] पदोन्नती देऊन नेमणूक केली जाईल :<br>परंतु, जर उक्त परीक्षा उत्तीर्ण झालेली एकही व्यक्ती नसेल, तर उप लेखापालाची परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तींमधून तिच्या पदोन्नतीची तारीख अथवा [3][उक्त परीक्षेस बसण्यासाठी तिला पात्र ठरवण्यात आल्याची) तारीख यापैकी जी तारीख नंतरची असेल त्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत जो उक्त परीक्षा उत्तीर्ण होईल व ही परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास तो कनिष्ठ पदावर प्रत्यावर्तित केली जाण्यास पात्र होईल या अटीवर पदोन्नती देण्यात येईल.<br>[4][परंतु आणखी असे की, ज्या व्यक्तींनी मुख्य लेखपाल किंवा विभागीय लेखपाल म्हणून २५ जून १९८७ पर्यंत ३ वर्षांपेक्षा जास्त काळापर्यंत काम केले असेल अशा व्यक्तीस सदर परीक्षा किंवा इतर समकक्ष परीक्षा उत्तीर्ण होण्याची आवश्यकता नाही.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ एप्रिल १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १ सप्टेंबर १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक ११ जानेवारी १९७१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[4] शासकीय अधिसूचना, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) तृतीयश्रेणी. (एक) वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी) (दोन) कनिष्ठ (संख्यीकी सहाय्यक)

१. जे उमेदवार—

(अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षाहून अधिक नसेल, आणि

(ब) (एक) विद्यापिठाची विज्ञान,-कृषि, वाणिज्य किंवा वाङ्मय शाखेची, अर्थशास्त्र गणित अथवा सांख्यिकी यापैकी एका विषयाची मान्यता प्राप्त पदवी धारण करीत असतील, किंवा

(दोन) सिडनहॅम वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालयाने दिलेली "पब्लिक ॲंड बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन" या विषयाची पदविका धारण करीत असतील असा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल:

परंतु ज्यांनी उपरोक्त पदवी अथवा पदविका पहिल्या अथवा दुसऱ्या वर्गात प्राप्त केली असेल आणि/किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल अशा कर्मचाऱ्यास अधिक पसंती दिली जाईल.

२. नियुक्त झालेल्या व्यक्तींना अर्थ व सांख्यिकी केंद्र, मुंबई यांच्याकडून चालविण्यात येणारा प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण करावा लागेल व विहित परिक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. विहित संधीमध्ये जी व्यक्ती उक्त परिक्षा उत्तीर्ण होऊ शकणार नाही. ती कोणत्याही उच्च पदावरील पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.

(३) नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारास सोबत जोडलेल्या नमुना "फ" मध्ये करारनामा करुन द्यावा लागेल.

नमुना "फ"

(परिशिष्ट दहा, नियम क्रमांक ३ पहा)

## करारनामा

या अधिलेखाद्वारे सर्व लोकांस ज्ञात व्हावे की, मी ..................................................
(प्रशिक्षणार्थीचे पूर्ण नाव) ..................................................
(पूर्ण पत्ता), महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ (जिचा यात यापुढे "जिल्हा परिषद" असा उल्लेख केला आहे) अन्वये प्रस्थापित केलेल्या संदर्भाद्वारे वगळण्यात आले नसेल तर किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर तिचा उत्तरधिकारी आणि अभिहस्तांकित यांचा त्यामध्ये समावेश होईल. (जिल्हा परिषदेचे नाव) .......... आणि जिल्हा परिषदेला रु. ..... (रुपये ............) देण्यास बद्ध झालो आहे व दृढतापूर्वक बांधला गेलो आहे आणि या अधिलिखाद्वारे मला स्वतःला, वारसांना, मृत्युपत्र व्यवस्थापकांना, कारभाऱ्यांना आणि वैध प्रतिनिधींना बांधून घेत आहे.

आज दिनांक ......... एकोणीसशे ...... ज्याअर्थी, वरील बांधलेला ........ (प्रशिक्षार्थ्याचे नाव) (ज्याचा यात यापुढे "प्रशिक्षणार्थी" असा उल्लेख केला आहे.) यांची मुंबई येथील अर्थ व सांख्यिकी केंद्राकडून चालविण्यात येणारा प्रशिक्षण, पाठ्यक्रम पूर्ण करण्यासाठी, केंद्रातील प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर जिल्हा परिषदेकडून फर्मावण्यात आल्यास तो जिल्हा परिषदेत किमान तीन वर्षापर्यंत जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) तृतीय श्रेणी यात वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी) म्हणून सेवा करील या अटीवर निवड करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता पुढील गोष्टी केल्यास बंधपत्र निरर्थक होईल अन्यथा पूर्णपणे अंमलात राहील—

(एक) प्रशिक्षणार्थी हा आपला अभ्यास सापेक्षतेने करून केंद्राच्या नियमांचे प्रामाणिकपणे पालन करील, त्याची वर्तणूक चांगली असेल, तो पाठक्रमास नियमितपणे उपस्थित रहात असे आणि प्रशिक्षण घेताना ............ (केंद्राच्या अधिकाऱ्यांचे पदनाम) यांचे पूर्ण समाधान होईल, अशारीतीने त्याची प्रगती होत असेल व तो चाचणी व/अथवा परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, आणि

(दोन) ............ (केंद्राच्या अधिकाऱ्याचे पदनाम) यांच्या परवानगीशिवाय प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षण सोडले नसेल अथवा त्यास प्रशिक्षण वर्गातून काढून टाकले नसेल, आणि

(तीन) प्रशिक्षणार्थी, जिल्हा परिषदेने अथवा ......... (केंद्राच्या अधिकाऱ्याचे पदनाम) ने घालून दिलेल्या शर्ती, नियम, विनियम आणि दिलेले आदेश व वेळोवेळी दिलेले निदेश यांचे पालन करीत असेल, आणि

(चार) निष्काळजीपणामुळे, दुर्वर्तनामुळे अथवा हयगयीमुळे प्रशिक्षार्थ्याने जिल्हा परिषदेचे कोणतेही नुकसान केले नसेल, आणि

(पाच) प्रशिक्षार्थ्यास, त्याचे प्रशिक्षण संपल्यानंतर जिल्हा परिषदेने सेवेची संधी दिल्यावर जिल्हा परिषदेत तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या काळापर्यंत वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी) म्हणून जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) तृतीय श्रेणी यात, त्या पदासाठी विहित केले असेल इतके वेतन आणि भत्ते यावर सेवा करावी लागेल.

आणि वरील अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटीचा अथवा शर्तीचा प्रशिक्षार्थ्याने भंग केल्यास त्या प्रसंगी संपूर्ण रक्कम रुपये .........; किंवा जिल्हा परिषदेने प्रशिक्षणावर केलेल्या खर्चाबाबतची त्यापेक्षा कमी असलेली रक्कम रुपये ......... त्यावरील दरसाल ...... टक्के व्याजासह प्रशिक्षार्थ्याने, त्याच्याकडे मागणी केली असता, ताबडतोब दिली पाहिजे, आणि

(नियम ५ पहा)

**जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) मध्ये अंतर्भूत केलेल्या पदांवरील नेमणुकीसंबंधी उमेदवारांच्या अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम.**

| अनुक्रमांक (१) | सेवा आणि संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) प्रथम श्रेणी. | सांख्यिकी पर्यवेक्षक | (१) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) द्वितीय श्रेणी यातील कर्मचाऱ्यांस पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.<br>(२) ज्या कर्मचाऱ्याची, जिल्हा सेवा (वर्ग तीन)-(सांख्यिकी) द्वितीय श्रेणी या सेवेमध्ये तीन वर्षांहून कमी असेल एवढी अखंड सेवा झाली असेल असा कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरणार नाही. |
| २ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (सांख्यिकी) द्वितीय श्रेणी | [1][विस्तार अधिकारी (सांख्यिकी)] | [2][नेमणूक एक तर—<br>(१) (अ) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्याकडून वरिष्ठ सहायक (सांख्यिकी) या पदासाठी चालविण्यात येणारा प्रशिक्षण पाठ्यक्रम ज्यांनी यशस्वीपणे पूर्ण केला असेल आणि वरिष्ठ सहायक (सांख्यिकी) किंवा कनिष्ठ सांख्यिकी सहायक [3][या पदावर किमान तीन वर्षे अखंड सेवा पूर्ण केली आहे अशा योग्य व्यक्तीस] पदोन्नती देऊन करण्यात येईल :<br>परंतु, जर एखादेवेळी उक्त प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेला कर्मचारी पदोन्नतीसाठी उपलब्ध नसेल तर वरिष्ठ सहाय्यक (सांख्यिकी) किंवा कनिष्ठ सांख्यिकी सहायक या पदावर १० वर्षांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीपर्यंत अखंड सेवा करीत असलेल्या कर्मचाऱ्यांचा नामनिर्देशनासाठी ठरवलेल्या गुणोत्तरातील पदोन्नतीसाठी त्याने उक्त प्रशिक्षण |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ५ डिसेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक ७ एप्रिल १९८६ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक ३० नोव्हेंबर १९९० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.



परिशिष्ट दहा—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | पाठ्यक्रम सततच्या पाच संधींमध्ये यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक असेल व असा प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण न केल्यास तो वरिष्ठ सहायक (सांख्यिकी) किंवा यथास्थिती कनिष्ठ सांख्यिकी सहायक या पदावर पदावनत केला जाईल या अटीच्या अधीन राहून विचार केला जाईल,<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) संविधिमान्य विद्यापीठाची विज्ञान, कृषि, वाणिज्य किंवा वाङ्मय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर द्वितीय वर्गातील पदवी धारण करीत असतील किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल, किंवा पदवी व अनुभव दोन्ही असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, उक्त विषयांपैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल :<br>२. नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या उमेदवाराने अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्याकडून वरिष्ठ सहायक (सांख्यिकी) या पदासाठी चालविण्यात येणारा प्रशिक्षण पाठ्यक्रम, सततच्या पाच संधींमध्ये यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक असेल. प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण न केल्यास त्यांना सेवेतून मुक्त करण्यात येईल.<br>३. पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकांचे गुणोत्तर १ : १ असे राहील.] |

परिशिष्ट नऊ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ६—चालू | | | (अ) नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीसाठी खंड (ब), उपखंड (तीन) मध्ये विहित केलेले लघुलेखनातील व टंकलेखनातील वेगाचे प्रमाणपत्र ज्याने धारण केलेले आहे आणि ज्याने त्या पदावर किमान ती वर्षे अखंड सेवा केली अशा, जिल्हा परिषदेतील योग्य कनिष्ठ सहाय्यक भांडार सहाय्यक किंवा संगणित्र चालक यास पदोन्नती देऊन किंवा<br><br>(ब) पुढील उमेदवारांपैकी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करून—<br>(एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून असतील ते खेरीज करून ज्यांचे वय अठ्ठावीस वर्षांपेक्षा अधिक नसेल असे उमेदवार,<br><br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा जे उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार, आणि<br><br>(तीन) आयुक्त, शासकीय परीक्षा केंद्र, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात येईल अशा अन्य संस्थेने दिलेले इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटास ८० शब्दांपेक्षा कमी नसेल व इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटास ४० शब्दांपेक्षा कमी नसेल किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटास ३० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगाचे प्रमाणपत्र ज्यांच्याकडे असेल असे उमेदवार.<br><br>२. पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण १ : १ असे राहील]. |

१०८

परिशिष्ट नऊ—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| [१][६-अ जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम लिपिक वर्गीय) द्वितीय श्रेणी. | जिल्हा महिला क्षेत्र कार्यकर्ती-नि-संगणक | | (१) जे उमेदवार—<br>(अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [२][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि;<br>(ब) गणित विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल ;<br>परंतु असामान्य चांगली शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा हे दोन्ही असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा ३० वर्षांपर्यंत शिथील करण्यात येईल.] |
| [३][ * * * * * ] | | | |

[१] शासकीय अधिसूचना दिनांक ७ ऑक्टोबर १९७५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुरा ऐवजी दाखल करण्यात आला.
[३] शासकीय अधिसूचना दिनांक १६ फेब्रुवारी १९८१ अन्वये गाळण्यात आले.

१०९

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५—चालू | | | (ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८ वर्षा-पेक्षा] अधिक नसेल.<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि<br>[२][तीन] महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु असे की, उक्त दोन भाषांपैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार, नियुक्त केलेल्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीत दुसऱ्या भाषेतील दर मिनिटास ३० शब्दांहून कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील. असे वेगाचे प्रमाणपत्र |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २० एप्रिल १९७७ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.





| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५—चालू | | | प्राप्त न केल्यास, राज्य शासन त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून ठरवील अशा कार्यवाहीस ते पात्र ठरतील :—<br>परंतु आणखी असे की, इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल :<br>[१][परंतु आणखी असे की, गणित विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीच फक्त जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात संगणक या पदावर नियुक्तीस पात्र असतील].<br>२. भांडार सहाय्यक किंवा भांडारपाल या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यासाठी भांडाराच्या कामकाजाचा पूर्वानुभव असलेल्या उमेदवारास अधिक पसंती दिली जाईल.<br>[२][* * * * * * ]<br>[३][(४) या संवर्गात वर्ग चारच्या व्यक्तींमधून पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदांची संख्या त्या त्या विशिष्ठ वर्गातील एकूण रिक्त पदांच्या २५ टक्यां-पेक्षा जास्त असता कामा नये.] |
| ६ जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम लिपिक वर्गीय) प्रथम श्रेणी | लघुटंकलेखक | | [४][(१) लघु टंकलेखकाची नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ ऑगस्ट १९७८ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक १ नोव्हेंबर १९८४ अन्वये गाळण्यात आला.
[३] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ नोव्हेंबर १९९० अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[४] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ जून १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४—चालू

(तीन) आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात आलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले इंग्रजी किवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटास १२० शब्दांहून कमी नसेल इतक्या गतीचे आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटास ४० शब्दांहून किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनीटास ३० शब्दांहून कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.

(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकीचे गुणोत्तर १ : १ असे राहील.

*[दोन] निम्न श्रेणी लघुलेखक] . . (१) निम्न श्रेणी लघुलेखकाच्या पदावर करावयाची नेमणूक एकतर—

(अ) नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीसाठी खंड (ब), उपखंड (तीन) मध्ये विहित केलेले लघुलेखनातील आणि टंकलेखनातील गतीचे प्रमाणपत्र ज्याने धारण केले असेल अशा जिल्हा परिषदेतील योग्य लघुटंकलेखकास पदोन्नती देऊन करण्यात येईल किंवा

(ब) जे उमेदवार—

(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा जास्त नसेल.

(दोन) महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) या अन्वये

* शासकीय अधिसूचना, दिनांक १६ जुलै, १९८६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट नऊ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्प्याच्या अखेरीस घेतलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा त्या परीक्षेस तुल्य असलेली परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि<br>(तीन) आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेले किंवा त्या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात आलेल्या अशा इतर संस्थेने दिलेले, इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटाला १०० शब्दांहून कमी नसेल इतक्या गतीचे आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटाला ४० शब्दांहून किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटाला ३० शब्दांहून कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र जे धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकीचे गुणोत्तर १ : १ असे राहील. |
| ५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम लिपिक वर्गीय) प्रथम श्रेणी. | (एक) कनिष्ठ सहायक<br>(दोन) भांडार सहायक<br>(तीन) भांडारपाल<br>²[चार] संगणक | (अ) नेमणूक एक तर—<br>¹[* * * * * *]<br>³[(दोन) जिल्हा सेवा (वर्ग चार) यातील, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि जिल्हा सेवेला (वर्ग चार) किमान ३ वर्षे अखंड सेवा केलेल्या योग्य व्यक्तींना पदोन्नती देऊन भरण्यात येईल)] किंवा |

¹ शासकीय अधिसूचना, दिनांक १६ ऑगस्ट १९७८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
² शासकीय अधिसूचना, दिनांक २९ जून १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
³ शासकीय अधिसूचना, दिनांक १ नोव्हेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट नऊ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपिक वर्गीय) तृतीय श्रेणी. | वरिष्ठ सहायक | [1][(१). नेमणूक एक तर—<br>(अ) [2][ज्यांनी महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) या अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्प्याच्या अखेरीस घेतलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले कनिष्ठ सहायक, भांडार सहायक, भांडारपाल किंवा संगणक या पदावर काम करणाऱ्या व संबंधित पदावर किमान तीन वर्षे अखंड सेवा पूर्ण केलेल्या योग्य उमेदवारांना पदोन्नती देऊन भरविण्यात येईल, किंवा<br>(ब) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये नियुक्त केलेल्या संबंधित आयुक्तांकडून शासनाने त्यासाठी विहित केल्याप्रमाणे घेण्यात येणाऱ्या मर्यादित स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारे कनिष्ठ सहाय्यक, भांडारपाल किंवा संगणक हे पद धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यामधून निवड करून करण्यात येईल.<br>[3][परंतु विभागीय आयुक्तांनी ही स्पर्धात्मक परीक्षा घेईपर्यंत निवडीने भरण्यासाठी असलेली पदे पदोन्नतीद्वारे भरण्यात येतील, किंवा)<br>(क) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षापेक्षा अधिक नसेल आणि |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २२ ऑगस्ट १९८५ अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ जुलै १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ जुलै १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट नऊ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (दोन) संविधिमान्य विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीने, निवडीने आणि नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकीचे गुणोत्तर ५० : २५ : २५ असे राहील]. |
| ४ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपिक वर्गीय) तृतीय श्रेणी. | [1][(एक) उच्च श्रेणी लघुलेखक] | (१) उच्च श्रेणी लघुलेखकांच्या पदावर करावयाची नेमणूक एकतर—<br>(अ) नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीसाठी खंड (ब), उपखंड (तीन) मध्ये विहित केलेल्या लघुलेखनातील व टंकलेखनातील गतीचे प्रमाणपत्र ज्याने धारण केलेले असेल (आणि लघुलेखक, कनिष्ठ श्रेणी या पदावर किमान ३ वर्षे अखंड सेवा केली आहे) अशा जिल्हा परिषद योग्य कनिष्ठ श्रेणी लघुलेखकास पदोन्नती देऊन करण्यात येईल.<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षापेक्षा अधिक नसेल;<br>(दोन) महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१) या अन्वये स्थापन केलेल्या विभागीय मंडळाने शिक्षणाच्या माध्यमिक टप्प्याच्या अखेर घेतलेली माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तिच्याशी तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील; आणि |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ जुलै १९८६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. या करारासंबंधात, अथवा यात अंतर्भूत असलेल्या किंवा याद्वारे निर्माण होणाऱ्या कोणत्याही एका अथवा अधिक उपबंधासंबंधात उभयपक्षी काही विवाद निर्माण झाल्यास त्याबाबतीत विभागीय आयुक्ताचा निर्णय अंतिम आणि प्रशिक्षार्थ्यावर बंधनकारक असेल.

याबाबत ........ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, साक्षीदाखल येथे सही केली आहे आणि जिल्हा परिषदेची सामान्य मुद्रा वठविली आहे आणि प्रशिक्षार्थ्यांनेही वर लिहिलेल्या तारखेस व वर्षी आपली सही केली आहे.

(मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची सही)

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ..........

श्री. ..........

(१) श्री. ..........

(२) श्री. ..........

यांच्या समक्ष सही करून ........ जिल्हा परिषदेची सामान्य मुद्रा लावून मोहोरबंद करून दिला.

परीक्षार्थीची सही.

.......... ने खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून दिला.

(१) ..........

(२) ..........

जिल्हा परिषदेची मुद्रा.



## परिशिष्ट नऊ

(नियम ५ पहा)

**जिल्हा सेवा वर्ग (तीन) (लिपिक वर्गीय) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम लिपिक वर्गीय) यात अंतर्भूत असलेल्या पदांवरील नेमणुकीकरिता उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम**

| अनुक्रमांक (१) | सेवा आणि संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा सेवा वर्ग तीन (लिपिक वर्गीय) **प्रथम श्रेणी.** | उप विभागीय अधिकारी | १. जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपिक वर्गीय) द्वितीय श्रेणीमधील कर्मचाऱ्यांस पदोन्नती देऊन नेमणूक केली जाईल.<br>२. ज्या कर्मचाऱ्यांची जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपिक वर्गीय) द्वितीय श्रेणी मध्ये तीन वर्षांहून कमी नसेल इतकी अखंड सेवा झालेली नसेल असा कोणताही कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरणार नाही.<br>परंतु, किमान तीन वर्षे सेवा झालेली योग्य व्यक्ती उपलब्ध नसेल आणि त्या पदावर त्वरित नेमणूक करणे आवश्यक आहे असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे मत असेल तर ही अट, अधीक्षकाच्या श्रेणीतील दोन वर्षाच्या अखंड सेवेइतकी कमी करण्यात येईल. |
| २ | **जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपिक-वर्गीय) द्वितीय श्रेणी.** | अधीक्षक | [1][जिल्हा सेवा (वर्ग तीन) (लिपिक वर्गीय), तृतीय श्रेणी यातील किमान तीन वर्षे अखंड सेवा केलेल्या योग्य वरिष्ठ सहायकांना पदोन्नती देऊन नेमणुका करण्यात येईल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १९ जुलै १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (ब) मागासवर्गाचे सदस्य व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांचे सदस्य यांच्यासाठी राखीव पदे ठेवून नियुक्ती झालेली असणे आवश्यक असेल.<br>(३) नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या उमेदवारांना शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले पाठ्यक्रम प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणे आवश्यक असेल. तसे न केल्यास सेवेतून मुक्त करण्यास ते पात्र ठरतील. सोबत जोडलेल्या नमुना "इ" मध्ये त्यांनी करारनामा करणे आवश्यक असेल. |

[1][ * * * * ]

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १७ फेब्रुवारी १९८४ अन्वये वगळण्यात आले.



## नमुना "इ"

[1][(परिशिष्ट आठ, नियम २ व ३ पहा)]

हा करारनामा दिनांक ........ एकोणीसशे ........ रोजी एका पक्षी जिल्हा परिषद जिचा (यापुढे यात 'जिल्हा परिषद' म्हणून उल्लेख केला आहे) आणि दुसऱ्या पक्षी रहिवासी श्री. ........ येथील रहिवासी ज्यांचा (यात यापुढे 'प्रशिक्षार्थी' म्हणून उल्लेख केला आहे) यांच्यात करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, प्रशिक्षार्थींची जिल्हा परिषदेकडून ........ येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये सहायक ग्रामसेवक यांच्या पाठ्यक्रमासाठी दरमहा ........ रुपये एकत्रित पाठ्यवेतन अधिक त्यास अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते इतक्या वेतनावर निवड झालेली आहे, आणि ज्याअर्थी प्रशिक्षार्थीने त्याची निवड झाल्यामुळे, यापुढे दिलेल्या अटींवर व शर्तींवर सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक म्हणून प्रशिक्षण पाठ्यक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण करण्याचे मान्य केले आहे.

म्हणून, आता, त्यांची निवड झालेली असल्यामुळे आणि त्यास वर निर्देशित केलेले एकत्रित पाठ्यवेतन, त्याचे वेतन आणि भत्ते एवढे वेतन द्यावयाचे असल्याने प्रशिक्षार्थी, याद्वारे पुढील गोष्टी मान्य करीत असून, हा करारनामा पुढील गोष्टींच्या साक्षीदाखल करण्यात येत आहे:—

(१) प्रशिक्षार्थी सहाय्यक, ग्रामसेवकाच्या/ग्रामसेवकाच्या/ग्रामविकास अधिकाऱ्याच्या उपरोक्त प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा याबाबतीत त्यांच्याकडून नामनिर्देशित करण्यात येईल असा अधिकारी यांचे समाधान होईल अशा रीतीने साक्षेपाने अभ्यासील, आणि उपरोक्त केंद्रातील प्रशिक्षार्थींच्या वर्तणुकीचे विनियमन करणाऱ्या, वेळोवेळी, अंमलात असलेल्या नियमांचे पालन करील व प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम पूर्ण करील व विहित परीक्षेस आणि चाचणीस बसेल.

(२) प्रशिक्षणार्थी त्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर आणि विहित परीक्षा आणि चाचण्या उत्तीर्ण झाल्यानंतर जिल्हापरिषदेत सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी म्हणून अथवा तुल्य पदावर किमान पाच वर्षे काम करील.

(३) वरील खंड (२) मधील उपबंधास अधीन राहून, प्रशिक्षार्थी आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे साक्षेपाने, कौशल्याने आणि समर्थपणे पार पाडील आणि जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीचे नियमन करणाऱ्या वेळोवेळी अंमलात असलेल्या, नियमांचे पालन करील.

(४) विहित परीक्षा आणि चाचण्या उत्तीर्ण होण्यापूर्वी, जिल्हा परिषदेची लेखी परवानगी घेतल्या वेरीज आजारपण धरून इतर कोणत्याही कारणामुळे प्रशिक्षार्थीने उपरोक्त प्रशिक्षण केंद्र सोडले असेल अथवा प्रशिक्षार्थीने उपरोक्त प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षार्थ्यांच्या वर्तणुकीचे नियमन करणाऱ्या, वेळोवेळी अस्तित्वात असलेल्या नियमांचे पालन न केल्यामुळे प्राचार्यांनी त्यास काढून टाकले असेल अथवा विहित परीक्षा व विहित चाचण्या विहित केलेल्या कालावधीत उत्तीर्ण होण्यास तो असमर्थ ठरला असेल अथवा प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर त्याने सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी म्हणून नोकरी करण्यास नकार दिला असेल अथवा सहायक ग्रामसेवक/ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी ही पदे स्वीकारल्यानंतर किमान पाच वर्षे नोकरी करण्यास त्याने नकार दिला असेल अथवा पाच वर्षांच्या कालावधीत त्याने राजिनामा दिला असेल अथवा त्यास बडतर्फ करण्यात आले असेल तर त्याने जिल्हा परिषदेस पाठ्यवेतनाखाली एकूण रक्कम आणि वेतन व भत्ते व प्रशिक्षणाच्या कालावधीतील प्रशिक्षण खर्च म्हणून शासनाने त्यास दिलेल्या एकूण पाठ्यवेतनाच्या ५० टक्के रक्कम परत केली पाहिजे आणि ती रक्कम त्यांच्याकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ ऑगस्ट १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) ग्रामविकास अधिकारी (कार्यकारी आणि ग्राम विस्तार) तृतीय श्रेणी. | .. | ¹[(१) नियुक्ती पुढीलपैकी कोणत्याही प्रकारे करण्यात येईल—<br>(अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कार्यकारी व ग्रामविस्तार) श्रेणी एकमध्ये असलेल्या व ज्यांनी त्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केली आहे अशा सुयोग्य ग्रामसेवकांना पदोन्नती देऊन]; किंवा<br>(ब) ज्यांनी ग्रामसेवकाच्या पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतका काळ अखंड सेवा केली असेल अशा व्यक्तींमधून संबंधित विभागीय आयुक्तांद्वारे घेण्यात येणाऱ्या व त्या प्रयोजनार्थ शासनाने विहित केलेल्या मर्यादित स्पर्धात्मक परीक्षेच्या आधारे निवड करून.<br>(२) पदोन्नतीद्वारे व निवडीद्वारे करावयाच्या नियुक्तीचे गुणोत्तर ७५:२५ असे असेल :<br>परंतु ग्रामसेवक व कृषि सहायक (समन्वित ग्रामसेवक) यांच्यामधून पदोन्नतीद्वारे करावयाच्या नियुक्तीचे गुणोत्तर ३:१ असे असेल.<br>(३) पदोन्नतीद्वारे किंवा निवडीद्वारे नियुक्त करण्यात आलेले उमेदवार शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल असे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करतील, याबाबतीत कसूर झाल्यास, अशी नियुक्ती होण्याच्या लगतपूर्वी त्यांनी जी पदे धारण केली असतील त्या पदांवर त्यांना पदावनत करण्यात येईल. यासोबत जोडलेल्या नमुना 'ई' मध्ये त्यांनी कराराची बंधपत्रे करून देणे आवश्यक असेल.] |

¹शासकिय अधिसूचना, दिनांक २६ ऑगस्ट १९९० अन्वये मूळ मजकूर ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिट आठ—चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम ग्रामसेवक कार्यकारी आणि ग्राम विस्तार) प्रथम श्रेणी. | .. | ¹[जे उमेदवार—<br>(१) (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तूल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका दोन वर्षांचा अभ्यासक्रम धारण करीत असतील अशा उमेदवारां-मधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. मात्र कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण करणाऱ्या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>(२) परिच्छेद (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळ (विचारविनिमयापासून सूट) नियम, १९७६ मधील खंड (एक) च्या उप खंड (एक) अन्वये जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहायक ग्रामसेवक पदावर दिनांक १५ नोव्हेंबर १९७६ पासून दिनांक ३१ ऑक्टोबर १९७८ पर्यंतच्या कालावधीत नियुक्त केलेल्या व्यक्तीचासुद्धा, ग्रामसेवक या पदावर नियुक्तीसाठी विचार केला जाईल :<br>परंतु—<br>(अ) त्या व्यक्तीची सहायक ग्रामसेवकाच्या पदावरील प्रथम नियुक्ती, त्यावेळी अंमलात असलेल्या सेवा प्रवेश नियमांतील तरतुदींनुसार झालेली असणे आणि |

¹शासकीय अधिसूचना, दिनांक १७ फेब्रुवारी १९८४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नमुना "ड"

(परिशिष्ट सात, नियम ३ पहा)

## जामीन खत

मी खाली सही करणार ............................ येथील रहिवासी ..........
...ल्हा परिषदेने (जिचा यात यापुढे "परिषद" असा उल्लेख करण्यात आला आहे.) कनिष्ठ ...लार अधिकारी (उद्योग ज्यांचा यात यापुढे कर्मचारी म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) ...ून नियुक्त केलेल्या श्री. .............................. यांच्याकरिता जामीन ...ल्याचे याद्वारे जाहीर करतो आणि हमी देतो की, परिषदेच्या नावे त्यांनी दिनांक ........ रोजी करून दिलेल्या बंधपत्रान्वये ज्या गोष्टी करण्याचे व पार पाडण्याचे त्यांनी पत्करले ... त्या सर्व गोष्टी ते करतील व पार पाडतील आणि कर्मचाऱ्यांकडून त्याबाबत कसूर झाल्यास ... याद्वारे, परिषदेला रुपये २,५०० (दोन हजार पाचशे) अथवा अशा प्रकारच्या कसुरीमुळे ...षदेची जी हानी किंवा नुकसान होईल ते भरून काढण्यास आवश्यक अशी त्याहून कमी रक्कम ...स स्वतःला, माझ्या वारसांना, मृत्युपत्र व्यवस्थापकांना व कारभाऱ्यांना बांधून घेत आहे. तसेच, ...पुढे असेही मान्य करतो की, परिषदेच्या इतर कोणत्याही अधिकारात किंवा उपाययोजनेस बाध ...ऊ देता, उक्त रक्कम माझ्याकडून मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ च्या उपबंधान्वये ...न महसुलाच्या थकबाकीप्रमाणे जिल्हा परिषदेला वसूल करता येईल. आणि मी पुढे असेही ... करतो की, उक्त बंधपत्राच्या अंमलबजावणीपासून परावृत्त होणे किंवा कर्मचाऱ्याला मान्य ...ले इतर कोणतेही विशेषाधिकार, किंवा उक्त बंधपत्राच्या अटीमधील किंवा, कर्मचाऱ्याला ...ली मुदत यामधील कोणतेही फरक किंवा विधीमध्ये ज्या अन्वये जामीनदार मुक्त होईल अशा ...त्याही शर्ती किंवा परिस्थितीमुळे उक्त रक्कम देण्याच्या दायित्वातून मला मुक्त होता येणार ... आणि या जामीन खताच्या अंमलबजावणीकरिता, या जामीनखतानुसार असलेले माझे ...व हे कर्मचाऱ्याच्या दायित्वाशी संयुक्त आणि पृथक असेल.

...नांक ............... १९ माहे ............... सन १९

...रिनामित जामीन श्री. ................................ यांनी खालील व्यक्तींच्या ... सही केली.

...) ..............................

...) ..............................

........................

कर्मचाऱ्याची सही.



**[परिशिष्ट आठ]**

(नियम ५ पहा)

**जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी व ग्राम विस्तार) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम) (कार्यकारी व ग्राम विस्तार) यामध्ये [समाविष्ट असणाऱ्या पदांवरील नेमणुकीकरिता उमेदवारांच्या अर्हता व नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम**

| अनुक्रमांक | सेवा व संवर्ग | पद | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी आणि ग्राम विस्तार) द्वितीय श्रेणी. | विस्तार अधिकारी (पंचायत आणि समाजकल्याण). | *(१) नियुक्ती ही पुढीलपैकी कोणत्याही एका प्रकारे करण्यात येईल—<br>(अ) जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) (कार्यकारी व ग्रामविस्तार), श्रेणी तीनमध्ये असलेल्या व ज्यांना त्या पदावर किमान तीन वर्षे अखंड सेवा केली आहे अशा ग्रामविकास अधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन, किंवा<br>(ब) (एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसलेले जे उमेदवार २८ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील; आणि<br>(दोन) जे उमेदवार विधिद्वारे संस्थापित विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे :<br>परंतु, ग्रामीण समाजकल्याण व स्थानिक विकास कार्यक्रमांचा तीन वर्षांचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>(२) पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीचे गुणोत्तर ७५ : २५ असे असेल.] |

* शासकीय अधिसूचना, दिनांक २७ नोव्हेंबर, १९७८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* शासकीय अनिसूचना दिनांक १६ ऑगस्ट १९९० अन्वये मूळ मजकुरारोवाजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नमुना " क "

(परिशिष्ट सात, नियम ३ पहा)

**बंधपत्र**

या अधिलेखाद्वारे सर्व लोकांस ज्ञात व्हावे की, .......... येथील मी, ............ (ज्याचा यात यापुढे "कर्मचारी" असा उल्लेख करण्यात आला आहे) ............ जिल्हा परिषदेत (जिचा यात यापुढे "परिषद" असा उल्लेख करण्यात आला आहे) द्यावयाच्या दोन हजार पाचशे रुपयांची (२,५०० रुपये) रक्कम देण्यास बद्ध झालो/ला आहे व दृढतापूर्वक बांधला/ली गेला/ली आहे व ती रक्कम बरोबर व रास्तपणे देण्यास मी या अधिलेखाद्वारे मला स्वतःला, माझ्या वारसांना, मृत्युपत्र व्यवस्थापकांना, कारभाऱ्यांना व वैध प्रतिनिधींना याद्वारे बांधून घेत आहे. ............ १९.... रोजी यावर सही केली.

ज्याअर्थी, सदर कर्मचाऱ्यांची तो, इतर गोष्टींबरोबरच, रविंद्रनगर, हैदराबाद (आंध्र प्रदेश), किंवा निलोखरी (पंजाब) येथील इंटिग्रेटेड ट्रेनिंग सेंटर फॉर एक्स्टेंशन ऑफिसर्स (इंडस्ट्रीज) येथे एक वर्षाच्या मुदतीसाठी प्रशिक्षण घेईल या अटींवर व शर्तीवर कनिष्ठ विस्तार अधिकारी (उद्योग) म्हणून निवड करण्यात आली असून त्या मुदतीकरिता परिषदेने त्याला वेतन व भत्ते यांचा अंतर्भाव असलेली वित्तलब्धी देण्याचे मान्य केले आहे. आणखी असे की असे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर कर्मचारी परिषदेची तीन वर्षांच्या मुदतीकरिता .......... म्हणून सेवा करील आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक ते बंधपत्र करून देईल.

आणि ज्याअर्थी, कर्मचाऱ्याने उक्त नियुक्ती स्वीकारली आहे आणि तीन वर्षाच्या मुदतीकरिता परिषदेची सेवा करण्याचे मान्य केले आहे, त्याअर्थी, आता पुढील गोष्टी केल्यास हे बंधपत्र निरर्थक होईल अन्यथा ते पूर्णपणे अंमलात राहील :—

(१) कर्मचारी उक्त प्रशिक्षण मन लावून चालू करील आणि पूर्ण करील आणि उक्त प्रशिक्षणाच्या पाठ्यक्रमाकरिता वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा नियमांचे निष्ठापूर्वक पालन करील आणि प्रशिक्षण घेताना चांगली वर्तणूक ठेवील आणि प्रशिक्षणांच्या पाठ्यक्रमाला नियमितपणे उपस्थित राहील, आणि ज्यांच्या देखरेखीखाली तो प्रशिक्षण घेत असेल त्या विभागीय अधिकाऱ्यांच्या मते संपूर्णपणे समाधानकारक असेल अशी प्रगती करील, आणि

(२) कर्मचारी त्याच्या स्वतःच्या इच्छेनुसार प्रशिक्षण पूर्ण होण्यापूर्वी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय उक्त प्रशिक्षण बंद करणार नाही आणि गैरवर्तणूक, किंवा प्रशिक्षणाला उपस्थित राहण्यात हयगय किंवा चुकारपणा, आळशीपणा किंवा गैरशिस्त यासाठी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून त्याला मुक्त करण्यात, काढून टाकण्यात किंवा बडतर्फ करण्यात आलेले नसेल, आणि

(३) कर्मचाऱ्याने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर, परिषदेने तसे सांगितल्यास ........ जिल्ह्याच्या कोणत्याही भागात पदांसाठी निश्चित केलेल्या वेतनश्रेणीवर किमान ३ वर्षांच्या मुदतीसाठी तो कनिष्ठ विस्तार अधिकारी म्हणून काम करील.

याद्वारे असा करार करण्यात येत आहे की, कर्मचाऱ्याने, उपरोक्त अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटीचे किंवा शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त दोन हजार पाचशे रुपयांची (२,५०० रूपये फक्त) संपूर्ण रक्कम किंवा कर्मचाऱ्याला वेळोवेळी त्यांच्या प्रशिक्षणावर वेतन व भत्ते मिळून असलेली



वित्तलब्धी म्हणून त्यास देण्यात आलेली, त्यापेक्षा कमी असेल अशी रक्कम व ........ कडून ठरविण्यात येईल एवढी रक्कम, कर्मचाऱ्याकडून तावडतोब देय होईल व वरील निर्णय अंतिम असेल व कर्मचाऱ्यावर बंधनकारक असेल आणखी असे की, अशा रीतीने कर्मचाऱ्यांने द्यावयाची रक्कम परिषदेचे कोणतेही इतर अधिकार व उपाययोजना यांना बाध न आणता जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

या गोष्टीची साक्ष म्हणून उपरिनामित कर्मचाऱ्यांने वर लिहिलेल्या दिवशी व वर्षी सही केली आहे.

उपरिनामित कर्मचाऱ्याने खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून स्वाधीन केले आहे.

(१) ..........................................

(२) ..........................................

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (२) २५ टक्क्यापेक्षा अधिक नसतील इतकी पदे पदोन्नतीने भरण्यात येतील.<br><br>(३) नामनिर्देशनाद्वारे किंवा पदोन्नतीने नेमण्यात आलेल्या व्यक्तींना शासनाने वेळोवेळी आखून दिलेले उद्योगाचे प्रशिक्षण यशस्वीपणे पार पाडावे लागेल, त्यामध्ये अनुत्तीर्ण झाल्यास त्याची सेवा समापित केली जाण्यास पात्र असेल किंवा पदोन्नत व्यक्तींच्या बाबतीत ते निम्म पदावर प्रत्यावर्तीत केले जाण्यास पात्र होतील. त्यांना " क " आणि " ड " या नमुन्यात विहित केलेला करारनामाही करून द्यावा लागेल. |
| ४ | जिल्हा सेवा वर्ग (तीन) उद्योग) प्रथम श्रेणी. | दुय्यम (एक) उद्योग सहाय्यक<br>(दोन) उद्योग निर्देशक. | १. (अ) जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम उद्योग), द्वितीय श्रेणीतील पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेल्या व्यक्तींची त्या श्रेणीमध्ये पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल.<br><br>किंवा<br><br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल, आणि |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (दोन) (अ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा इतर कोणतीही तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील आणि ज्यांना कार्यशाळा किंवा औद्योगिक संस्थेतील किंवा विशेष व्यवसायातील एक वर्षापेक्षा कमी नसेल इतका प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. परंतु, संबंधित व्यवसायातील, राज्य शासनाने मान्यता दिलेली पदविका धारण करणाऱ्यांना अधिक पसंती देण्यात येईल.<br><br>किंवा<br><br>जे उमेदवार—<br>(ब) प्राथमिक शाळा प्रमाणपत्र किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि ज्यांनी कोणत्याही उद्योगातील विशेष प्रशिक्षण घेतले असेल आणि ज्यांना मान्यता देण्यात येईल अशा कार्यशाळा किंवा औद्योगिक संस्था किंवा विशेष व्यवसायातील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल.<br>२. २५ टक्क्यापेक्षा अधिक नसतील इतकी पदे पदोन्नतीने भरण्यात येतील. |
| ५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) उद्योग) द्वितीय श्रेणी. | (दुय्यम (एक) कनिष्ठ उद्योग सहाय्यक<br>(दोन) कनिष्ठ उद्योग निदेशक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि<br>(तीन) ज्यांना कार्यशाळेतील किंवा औद्योगिक संस्थेतील सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल इतका प्रत्यक्ष अनुभव असेल किंवा जे राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संबंधित व्यवसायातील पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले असतील अशा योग्य उमेदवारांमधून नेमणूक करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## परिशिष्ट सात

(नियम ५ पहा)

**जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (उद्योग) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम उद्योग) यामध्ये समाविष्ट असणाऱ्या पदांवरील नेमणुकोसाठी उमेदवारांची अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम**

| अनुक्रमांक (१) | सेवा व सवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती (४) |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (उद्योग) प्रथम श्रेणी. | (एक) वरिष्ट विस्तार अधिकारी (उद्योग) (दोन) वरिष्ठ उद्योग पर्यवेक्षक. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (उद्योग) द्वितीय श्रेणीमध्ये ज्यांनी तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल, अशा व्यक्तींची त्यामधून पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल. |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (उद्योग) द्वितीय श्रेणी. | (एक) विस्तार अधिकारी (उद्योग) (दोन) वरिष्ठ उद्योग निरीक्षक (तीन) उद्योग पर्यवेक्षक. | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (उद्योग) तृतीय श्रेणीमध्ये ज्यांनी तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा व्यक्तींची त्यामधून प्रदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल. |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (उद्योग) तृतीय श्रेणी. | (एक) कनिष्ठ विस्तार अधिकारी (उद्योग) (दोन) कनिष्ठ उद्योग पर्यवेक्षक (तीन) वरिष्ठ उद्योग निर्देशक, | (१) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि ज्यांनी जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम उद्योग) प्रथम श्रेणी यामधील किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कार्यकारी) आणि ग्राम विस्तार प्रथम श्रेणी यामधील पाच वर्षापेक्षा कमी नसेल अशी अखंड सेवा केली असेल अशा जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम उद्योग) प्रथम श्रेणीमधील व्यक्तींची [१][किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम कार्यकारी व ग्राम विस्तार) प्रथम श्रेणी यामधील ग्रामसेवकांची] त्यामधून पदोन्नती करून नेमणूक करण्यात येईल.<br>किंवा<br>(एक) जे उमेदवार आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसतील ज्यांचे वय [२][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल अपवादात्मक अर्हता किंवा अनुभव असणाऱ्यांच्या बाबतीत वयोमर्यादा तीस वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल आणि |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ जानेवारी १९७२ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (दोन) (अ) कातडी कमावणे, लेदर टेक्स्टाईल, सेरमिक्सची रंगाई व छपाई काथ्या तंतु आणि ग्रामोद्योग यांचा अंतर्भाव असलेली अभियांत्रिकी मधील मान्यता प्राप्त पदविका किंवा ग्रामोद्योग किंवा लघुद्योग यातील हरल इन्स्टिटयूटची पदविका धारण करीत असतील.<br>किंवा<br>(ब) रासायनिक अभियांत्रिकी या विषयातील बी.एस.सी. ची मान्यता प्राप्त पदवी किंवा रासायनिक उद्योग या विषयातील पदविका धारण करीत असतील.<br>किंवा<br>(क) विज्ञान, अर्थशास्त्र गणित सांख्यिकी किंवा वाणिज्य या विषयातील मान्यता प्राप्त पदवी धारण करीत असतील.<br>किंवा<br>(ड) मान्यताप्राप्त विद्यापीठाचे मूलोद्योग शिक्षणाचे प्रशिक्षण घेतलेले वाङमय स्नातकांखेरीज इतर स्नातक असतील.<br>किंवा<br>(इ) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि ज्यांनी संबंधित व्यवसायातील किंवा उद्योगातील विशेष प्रशिक्षण घेतलेले असेल व शासनाकडून मान्यता दिली जाईल त्याप्रमाणे कारखान्यांमध्ये कर्मशाळांमध्ये किंवा विशेष व्यवसायात ज्यांनी तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीचा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारां-मधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (तीन) कर्षित्र चालविण्याची अनुज्ञप्ति धारण करीत असतील, आणि<br>(चार) कर्षित्र यंत्ररचेनेसंबंधात परिपूर्ण अशा उमेदवारांमधून नामनिर्देशना-द्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | [1][ (बारा) ] वाहन चालक | [2][ १] नेमणूक एक तर—<br>(अ) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून पदावर नियुक्तीसाठी प्रसिद्ध केल्याच्या तारखेस ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) कमीत कमी ४ थी इयत्ता उत्तीर्ण झालेले असतील;<br>(तीन) मोटार वाहने चालविण्याची अनुज्ञप्ति धारण करीत असतील, आणि<br>(चार) मोटार यंत्ररचनेचे परिपूर्ण ज्ञान असेल.<br>किंवा<br>(ब) [3][संबंधित सवर्गात तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल आणि] वरील उपखंड (दोन) (तीन) आणि (चार) मध्ये विहित केलेली अर्हता धारण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग चार) मधील योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन नेमणूका करण्यात येतील.<br>२. नामनिर्देशन व पदोन्नतीद्वारे करावयाच्या नेमणुकांचे गुणोत्तर १:३ असे राहील.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २८ मे १९७१ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १ डिसेंबर १९७८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

परिशिष्ट सहा—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ५ | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम अभियांत्रिकी) द्वितीय श्रेणी. | (एक) मिस्त्री (द्वितीय श्रेणी) .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा ७ वी इयत्ता उत्तीर्ण झालेले अहतील परंतु, मिस्त्री म्हणून पुरेसा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत उपरोक्त अर्हता शिथिल करता येईल.<br>(तीन) ज्यांना इमारतीचे बांधकाम, रस्त्याचे काम इत्यादीचे बऱ्यापैकी तांत्रिक ज्ञान असेल आणि साधे सोपे हिसेब ज्यांना करता येतील असे उमेदवार, आणि<br>(चार) कामावरील मजुरांवर नियंत्रण ठेवू शकतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | (दोन) जोडारी .. | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल, आणि<br>(दोन) चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले असतील,<br>(तीन) ज्यांना जोडाऱ्याच्या कामाचा किमान दोन वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असेल, शासकीय तंत्र शाळेतून विहित केलेला जोडाऱ्याचा पाठ्यक्रम किंवा तुल्य पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशना द्वारे नेमणूक करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | (आठ) कनिष्ठ यांत्रिकी (ग्रामीण ध्वनिक्षेपण). | जे उमेदवार—<br>(अ) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(ब) मान्यताप्राप्त शाळेतून किंवा संस्थेतून किमान दहावी इयत्ता (माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेच्या पूर्वीची इयत्ता) उत्तीर्ण झाले असतील, आणि<br>(क) रेडिओ संधारण या विषयामधील क्षमता प्रमाणपत्र धारण करून असतील किंवा ज्यांना मान्यवर अभियांत्रिकी आस्थापनेतील किंवा शासकीय किंवा सार्वजनिक संस्थेतील रेडिओ दुरुस्ती आणि रेडिओ संच मांडणी करणे यातील किमान ३ वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. याबाबतीत ट्रान्सफार्मर वाईंडिंग, पब्लिक, अॅड्रेस इक्विपमेंटची संचमांडणी आणि बॅटरी चार्जिंग इत्यादीचा अनुभव असणाऱ्यांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| | | (नऊ) तारतंत्री | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [१][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) महाराष्ट्र शासनाच्या अनुज्ञापन मंडळाने दिलेले तारतंत्रीचे दुसऱ्या वर्गाचे प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील अशा उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**परिशिष्ट सहा—चालू**

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | (दहा) रस्ता रुळचालक | [१][१. नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल :—<br>(अ) खालील खंड (ब) मधील उप-खंड (दोन), (तीन) आणि (चार) मध्ये विहित केलेली अर्हता धारण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग-चार) मधील योग्य व्यक्तीला पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल, किंवा—<br>(ब) पुढील उमेदवारांपैकी एकेच उमेदवाराचे नामनिर्देशन करण्यात येईल :—<br>(एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून असल्याखेरीज करून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे उमेदवार,<br>(दोन) जे चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले असतील,<br>(तीन) अवजड मोटार वाहन चालविण्याची अनुज्ञप्ति धारण करीत असतील, आणि<br>(चार) ज्यांना जीप गाडी व रस्ता रुळ चालविण्याचा अनुभव असेल आणि यंत्रे दुरुस्तीचे बऱ्यापैकी ज्ञान असेल :<br>परंतु, ज्या ठिकाणी नियुक्तीनंतर उमेदवाराला वाष्प (स्टीम) रस्ता रुळ चालविणे आवश्यक करण्यात येईल त्या ठिकाणी दुसऱ्या वर्गाचे बाष्पक परिचर प्रमाणपत्र धारण करीत असल्याशिवाय तो अशा नियुक्तीस पात्र असणार नाही.<br>२. पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण १ : ३ राहील.] |
| | | (अकरा) कंपित्र चालक | जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले असतील, |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २१ डिसेंबर १९९० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (तीन) महाराष्ट्र शासनाची चित्रकलेची इंटरमिजिएट ग्रेड किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| | | | (२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे गुणोत्तर १ : १ असे राहील. |
| | | | [1][* * * * *] |
| | | (सहा) कनिष्ठ यांत्रिक .. | [2][(एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून नसल्यास ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे उमेदवार, |
| | | | (दोन) ज्यांनी तांत्रिक शिक्षण विभागाच्या यांत्रिकी विषयातील अल्पमुदतीचा पाठ्यक्रम पूर्ण केला असेल किंवा जे समतुल्य अर्हता धारण करीत असतील, असे उमेदवार, आणि |
| | | | (तीन) रूळ मार्ग किंवा वाफेचे व तेलाचे रोड रोलर किंवा तत्सम गोष्टींच्या दुरुस्तीचा ज्यांना कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असेल असे उमेदवार,—यामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल,] |
| | | | (दोन) ज्यांनी तांत्रिक शिक्षण विभागाचा यांत्रिकी विषयातील अल्प मुदतीचा पाठ्यक्रम पूर्ण केला असेल किंवा जे तुल्य अर्हता धारण करीत असतील, आणि |
| | | | (तीन) रूळ मार्ग किंवा वाफेवर किंवा तेलावर चालणारे (रोड रोलर) दुरुस्त करणे इत्यादींचा कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ ऑगस्ट १९७८ अन्वये गाळण्यात आले.

[2] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (२) ७५ टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतकी पदे नामनिर्देशनाद्वारे भरण्यात येतील. |
| | | (सात) कनिष्ठ यांत्रिकी (प्रभारी दृक श्रुती सहाय्य सामग्री) | (१) (एक) जे उमेदवार आधीपासूनच जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक नसेल. |
| | | | (दोन) ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेपर्यंत किंवा तुल्य शिक्षण घेतले असेल. |
| | | | (तीन) ज्यांना ३५ मिलीमीटरचा चित्रदर्शक वापरण्याची आणि १६ मिलीमीटरचे चित्रपट प्रदर्शित करण्याची साधने हाताळण्याचा कमीत कमी दोन वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव असेल, आणि |
| | | | (चार) ३५ मिलीमीटरचा चित्रदर्शक वापरण्याच्या आणि १६ मिलीमीटरचे चित्रपट प्रदर्शित करण्याची साधने हाताळण्याच्या प्रात्यक्षिकाच्या चाचणीत यशस्वी झालेले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. परंतु माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले आणि/किंवा दृक-चित्रसहाय्य तंत्र यामधील मान्यताप्राप्त प्रमाणपत्र किंवा पदविका धारण करणारे उमेदवार यांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| | | | (२) निवडलेल्या उमेदवारांची दोन वर्षांच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन नियुक्त करण्यात येईल. त्या कालावधीत त्यांना प्रशिक्षण घ्यावे लागेल व विहित चाचणी उत्तीर्ण व्हावी लागेल. ह्या चाचणीत अनुत्तीर्ण झाल्यास ते सेवा मुक्त केले जाण्यास पात्र असतील. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे [वय [२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील.<br>(तीन) ज्यांना इमारतीची बांधकामे, रस्त्याची कामे आणि तशीच इतर कामे तांत्रिक या बाबत आपले ज्ञान असेल आणि<br>(चार) कामावर लावलेल्या मजुरांवर नियंत्रण ठेवू शकतील, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु, महाराष्ट्र शासनाच्या तंत्र शाळेतून यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देता येईल.<br>(२) नामनिर्देशनाने व पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकांचे प्रमाण १ : १ असेल.] |
| | | (तीन) [कनिष्ठ आरेखक | (१) (अ) [अनुरेखक पदावर किमान तीन वर्षे अखंड सेवा केलेले योग्य अनुरेखकांमधून एक तर पदोन्नतीने नेमणूक करण्यात येईल].<br>किंवा |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ ऑक्टोबर १९९० अन्वये हा मजकर समाविष्ट करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४—चालू | | | (ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील आणि<br>(तीन) ज्यांनी शासनाने मान्यता दिलेला स्थापत्य आरेखकांचा पाठ्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे गुणोत्तर ३:१ असे राहील.] |
| | | (चार) अनुरेखक | [(१) (अ) ज्यांनी जिल्हा सेवा (वर्गवार) प्रथम श्रेणीतील परिचर या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल एवढी अखंड सेवा पूर्ण केली असेल आणि जे खंड (ब) उपखंड (दोन) (तीन) यामध्ये नमूद केलेली अर्हता धारण करीत असतील अशा योग्य उमेदवारांना एक तर पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल<br>किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसतील व ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल,<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि |

[१] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ ऑक्टोबर १९९० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[३] शासकीय अधिसूचना, दिनांक २३ सप्टेंबर १९८१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३—चालू | | | (दोन) मान्यताप्राप्त संस्थेची वार्षिक परिचर परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झालेले किंवा तुल्य पाठ्यक्रम उत्तीर्ण झालेले असतील आणि<br>(तीन) ज्यांना निरनिराळ्या प्रकारच्या यंत्रसामग्री कार्यशाळा इत्यादींचा ५ वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असलेले अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[1][(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ३ : १ असेल] |
| | | (पाच) वीजतंत्री | [ * * * * ]<br>[2][१] (अ) योग्य तारतंत्रीची एकतर पदोन्नतीद्वारे नेमणूक करण्यात येईल, किंवा<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [3][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) महाराष्ट्र शासनाच्या अनुज्ञापक मंडळाने दिलेले क्षमता प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारणा करीत असतील आणि<br>(तीन) ज्यांनी विद्युत तारांचे काम करणाऱ्या मान्यवर संस्थेत तारतंत्री म्हणून ५ वर्षे काम केले असेल.<br>अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[4][(२) पदोन्नतीने नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ३ : १ असेल] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १५ नोव्हेंबर १९८५ अन्वये गाळण्यात आले.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3], [4] शासकीय अधिनियम, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ४. | जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम अभियांत्रिकी) प्रथम श्रेणी | [1][(एक) कनिष्ठ अभियंता यांचा सहाय्यक.] | (अ) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [2][२८] वर्षांपेक्षा अधिक नसेल.<br>(दोन) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि<br>(तीन) राज्य शासनाने मान्यता दिलेला विस्तार अधिकारी (बांधकाम) यांच्या सहाय्यकाच्या पदावर नियुक्ती करण्यासाठीचा पाठ्यक्रम किंवा इतर कोणताही तुल्य पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे<br>किंवा<br>(चार) शासन निर्णय, पाटबंधारे व वीज विभाग, क्रमांक सोडीएस. १२५८/४५६२-इ-(२), दिनांक १९ डिसेंबर १९६३ अन्वये दुय्यम अवेक्षकांच्या तंत्र सहाय्यकासाठी विहित केलेली अर्हता परीक्षा किंवा इतर कोणतीही तुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या [3][* * * *] व्यक्तींची बदली करून नेमणूक करण्यात येईल. |
| | | (दोन) मिस्त्री (प्रथम श्रेणी) | [4][(१) (अ) [5][ज्यांनी मिस्त्री द्वितीय श्रेणी पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा] मिस्त्री (द्वितीय श्रेणी) मधील योग्य व्यक्तींना एकतर पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल. |

[1] शासन अधिसूचना, दिनांक २९ जुलै १९८१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासन अधिसूचना, दिनांक १५ ऑक्टोबर १९८६ अन्वये गाळण्यात आले.
[4] शासकीय अधिसूचना दिनांक ११ नोव्हेंबर १९७१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[5] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (आरोग्य) श्रेणी दोन. | आरोग्य सहाय्यक | .. जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) श्रेणी तीनमधील ज्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी—<br>(१) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल, आणि<br>(२) ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा पाठ्यक्रम अथवा स्वच्छता निरीक्षकाचा पाठ्यक्रम वा तुल्य पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केलेला असेल अशा आरोग्य कर्मचाऱ्यांमधून पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल :<br>परंतु ज्या आरोग्य कर्मचाऱ्यांनी मान्यताप्राप्त आरोग्य निरीक्षकांचा पाठ्यक्रम वा तुल्य असा पाठ्यक्रम पूर्ण केलेला नाही, त्यांनी सेवेत असताना त्या बाबतीत विहित करण्यात येईल असे पदोन्नती संबंधीचे प्रशिक्षण यशस्वी रीत्या पूर्ण केल्यानंतरच त्यांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात येईल. |
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग ३) (आरोग्य) श्रेणी तीन. | आरोग्य कर्मचारी | .. जे उमेदवार—<br>(१) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षांपेक्षा जास्त नसेल,<br>(२) ज्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र व सामान्य विज्ञान हे विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असेल, आणि<br>(३) ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्यांचा मूलभूत पाठ्यक्रम यशस्वी रीत्या पूर्ण केलेला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |

(नियम ५ पहा)

जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (अभियांत्रिकी) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम अभियांत्रिकी) यामध्ये समाविष्ट असणाऱ्या पदांवर) करावयाच्या नेमणुकीकरिता उमेदवारांची अर्हता आणि नेमणुकीच्या पद्धती नमूद करणारे नियम

| अनुक्रमांक (१) | सेवा व संवर्ग (२) | पद (३) | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती (४) |
|---|---|---|---|
| [1][१ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (अभियांत्रिकी) प्रथम श्रेणी.<br>[2][ * * * ] | मुख्य आरखक<br>(एक) कनिष्ठ अभियंता | [1][ (१)क] नेमणूक एक तर :—<br>जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) (अभियांत्रिकी) श्रेणी -दोनमधील, ज्यांनी तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा योग्य आरेखांमधून पदोन्नती देऊन नेमणूक करण्यात येईल.) |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (अभियांत्रिकी), द्वितीय श्रेणी. | [1][एक] कनिष्ठ अभियंता | [1][ (१) नेमणूक एक तर :—<br>[3][ (अ) ज्यांनी [4][ (जिल्हा तांत्रिक सेवा वर्ग तीन) (अभियांत्रिकी) द्वितीय श्रेणी या श्रेणीत ३ वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केलेले] आणि अवेक्षकांसाठी राज्य शासनाने निहीत केलेली व्यवसायिक |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १० डिसेंबर १९७९ अन्वये गाळण्यात आले.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक १० डिसेंबर १९७९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[4] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | परीक्षा उत्तीर्ण असेल अशा कनिष्ठ अभियंत्याचे सहाय्यक आणि मिस्त्री प्रथम श्रेणी यातील योग्य व्यक्तींना पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा;<br><br>[2][आणि "मिस्त्री प्रथम श्रेणी यातील योग्य व्यक्तींना पदोन्नती देऊन करण्यात येईल, मात्र, राज्य शासनाने विहित केलेली अवेक्षकासाठी असलेली व्यावसायिक परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केलेली असली पाहिजे, किंवा]<br><br>(ब) जे उमेदवार<br><br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [1][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल आणि.<br><br>(दोन) स्थापत्य अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकी यथास्थिती या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षांचा पाठक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करून असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br><br>(२) पदोन्नतीने आणि नामनिर्देशनाने करावयाच्या नेमणुकांचे प्रमाण १ : १ असे राहील. परंतु शासन निर्णय, ग्रामविकास विभाग, क्रमांक एपीटी-१०७४/सीएन-३०४/चार, दिनांक २७ एप्रिल १९७६ मधील आदेशांच्या अनुषंगाने |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक २५ ऑक्टोबर १९८६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात यावा.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | | जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विस्तार अधिकारी (बांधकामे) या पदांवर केलेल्या तात्पुरत्या नेमणुकांवरील परिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार नियमित करण्यात येतील आणि त्या नामनिर्देशनाने व पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकांचे गुणोत्तर ३:१ असे राहील.] |
| | (तीन) आरेखक | | [1][(१) नेमणूक पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने करण्यात येईल:—<br>(अ) जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (दुय्यम) अभियांत्रिकी श्रेणी एकमधील ज्यांनी तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा योग्य कनिष्ठ आरेखकामधून पदोन्नती देऊन करण्यात येईल, किंवा<br>(ब) पुढील उमेदवारांपैकी एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन करून करण्यात येईल—<br>(एक) जिल्हा परिषदेच्या सेवेत आधीपासून नसल्यास, ज्याचे वय २८ वर्षांपेक्षा अधिक नसेल असे उमेदवार, आणि<br>(दोन) स्थापत्य, यंत्र, विद्युत, अभियांत्रिकी यांतील दोन वर्षांची पदविका किंवा समतुल्य अर्हता धारण करणारे उमेदवार;<br>(२) पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ३ : १ असेल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १८ एप्रिल १९९१ चे अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २—चालू | | (चार) वीज पर्यवेक्षक | (१) (अ) [1][ज्यांनी विजतंत्री पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा] योग्य वीज तंत्रीमधून एकतर पदोन्नतीद्वारे नेदणूक करण्यात येईल.<br>(ब) जे उमेवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय [2][२८] वर्षापेक्षा अधिक नसेल आणि<br>(दोन) राज्य शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेची विद्युत अभियांत्रिकी-मधील पदवी किंवा पदविका (तीन वर्षांची) धारण करील अशा उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>[3][२. पदोन्नतीने व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नेमणुकीचे प्रमाण ३ :१ असेल.] |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक २९ सप्टेंबर १९८३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[3] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.



| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ३ जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) (अभियांत्रिकी) तृतीय श्रेणी | [1][ * * * * ]<br>[2][ * * * * ] | | [3][ * * * * ]<br>[4][ * * * ]<br>[5][ * * * ]<br>[6][ * * * * ]<br>[7][ * * * * * * ]<br>[8][ * * * * ]<br>[9][ * * * * ] |
| | | (चार) वरिष्ठ यांत्रिक | [10][(क) ज्यांनी संबंधित पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा केली असेल अशा योग्य कनिष्ठ यांत्रीक व जोडारी यांच्या मधून पदोन्नती देवून करण्यात येईल किंवा.<br>(ब) जे उमेदवार—<br>(एक) आधीपासून जिल्हा परिषदेच्या सेवेत नसून ज्यांचे वय २८ वर्षापेक्षा अधिक नसेल. |

[1] शासकीय अधिसूचना, दिनांक १० डिसेंबर १९७९ अन्वये गाळण्यात आला.
[2] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ फेब्रुवारी १९८१ अन्वये गाळण्यात आला.
[3] शासकीय अधिनियम, दिनांक १६ फेब्रुवारी १९८१ अन्वये गाळण्यात आला.
[4] शासकीय अधिसूचना, दिनांक १६ फेब्रुवारी १९८१ अन्वये गाळण्यात आले.
[5] शासकीय अधिसूचना, दिनांक १० ऑक्टोबर १९७९ अन्वये गाळण्यात आला.
[6] शासकीय अधिसूचना, दिनांक १० डिसेंबर १९७९ अन्वये गाळण्यात आला.
[7] शासकीय अधिसूचना, दिनांक १० डिसेंबर १९८१ अन्वये गाळण्यात आला.
[8] शासकीय अधिसूचना, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये गाळण्यात आला.
[9] शासकीय अधिनियम, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये गाळण्यात आला.
[10] शासकीय अधीनियम, दिनांक ८ एप्रिल १९९१ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(सोबत शासकीय अधिसूचना ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक सेप्रनि-२०११/प्र.क्र.२९८/आस्था-९, दिनांक ११ जानेवारी,२०१२, महाराष्ट्र जिल्हा परिषदा पंचायत समित्या अधिनियम, १९६१ ची प्रत.)

क्र. सेप्रनि-२०११/प्र.क्र.२९८/आस्था-९
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः- १८ फेब्रुवारी,२०१२.

प्रत माहितीसाठी अग्रेषित-

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
४) मा. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव
५) मा. सर्व राज्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक
६) सर्व विभागीय आयुक्त, (५ प्रती)
७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,(१० प्रती)
८) सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुख
९) सर्व मंत्रालयीन विभाग
१०) ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने

२. सोबतची इंग्रजी व मराठी अधिसूचना शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०२१८०५२७५७२५७००१ अन्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

(दत्तात्रय बो-हाडे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th January 2012

*NOTIFICATION*

MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

No. SEPRANI.2011/C.R.-298/2011/Astha-9.—Whereas, the Government of Maharashtra has decided to redesignate the post of Sectional Officer under the District Service Class-III (Clerical Grade-I) as Assistant Administration Officer and also to redesignate the post of Superintendent under the District Service Class-II. (Clerical Grade-I) as Junior Administration Officer ;

And whereas, as it is expedient to amend the Maharashtra Zilla Parishad District Services (Recruitment) Rules, 1967 for the aforesaid purpose. Now therefore in exercise of the powers conferred by clause (XXXIX) of sub-section (2) of section 274 of the Maharashtra Zilla Parishad and Panchayat Samiti Act, 1961 (Mah. V of 1962) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules, further to amend the Maharashtra Zilla Parishad District Services (Recruitment) Rules, 1967 the same having been previously published as required by sub-section (3) of section 274.—

1. These rules may b called the Maharashtra Zilla Parishad District Services (Recruitment) Rules. 2012.

2. In Appendix-IX appended to the Maharashtra Zilla Parashad District Services (Recruitment) Rules. 1967.

(a) against entry 1 relating to District Services (Class-III) (Clerical) in column (3) for the words "Sectional Officer" the words "Assistant Administration Officer" shall be substituted.

---

(b) in entry 2 relating to District Services (Class-III) (Clerical) in column (3) for the words "Superintendent" the words "Junior Administration Officer" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DATTATRAYA BORHADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.
EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार - ब

वर्ष ३, अंक ११४(२)] बुधवार, जानेवारी १८, २०१२/पौष २८, शके १९३३ [पृष्ठे ४
किंमत : रुपये ०९.००

असाधारण क्रमांक १३

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जानेवारी २०१२

अधिसूचना

महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१.

क्रमांक संप्रनि. २०११/प्र.क्र. २३८/आस्था. ९.- ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने जिल्हा सेवा वर्ग-तीन (लिपिकवर्गीय श्रेणी एक) मधील "उप विभागीय अधिकारी" हे पद "सहाय्यक प्रशासन अधिकारी" म्हणून पदनाम बदल करण्याबाबत निर्णय घेतला आहे. आणि जिल्हा सेवा वर्ग-तीन (लिपिकवर्गीय श्रेणी दोन) या संवर्गातील "अधीक्षक" या पदाचे "कनिष्ठ प्रशासन अधिकारी" असे पदनाम बदलण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे :

आणि ज्याअर्थी, त्यास अनुसरून महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ च्या महाराष्ट्र अधिनियम ५) कलम २७४, पोट कलम (२) खंड (एकोणचाळीस) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापुर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

१. या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, २०१२ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र जिल्हा परिशदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मधील परिशिष्ट १ मध्ये.—

(अ) नोंद १ समोरील जिल्हा सेवा (वर्ग-३) (लिपिकवर्गीय) प्रथम श्रेणीशी संबंधित स्तंभ ३ मध्ये "उप विभागीय अधिकारी " ऐवजी "सहाय्यक प्रशासन अधिकारी " असे बदलण्यास येईल.

(ब) नोंद २ समोरील जिल्हा सेवा (वर्ग-३) (लिपिकवर्गीय) द्वितीय श्रेणीशी संबंधित स्तंभ ३ मध्ये "अधीक्षक " ऐवजी "कनिष्ठ प्रशासन अधिकारी " याप्रमाणे पदनाम बदलण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दत्तत्रय बोन्हाडे,
शासनाचे उप सचिव.